मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत**.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

प्राज्ञ पाठशाळा मंडळ
वाई
ग्रंथालय

नवभारत

वर्ष ५७ । अंक ११ । ऑगस्ट २००४



अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

नवभारत
७५
अमृतमहोत्सवी
वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

नवभारत
७५
अमृतमहोत्सवी
वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ५७। अंक ११। ऑगस्ट २००४
अधिक श्रावण-निज श्रावण, शके १९२६
किंमत रु. २०/-
वार्षिक वर्गणी रु. २००/-

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

*नवभारत*ची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक-मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

* *नवभारत*, ऑक्टोबर, १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

प्राज्ञपाठशाळामंडळ
अध्यक्ष व विश्वस्त :
सरोजा भाटे

संपादक मंडळ :
श्री. वसंत पळशीकर, डॉ. सुधीर रसाळ,
श्री. सीताराम रायकर, श्री. यशवंत कळमकर
प्रा. यशवंत सुमंत

संपादकीय पत्रव्यवहार :
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ,
वाई – ४१२ ८०३ (जि. सातारा)

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
श्री.ग. दीक्षित
व्यवस्थापक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ, ३१५ गंगापुरी,
वाई – ४१२ ८०३ (जि. सातारा)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियत-कालिकाचा मंडळाच्या "नियतकालिकांचा स्थायी निधी" योजनेत समावेश केला असला तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नवभारत

ऑगस्ट २००४

अ नु क्र म

लेख	निसर्गप्रधान भारत आणि त्यासाठी नवी अर्थनीती - प्रकाश गोळे	१
	ग्रामीण विकासनीती - मिलिंद वोकील	१४
	वेदातला विष्णू - विश्वनाथ खैरे	२१
वाद-संवाद	१. 'देवकथा आणि भारतविद्या'विषयी - वसंत पळशीकर	२७
	२. 'युगपुरुष अशोक' - विश्वास दांडेकर	२९
	३. 'असि' शब्द आणि प्रचलित भारतविद्या - विश्वनाथ खैरे	३१
परीक्षण लेख	एक अभ्यास - *'अनुभवामृत'* - अशोक चौसाळकर	३३
	मराठ्यांची प्रशासन व्यवस्था - विश्वास दांडेकर	३६

मुखपृष्ठ : सुजित पटवर्धन

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

निसर्गप्रधान भारत आणि त्यासाठी नवी अर्थनीती

प्रकाश गोळे

शेतीप्रधान की निसर्गप्रधान

नवीन वर्ष सुरू होत आहे. ते कसे जाईल याची भाकिते करणारे लेख वाचायला मिळत आहेत. गतवर्षीच्या घटनांची छाननी करणारे, धोरणांची चिकित्सा करणारे, पार पडलेल्या आणि पार न पडलेल्या योजनांचा आढावा घेणारे लेख प्रसिद्ध होत आहेत. ते वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती म्हणजे भारतातले वातावरण, पर्यावरण, निसर्ग यांबद्दलच्या विचारांचा पूर्ण अभाव आणि भारतीय जनजीवनावर झालेल्या त्यांच्या परिणामांचे अज्ञान. भारतातले हवामान, भौगोलिक परिस्थिती, निसर्ग-वनस्पती, कीटक, पक्षी व प्राणीजीवन हे डोळ्यांसमोर आणले आणि यामध्ये जगत असलेला सर्वसामान्य माणूस नजरेत आणला तर काही निराळ्याच कल्पना, विचार, निराळे भवितव्य जाणवू लागतात. नववर्षाच्या निमित्ताने तेच वाचकांसमोर ठेवण्याचा हा प्रयत्न.

आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रांत आज आपल्या देशात जी धोरणे, योजना, प्रकल्प राबविले जातात त्याचे मूळ आपल्या शिक्षणात, विशेषतः उच्च शिक्षणात आहे. या शिक्षणाचा पाया ब्रिटिशांनी सुमारे दीडशे वर्षांपूर्वी घातला. तो इतका भक्कम, त्याने भारतीयांचे मनपरिवर्तन इतके पक्के झाले, की स्वातंत्र्यानंतरही आपण त्याच पायावर, तीच इमारत डागडुजी करून राखत गेलो. पाश्चात्यांच्या तांत्रिक आणि औद्योगिक प्रगतीने दिपून, त्यांची बरोबरी करण्याचे स्वप्न पहात, त्यांच्याच उच्च शिक्षणाची नक्कल करीत गेलो. सर्वसामान्यांच्या शिक्षणाकडे, ते ज्या परिस्थितीत जीवन कंठीत आहेत तिचा अभ्यास करून, त्यांना उपयुक्त शिक्षणपद्धती शोधून ती राबविण्याकडे उच्चशिक्षितांनी डोळेझाक केली. कारण पाश्चात्यांचे अनुकरण करण्यास, त्यांच्या तंत्रज्ञानाने शोधलेल्या गोष्टींचा उपभोग घेण्यास ही मंडळी आतुर झाली होती.

पण पाश्चात्यांचे तंत्रज्ञान, त्यांचे अर्थशास्त्र व अर्थकारण, त्यांचे औद्योगिक व व्यापारविषयक धोरण, त्यांची शेती, हे सर्व काही युरोप-अमेरिकेतल्या परिस्थितीवर, हवामानावर, पर्यावरणावर आधारित आहे, ही गोष्ट कोणीच लक्षात घेतलेली दिसत नाही; म. गांधींचा अपवाद वगळून. अजूनही जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था यांसारख्या पाश्चात्यांना पूर्ण अनुकूल असलेल्या कल्पनांचाच पाठपुरावा करण्यात आमचे उच्चशिक्षित धन्यता मानीत आहेत. पाश्चात्यांच्या या धोरणांना संपूर्ण स्वदेशीकरण, बंदिस्त अर्थव्यवस्था, सरकारी अर्थसहाय्य हे उत्तर नाही. आपल्या परिस्थितीचा, पर्यावरणाचा, निसर्गाचा, जनशक्तीचा अभ्यास करून त्यांच्यावर आधारित धोरणे, योजना हेच केवळ पर्याय त्यांना असू शकतात. त्यासाठी आपल्या आचार-विचारांत मूलभूत बदल हवे आहेत. अनेक चुकीच्या कल्पना डोक्यातून काढून टाकल्या, तरच हे शक्य आहे.

लहानपणापासूनच कशा चुकीच्या कल्पना आपल्या डोक्यात भरविल्या जातात त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'भारत हा शेतीप्रधान देश आहे' हे वाक्य, किंवा कल्पना. हे वाक्य ज्याच्या त्याच्या मनात इतके ठाम बसले आहे की थोर लेखक, संशोधकही ते विचार न करता ठोकून देत असतात. या वाक्याचे अर्थ अनेक होऊ शकतात. उदाहरणार्थ, भारतातले बहुसंख्य लोक शेतकरी आहेत; भारतात बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून आहेत; भारतात शेतीला परिस्थिती अत्यंत अनुकूल आहे; भारतात शेतीशिवाय दुसरा उद्योग होणे शक्य नाही, वगैरे. यांतला कोणता अर्थ कोणास अभिप्रेत आहे, याचा खुलासा करण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. माझ्या मते यांपैकी कोणतीच कल्पना पूर्ण सत्य नाही. शेती हा भारतातला प्रमुख व्यवसाय असला तरी भारत हा प्रामुख्याने शेतकऱ्यांचा देश आहे, हे म्हणणे बरोबर नाही. भारतातले बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून आहेत, असेही म्हणणे बरोबर नाही. भारतातले कित्येक लोक, कित्येक जमाती धड कोणताच व्यवसाय करीत नाहीत, पण निरनिराळ्या प्रकारे जगत असतात, असे विधान कदाचित जास्त अचूक ठरेल. कै. आत्रे आपल्या *गावगाडा* या पुस्तकात अशा जमातींची लांबलचक यादीच देतात.

महाराष्ट्रातच अशा ५६ जमाती आहेत. त्यांमध्ये नानकशाही, फकीर, शिद्दी, इराणी, बलुची, अफगाणी असे परदेशी लोकही आहेत. या जमातींपैकी कोणाचाही शेतीशी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

संबंध नाही. डॉ. माधव गाडगीळ यांतल्या फासेपारधी, कातकरी, नंदीबैलवाले यांसारख्या जमातींना 'इकॉलॉजिकल रेफ्युजी' म्हणतात. त्यांच्या संशोधनावरून असे दिसते की, या जमातींनी आपापसात उपलब्ध निसर्ग-संपत्तीची वाटणी करून घेतली आहे. फासेपारधी काही विशिष्ट पक्षी-प्राणी यांच्यावरच उपजीविका करतात. दुसरी जमात निसर्गातील इतर विशिष्ट घटकांवर जगते. त्यामुळे कोणतीही एक पक्षी किंवा प्राणीजात मोठ्या प्रमाणावर मारली जात नाही. निसर्गात मांसभक्षक पक्षी-प्राणी अशीच वाटणी करीत असतात. या जमातींनी अशी वाटणी केल्यामुळे निसर्ग तगून राहिला आहे. पाश्चात्य देशांमध्ये घडला तसा प्राण्यांचा पूर्ण संहार आपल्याकडे झालेला नाही, असे डॉ. गाडगीळ सांगतात. अलीकडे मात्र सुशिक्षित, प्रगत, श्रीमंत समाजाने आपल्या गरजा भागविण्यासाठी पुष्कळसा निसर्ग बदलून टाकला आहे, नष्ट केला आहे. त्यामुळे या जमातींच्या जीवनाचा आधारच नष्ट झाला आहे. इकॉलॉजी किंवा परिसंस्थांवर अवलंबून असणाऱ्या या जमाती आता निर्वासित बनल्या आहेत. तेव्हा त्यांना इकॉलॉजिकल रेफ्युजी म्हणणे योग्य ठरेल.

म्हणून भारतातील बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून आहेत असे म्हणण्यापेक्षा ते निसर्गावर, निसर्ग-संपत्तीवर अवलंबून आहेत असे म्हणणे बरोबर होईल. भारतात मान्सून हवामान असल्याने पाऊस वर्षातून एकदा, जून ते सप्टेंबर या कालावधीत, पडतो. हिवाळ्यात व त्यानंतरही पाऊस पडणारे भाग थोडे आहेत. तिथे शेती आणि बागायती दोन्ही केली जाते. इतर भागांत ज्यांच्याकडे थोडीफार जमीन आहे ते शेती, खरं तर, फक्त पावसाळ्यात करू शकतात. त्यानंतरचे आठ महिने त्यांना दुसरे काम शोधावे लागते किंवा परिसरातील निसर्गावर अवलंबून राहावे लागते. भारतात बहुतेक शेतकरी अल्पभूधारक आहेत; त्यांच्याकडे सरासरी जमीन १ हेक्टरपेक्षाही कमी आहे. त्यामुळे हा शेतकरी सरपण, लाकूड, जनावरांसाठी चारा, या गोष्टी तर निसर्गातून मिळवितोच, पण इतर वनस्पतीजन्य पदार्थ – फळे, मुळे, कंद, बिया, पाला – यांचाही उपयोग करतो. त्याशिवाय नदीत मिळणारे मासे, क्वचित मिळणारी शिकार यांवरही उपजीविका करतो. आज विकासाच्या नावाखाली जी कामे झाली आहेत, त्यामुळे जंगल, झाड-झाडोरा, ओढे-नद्यांचे प्रवाह, माळराने, डोंगर-टेकड्या, गवताळ मैदाने असे प्रदेश नष्ट तरी झाले आहेत किंवा प्रदूषित झाले आहेत; आणि असंख्य अल्पभूधारकांचा आधार असा निसर्ग नाहीसा झाला आहे. विकासामुळे या लोकांना नोकऱ्या, अन्य उपजीविकेची साधने, पर्यायी उद्योग मिळालेले नाहीत; अन्नधान्याच्या किंमती सतत वाढत आहेत. स्वस्त धान्य दुकानांतून मिळणारे धान्यही परवडेनासे झाले आहे. दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या त्रेपन्न टक्क्यांवरून चौसष्ट टक्क्यांवर गेली आहे.

तेव्हा भारतातील बहुसंख्य लोक निसर्गावर अवलंबून आहेत. भारत हा निसर्गप्रधान देश आहे असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. भारतातल्या राजकीय आणि शासकीय स्तरांवरच्या लोकांनी ही वस्तुस्थिती ओळखलेली नाही. पण आंतरराष्ट्रीय स्तरावर तिला मान्यता मिळालेली आहे; कारण जगातल्या एकूण नैसर्गिक विविधतेपैकी ८ ते १० टक्के विविधता एकट्या भारतात एकवटलेली आहे. त्यामुळे जग भारताकडे एक निसर्गप्रधान देश म्हणून पाहते. अनेक आंतर-राष्ट्रीय करारांत तिचा उल्लेख आहे. वर्ल्ड बँकेने स्वच्छ म्हटले आहे की, भारतातले ६६ टक्के लोक आजही निसर्गावर अवलंबून आहेत. आजच्या विकास धोरणांमुळे एवढी प्रचंड लोकसंख्या निसर्गापासून वंचित होत आहे, कारण निसर्गाचा नाश अव्याहत चालू आहे आणि पर्यायी जीवनाधार त्या प्रमाणात निर्माण होत नाहीत.

पण भारत हा शेतीप्रधान देश आहे ही चुकीची कल्पना एकदा स्वीकारली की धोरणेही अयोग्यच ठरतात आणि त्यांचे दुष्परिणाम पहायला मिळतात. वरील अपसमजावर आधारित धोरण स्वातंत्र्यानंतर स्वीकारून आपण शेतीला उत्तेजन देण्याचे ठरविले, त्याऐवजी म. गांधींनी पुरस्कारलेली खेडी स्वयंपूर्ण करण्याची योजना कितीतरी चांगली होती. तिच्यामुळे खेड्याच्या परिसरातल्या निसर्गाचे संरक्षण झाले असते; खेड्यातल्या जनतेच्या प्राथमिक गरजा भागल्या असत्या आणि इतरत्र निसर्गावर हात मारण्याची पाळी त्यांना आली नसती. त्याऐवजी नुसत्या शेतीला उत्तेजन देण्याचे धोरण आमच्या उच्चशिक्षित शेती-तज्ज्ञांच्या सल्ल्यावरून सरकारने ठरविले. या तज्ज्ञांना आपल्याकडील परिस्थितीचे ज्ञान नव्हते असे नाही. पण ते पाश्चात्य कल्पनांनी भारले गेले होते. त्यामुळे जनतेच्या प्राथमिक गरजा भागविण्यापेक्षा त्यांनी जनतेला एकदम श्रीमंत बनविण्याची स्वप्ने पाहिली आणि शेतीला व्यापाराभिमुख करून शेतकऱ्याचे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

खिसे भरतील अशी समजूत करून घेतली. पाश्चात्य देशांप्रमाणे यांत्रिक शेती, तिला पाणी आणि अनैसर्गिक खते व कीटकनाशके यांचा भरपूर पुरवठा, या शेतीला योग्य अशी बी-बियाणे या गोष्टींवर भर दिला. यांमुळे शेतकरी बाजारपेठेशी जखडला गेला, मध्यस्थ दलालांचे उखळ पांढरे झाले आणि सतत वाढणाऱ्या किंमतींमुळे सर्वसामान्य माणूस शेतीच्या उत्पादनांपासुन दूर जाऊ लागला. त्याच्याजवळ पैसा नाही म्हणून त्याला कर्ज घेण्याची आमिषे निरनिराळ्या योजनांद्वारे दाखविण्यात आली, पण कर्जपुरवठा होऊनही असली शेती पर्यावरण, इथली माती यांच्याशी जमवून घेणारी नसल्याने शेतकरी कर्जबाजारी फक्त झाला.

आजही हीच धोरणे, हाच साचा चालू असल्यामुळे सर्वसामान्यांच्या प्राथमिक गरजा भागविण्याऐवजी आजची शेती बाजारपेठेच्या म्हणजे उच्चशिक्षित, नागर, श्रीमंत समाजाच्याच गरजा भागविते. त्यामुळे काही शेतकऱ्यांच्या, बागायतदारांच्या खिशांत पैसा आला तरी जीवनावश्यक गोष्टींची टंचाई सर्वत्र जाणवते. आजकाल शेतीचे उत्पादन वाढविण्याच्या अनेक योजना, अनेक उपाय, अनेक तंत्रे, युक्त्या सुचविल्या जातात. शोधल्या जातात. यांत्रिक शेतीपासुन, दहा गुंठ्यांत नैसर्गिक शेती करण्यापर्यंत. यांमध्ये व्यवस्थित पाणीपुरवठा ही गोष्ट बहुधा गृहीत धरलेली असते. उत्पादनाचे वितरण, ग्राहकापर्यंत पोचायचे कसे व त्यामध्ये स्थैर्य कसे आणायचे याची चर्चा क्वचितच वाचायला मिळते. त्यामुळे उत्पादन वाढले तरी बाजारपेठेत ते पोहोचविण्यासाठी शेवटी उत्पादकाला दलालाकडेच वळायला लागते. उत्पादकाला कमी उत्पन्नातच समाधान मानावे लागते. वितरणव्यवस्था ही उत्पादकांनी एकत्र येऊन, ग्रामपंचायतीच्या मदतीने, स्वतंत्रपणे उभी केली तरच त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

गावाने बाजारपेठेला तोंड द्यायचे म्हणजे गावाकडे, तिथल्या मालाकडे काही वैशिष्ट्ये, दर्जा हवा. इथे नैसर्गिक विविधतेचा उपयोग होतो. आपल्याकडे पूर्वी धान्यांच्या, भाज्यांच्या, फळांच्या वैशिष्ट्यपूर्ण जाती होत्या. एकट्या भाताच्या तीस हजार जाती होत्या. आंबा, फणस अशा फळांच्या विविध जाती होत्या. सध्या निव्वळ उत्पादनवाढीच्या मागे लागून आपण काही ठराविक जातीच उपयोगात आणतो. त्यांवर प्रयोग करून उत्पादन, आकार, रंग वाढवितो आणि चवीत, स्वादात मार खातो. कृषी विद्यापीठाने प्रसारित केलेली बोरे हे यांचे उत्तम उदाहरण! भात, आंबा, विविध भाज्या यांच्या विकसित प्रजातींना पाणी, कीटकनाशके यांचा पुरवठाही भरपूर प्रमाणात लागतो. ही सर्व तंत्रे निसर्गाच्या विरुद्ध आहेत. त्यामुळे निसर्गशक्तींशी सामना करण्यात त्यांची शक्ती खर्च होते; आणि पिके, भाज्या, फळे विकसित करण्याचा, जगविण्याचा खर्च वाढतो. उत्पादन महागडे होते. जमीन, पाणी दूषित होते. बाजारात उत्पादन विशिष्ट वर्गालाच परवडते. यांऐवजी नैसर्गिक विविधतेचा उपयोग केला तर उत्पादनखर्च कमी होऊन सर्वांना परवडणारा माल तयार होण्याची शक्यता आहे.

या गोष्टी महाराष्ट्रात नाविन्यपूर्ण वाटल्या तरी आपल्या शेजारच्या राज्यांत तेवढ्या नवीन नाहीत. दक्षिण महाराष्ट्राला लागून आहे उत्तर कर्नाटक — अजूनही निसर्ग-संपत्तीने समृद्ध असा प्रदेश. या प्रदेशातले लोक शेतीबरोबर निसर्गातून पालेभाज्या, बटाट्यासारखे कंद, मसाल्यासारख्या वनस्पती, फळे-फुले यांचा आपल्या आहारात भरपूर उपयोग करतात. शिवाय प्रत्येकाच्या घरी परसबाग असते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या आहारात भरपूर विविधता आहे. फळांच्या, भाज्यांच्या, धान्यांच्या अनेक स्थानिक जाती अजून टिकून आहेत. अनेक प्रकारची जेवणे उपलब्ध आहेत आणि हे या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे; त्यांचा त्यांना अभिमान आहे.

केरळचेही उदाहरण या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. सार्वत्रिक शिक्षण, आरोग्य आणि इतर ग्रामीण सुविधा यांमध्ये केरळ भारतात तर आघाडीवर आहेच पण त्याने चीनलाही याबाबतीत मागे टाकले आहे. नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेनसुद्धा या गोष्टीचा अभिमानपूर्वक उल्लेख करतात. औद्योगिक प्रगती, कारखानदारी, हे केरळचे वैशिष्ट्य नाही. पण ग्रामीण भागाला स्वयंपूर्ण करून केरळने गरिबीवर मात केली आहे. शेती आणि बागायती यांचा समन्वय साधून नैसर्गिक विविधता टिकविण्यातही केरळ काही प्रमाणात यशस्वी झाला आहे. सर्वसामान्य जनतेची अभिवृद्धी साधण्यासाठी काही वेगळेच उपाय अंमलात आणावे लागतात, हे केरळने दाखवून दिले आहे. पर्यावरण सुधारले गेल्यामुळे पर्यटन व्यवसायासही केरळमध्ये उर्जितावस्था आलेली आहे.

महाराष्ट्रातील शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय नेतृत्व मात्र पाश्चात्यप्रणीत कल्पना आणि तंत्रे यांचाच पुरस्कार करण्यात मग्न आहे. सर्वसामान्यांची सर्वांगीण प्रगती हे लक्ष्य

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

असेल तर शेती, उद्योग यांचे आजचे स्वरूप बदलणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या अनेक प्रचलित कल्पना, मानसिकताही बदलायला हवी.

काही विचार : निसर्गप्रधान देशासाठी!

भारत हा शेतीप्रधान देश आहे ही कल्पना टाकून तो निसर्गप्रधान आहे ही सत्यस्थिती स्वीकारली की, नेहमीच्याच गोष्टींचे काही निराळे आकलन होऊ लागते. भारताचा भूगोल, इथले हवामान, पाऊस, तापमान यांची माहिती शाळेपासूनच आपल्याला मिळते. पण या सर्वांमधल्या प्रचंड विविधतेचे सत्यचित्र विद्यार्थ्यांना आजच्या शिक्षणपद्धतीत मिळत नाही. कारण आजची शिक्षण-पद्धती विविधतेचे महत्त्व ओळखत नाही; तर ज्ञानमंजुषेचे निरनिराळ्या कप्प्यांत विभाजन करून एकेका कप्प्यात एकेका विद्यार्थ्याला कोंबून टाकते. मग तो एखाद्या विषयात तज्ज्ञ झाला तरी इतर विषयांबद्दल अनभिज्ञ असतो आणि निरनिराळ्या विषयांतील परस्परसंबंध तर त्याला आणि त्याच्या शिक्षकालाही माहीत नसतात. त्यामुळे या पद्धतीतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांपुढे स्थापत्य, तंत्रज्ञान, वैद्यकी, वकिली, पतपेढ्या, विमा अशी मोजकी क्षेत्रेच खुली होतात. अलीकडे मात्र दूरदर्शन आणि संगणक यांच्यामुळे विविध माहितीचा मारा सर्वांवर होतो आहे. त्यामुळे अनेक भिंती ढासळत आहेत आणि कवाडे खुली होत आहेत.

भारतात विविध प्रकारचा निसर्ग, हवामान आणि वातावरण आहे. सर्वत्र विखुरलेल्या डोंगररांगांमुळे इथे विविध प्रकारची स्थानिक वातावरणे – मायक्रोक्लायमेट्स – आहेत. अक्षरशः हजारो पाणलोट क्षेत्रांत भारताचे क्षेत्रफळ विभागले गेले आहे. या प्रत्येक क्षेत्रातील वातावरणाला सरावलेल्या वनस्पती जाती आपल्याकडे विकसित झालेल्या होत्या. तिथल्या निसर्गशक्तींशी सामना करण्याची ताकद त्यांना स्वाभाविकरीत्याच प्राप्त झालेली होती. त्यांना स्वतःचा पोत, रंग, स्वाद, चव होती. त्यामुळे प्रत्येक पाणलोट क्षेत्र अशा जातींमुळे वैशिष्ट्यपूर्ण बनले होते. आजही प्रत्येक गावाने अशा वैशिष्ट्यपूर्ण जाती शोधणे, त्या विकसित करणे, त्या चोखंदळ ग्राहकांपर्यंत पोचविण्यासाठी स्वतंत्र वितरणव्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न करणे आणि ती चालविणे योग्य ठरेल. आज अस्तित्वात असलेल्या, दलाली पद्धतीवर आधारित असलेल्या बाजारपेठेला हा एक उत्तम पर्याय ठरेल. स्वतःच्या आवश्यक गरजा भागवून असे वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन वितरित करणे व आपला विशिष्ट ग्राहकवर्ग तयार करणे व टिकविणे, त्यासाठी परिश्रमपूर्वक नवनवीन कल्पनांचा अवलंब करणे, यांतून एक वेगळीच वितरण-व्यवस्था, जबाबदार असे वितरक आणि ग्राहक तयार होतील. आजचे पारंपरिक मध्यस्थ, दलाल आणि त्यांची तंत्रे यांना आळा बसेल. ते मागे पडतील. यासाठी सार्वत्रिक आणि आपल्या पर्यावरणावर आधारित शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

अशा व्यवस्थेमध्ये बाजारपेठेचा मर्यादित उपयोग आणि आपल्या जीवनावर तिला ताबा मिळवू न देता आपल्या जीवनाचा दर्जा उत्तम राखणे या गोष्टी गृहीत धरल्या आहेत. प्रचलित शिक्षणपद्धती बदलल्याशिवाय हे घडणे कठीण आहे.

आपला देश उष्ण कटिबंधात मोडतो, मोसमी पावसाच्या प्रदेशात येतो, हे सर्वांस ठाऊक आहे. पावसाची उपलब्धताही येथे मर्यादित आहे. त्यातही सर्वत्र पसरलेल्या डोंगररांगांमुळे पर्जन्य-छायेचे भागही सर्वत्र विखुरलेले आहेत. भारतातला हरयाणा ते कर्नाटक असा एक मोठा पट्टा कमी आणि अनियमित पावसाचा आहे. त्यातल्या जमिनीचा दर्जाही असा आहे की त्यात वनस्पतीजन्य पदार्थ कमी असून खनिजे, क्षार जास्त आहेत. अशा ठिकाणी भरपूर पाणी देऊन शेतीचे उत्पादन वाढविणे बरोबर नाही. इथे जमिनीतील वनस्पतीजन्य पदार्थ वाढवून तिची सुपीकता, ओलावा धरून ठेवण्याची शक्ती वाढविण्याचा प्रयत्न हवा. आणि ते सर्व कमीतकमी खर्चात झाले पाहिजे, असा आग्रह हवा. त्या दृष्टीने पाण्याचे वितरण हवे. कमीतकमी खर्च आणि सर्वदूर वितरण या दृष्टीने पाहता धरणे-कालवे यांवर आधारित पाणीवाटपव्यवस्था योग्य नाही. अशा व्यवस्थेने जास्तीत जास्त एकरी उत्पादन, मर्यादित क्षेत्रावर भरपूर पाण्याचा उपयोग, त्याचबरोबर रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर यांना उत्तेजन दिले आहे. यांमुळे ठराविक क्षेत्रात शेती व उद्योग एकवटले जाऊन लोकसंख्येचे केंद्रीकरण होते. अशा शेतीतून, उद्योग व लोकसंख्या यांपासून तयार होणारे सांडपाणी, मैला आणि शेती आणि कारखाने-उद्योग यांतून होणारे उत्सर्जन हे सर्व नदी-ओढ्यांत शिरून त्यांची खराबी होते. हे सर्व आपण अनुभवीत आहोत. हळूहळू याबाबत जाण वाढत आहे. पण हे प्रदूषण दूर करण्यासाठी पाणी शुद्धीकरण केंद्रासारखे अत्यंत खर्चिक पण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
अनुक्रमणिका

अनेक प्रकारची प्रदूषणे दूर न करू शकणारे उपाय सुचविले आणि वापरले जात आहेत. शेतीच्या, पाणी साठविण्याच्या आणि वितरणाच्या आपल्या विचारात, आचारात, दृष्टिकोनात बदल झाल्याशिवाय हे प्रदूषण किंवा विषम वितरण थांबणार नाही. मूलभूत गोष्टीतच बदल हवा.

शेतीमध्ये एका पिकाचे विक्रमी उत्पादन घेण्याऐवजी निसर्गातील विविधतेवर भर हवा. त्यानुसार वातावरणाला- मायक्रोक्लायमेटला – अनुकुल अशा जाती, वाणे शोधण्यावर, वापरण्यावर भर हवा. जमिनीवर सतत वनस्पतीजन्य गोष्टींचे आवरण हवे, शेताभोवती व्यवस्थित राखलेली वनस्पतीजन्य कुंपणे हवीत. या सर्वांमुळे किडींचा बंदोबस्त होऊ शकतो. यासाठी आपल्याकडच्या निरनिराळ्या वन्य झुडुपांच्या जातींच्या जीवनपद्धतीचे संशोधन हवे. पुनरुज्जीवन आणि लागवड हवी. **वन्य झाडे-झुडुपे आणि जमिनीसरशा व खुरट्या वाढणाऱ्या वनस्पती यांकडे आमचे लक्ष अजून फारसे गेलेले नाही.** त्यांपैकी कित्येक वनस्पती औषधी व इतरही गुण असणाऱ्या आहेत. त्या जमवून, त्यांच्यावर प्रयोग, अभ्यास होणे अत्यंत जरूर आहे.

शेतांना पाणी देण्याची व्यवस्था शक्यतो विहिरीतूनच हवी. त्यासाठी भूगर्भातील साठे पुनरुज्जीवित होणे जरूर आहे. ओढे, नाले, नद्या वाहते ठेवणे, त्या शेजारचे, काठचे वनस्पतीजीवन राखणे, त्यामधील आसरे आणि पात्रातील वनस्पती, भूरचनांची वैशिष्ट्ये राखणे इतर उपायांइतकेच आवश्यक आहे. उपसासिंचन योजना बाद करून जास्तीत जास्त पाणी भूगर्भात साठेल आणि त्यातून ते विहिरीत येईल असे पाहिले पाहिजे. शेताभोवतीचे, एवढेच नव्हे तर शेतातील चाऱ्यांकडेचे वनस्पतीजीवनही योग्य राखायला हवे. शेतांतून कमीत कमी पाणी वाहून जाईल, शक्यतो ते शेतातच मुरेल हे पाहिले पाहिजे.

अशा तऱ्हेचे नियोजन होण्यासाठी केवळ शेतीकडेच लक्ष देऊन चालणार नाही. शेतीबरोबरच गाव आणि त्याचा परिसर यांमधील जमीन आणि पाण्याचा योग्य उपयोग, माणूस आणि निसर्ग यांच्या गरजांमध्ये समन्वय आणि संतुलन, सांडपाणी, कचरा यांची योग्य विल्हेवाट अशा प्रकारचे सर्वंकष नियोजन (लॅन्डस्केप प्लॅनिंग) हवे.

पाण्याची वर्षभर उपलब्धता आणि त्याचे सर्वदूर वितरण या दृष्टीने मी ओढ्यांच्या तंदुरुस्तीला फार महत्त्व देतो. अलीकडे धरणे, बंधारे यांना अवास्तव महत्त्व दिल्याने ओढे निकालात निघाले आहेत. पण अगदी उगमापासून त्यांच्या किनाऱ्यांची निगा राखली तर पाणी सर्वांना योग्य प्रमाणात मिळेलच पण त्यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या व टिकणाऱ्या वनस्पतींमुळे शेतीशी संबंध नसणाऱ्या, पण निसर्गावर अवलंबून राहणाऱ्या हजारो लोकांना, जमातींना उपजीविका करता येईल. या दृष्टीने या लोकांना ओढे, प्रवाह यांच्या संरक्षणात सामील करून घेतले पाहिजे. या भटक्या, विमुक्त जमातींच्या गरजा समजून त्यानुसार उपजीविकेची साधने पुरविण्याची योजना त्यांच्यासाठी आखली गेलेली नाही. उलट निसर्गावर आधारित अशा त्यांच्या गरजा न पुरविताच त्यांना आधुनिक समाजात ओढण्याचा प्रयत्न दिसतो. ओढे-नाले यांची सुधारणा करून, निसर्गाचे पुनरुज्जीवन साधून, अत्यंत माफक खर्चात उपजीविकेची साधने त्यांना देता येतील. या दृष्टीने पुण्याच्या आसपासच्या नद्या-नाल्यांची खोरी आणि त्यांतील पाण्याचा सध्याचा वापर पाहणे उद्बोधक ठरेल.

पुणे शहर भिमा खोऱ्यात येते आणि या खोऱ्यातून शहराला पाण्याचा पुरवठा होतो. भिमेला उत्तरेकडून पुष्पावती, वेळ, मिना या नद्या व त्यांच्या उपनद्या (किंवा प्रवाह) आणि दक्षिणेकडून घोड, भामा, अंधारी, इंद्रायणी, मुळा, मुठा या नद्या व त्यांच्या उपनद्या मिळतात. या सर्व प्रवाहांतून दरवर्षी ६१०० दशलक्ष क्युबिक मीटर एवढ्या पृष्ठभागावरील पाण्याची निर्मिती होते; आणि त्यांपैकी ५७०० द.ल.क्यु.मी. पाणी वापरले जाते — धरणे, बंधारे, कालवे बांधून. यांमध्ये मोठी धरणे ९, मध्यम ५ आणि लहान १२ आहेत. यांशिवाय कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि पाझर तलाव असंख्य आहेत. याचा अर्थ असा की भिमा खोऱ्यातील सर्व प्रवाह या ना त्या प्रकारे अडविलेले आहेत. नदी-ओढ्यांचे प्रवाह वाहते असतील तर ते अनेक नैसर्गिक कार्ये करीत असतात. वाहते प्रवाह पाणी शुद्ध करतात, पाण्यात मिसळलेल्या अन्नांशाचे वितरण व पुनर्भरण करतात, गाळ वितरित करतात, भूगर्भातील जलसाठे राखतात, अनेक आसरे तंदुरुस्त ठेवतात, अनेक जलचरांची वाहतूक व स्थलांतर घडवितात, पृष्ठभागाखालील जलस्रोत नीट राखतात व त्यांमधून ओलावा पसरवितात. अनेक प्रकारच्या वनस्पती, प्राणी-पक्षी आणि जलचर यांना जीवन पुरवितात. प्रवाह जागोजागी अडविले की ही सर्व कार्ये खंडित होतात. पाणी अडवून शेती, उद्योग, मनुष्यवस्ती यांना जे पाणी पुरविले जाते ते बहुश: ओढे-नद्या यांच्यामध्ये

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

सांडपाण्याच्या रूपाने परत येते आणि नैसर्गिकरित्या शुद्ध होत नाही. ते जागोजागी साचते आणि प्रदूषण, रोगराई यांना कारणीभूत ठरते. जलाशयात साठविलेले पाणी नदीतून, कालव्यातून वेळोवेळी सोडूनही नदीची नैसर्गिक कार्ये पुनरुज्जीवित होत नाहीत. कारण धरणांमुळे नदीतील प्रवाहांचे, त्यावर अवलंबून असलेल्या जीवनचक्राचे वेळापत्रक बिघडून ती कार्ये बंद पडलेली असतात. पावसाळ्यात नदीला पूर येऊन पाणी जेव्हा वेगाने वाहू दिले जाते, तेव्हा अल्प काळ नदी-ओढे जिवंत होतात.

गेल्या दोन दशकांत नदी-ओढ्यांमध्ये साचणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाण प्रचंड वाढल्यामुळे धरणे, जलाशय, कालवे यांच्या व्यवस्थापनामध्ये नवे प्रश्न निर्माण झाल्याचे या विषयातील एक तज्ज्ञ आणि महाराष्ट्र शासनाच्या सिंचन विभागाचे माजी सचिव श्री.वि.म. रानडे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. हे सर्व प्रदूषित पाणी शेवटी भिमा खोऱ्यातील शेवटचे धरण उजनी याच्या जलाशयात साठते. उजनी जलाशयाभोवतीच्या विहिरींच्या पाण्याची तपासणी केल्यावर आढळले की, त्यांतील पाणीही दूषित झालेले आहे. नदी, ओढे, जलाशय यांच्या पाण्यावर अजूनही असंख्य लोक त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी अवलंबून आहेत. त्यांच्या आरोग्यास प्रदूषण हा मोठा धोका आहे. उजनी जलाशयाभोवतीच्या गावांमध्ये टायफॉईड, कावीळ अशा रोगांचे प्रमाण खूपच जास्त आढळले आहे.

हे सर्व प्रश्न निर्माण होण्याचे कारण म्हणजे आपल्या शेतीचे पर्यावरणीय स्वरूप ओळखण्यात कृषी व इतर तज्ज्ञांना आलेले अपयश किंवा त्याकडे त्यांनी केलेली डोळेझाक आणि त्यामुळे अंमलात आलेली अयोग्य पाणीव्यवस्था होय.

प्रसिद्ध संशोधक श्री. धर्मपाल यांनी एका लेखात म्हटले आहे की, ज्या वेळी ब्रिटिश लोक प्रथम भारतात आले आणि चेन्नईजवळ त्यांनी वखार स्थापन केली, त्या वेळच्या स्थानिक परिस्थितीच्या त्यांनी तपशीलवार नोंदी करून ठेवल्या. या नोंदीमध्ये ते म्हणतात की, त्या भागातील शेती फार उत्तम आणि प्रगत होती. ब्रिटिश शेतकऱ्यांनी येथील शेतीच्या अवजारांची नक्कल करावी अशी शिफारस ते करतात. ती शेती नैसर्गिक विविधतेवर आधारित होती. त्या काळी स्थानिक जनतेच्या आहारात धान्यांच्या ४५ जाती वापरल्या जात. अन्नधान्याची इतकी सुबत्ता होती, स्वस्ताई इतकी होती की, शेतमजूरही सुखाने जगू शकत होता. तामिळनाडूत त्या काळी शेती विहिरी आणि तलावांच्या पाण्यावर अवलंबून होती. गावांमध्ये जागोजागी लहानलहान तळी होती. कित्येक देवालयांच्या मालकीची होती. त्यामधूनही पाण्याचे वाटप होई. या विकेंद्रित पाणीव्यवस्थेतून जी शेती फुलली, तिचे दर एकरी उत्पादन कमी असले तरी खर्चही कमी होता. शेतकरी सुशिक्षित होता आणि तो शेतीच्या व्यवस्थापनात वाकबगार होता, असे ब्रिटिशांनी लिहून ठेवले आहे.

या 'मॉडेल' ऐवजी आजच्या शेतीने दर हेक्टरी उत्पादन वाढीवर भर दिला आहे. नैसर्गिक विविधतेऐवजी थोड्या, प्रमाणित जाती विकसित केल्या आहेत; आणि गहू, तांदूळ, मका, सोयाबीन अशा काही मोजक्या धान्यांवर भर दिला आहे. यामुळे विविधता कमी झाली आहे, बी-बियाणे महाग झाली आहेत, ती वाढविण्याचा, जगविण्याचा खर्च वाढला आहे आणि शेतीचे उत्पादन वाढले तरी खर्चही बेसुमार वाढला आहे. एकीकडे धान्याची कोठारे भरून वाहताहेत तर ते विकत घेण्यासाठी अनेक ग्राहकांच्या खिशात पैसा नाही, अशी स्थिती आहे. सिंचन पाण्याची किंमत अशी आहे की त्यावर नगदी पिकेच घेणे परवडेल. ही पिके घेणे आणि त्यावर प्रक्रिया करणे हे उद्योग वाढले तरी त्यांच्याद्वारे शहरातील उच्च मध्यमवर्ग आणि श्रीमंत ग्राहक यांच्याच गरजा पुरविल्या जातात असे दिसते. श्रीमंतांच्याच गरजा पुरविणारी शेती फायदेशीर होते, असे स्वरूप शेतीच्या उद्योगाला येत आहे. सर्वसामान्यांच्या गरजा कोणी व कोठून पुरवायच्या हा खरा प्रश्न आहे. या पुरविल्या न गेल्यामुळे समाजात विषमता, अस्वस्थता व गुन्हेगारी वाढत आहे.

या दृष्टीने धान्य आणि दूध यांचे जे उत्पादन आज होते आहे त्यांपैकी किती भाग प्रक्रिया उद्योग, धान्यांपासून केले जाणारे तयार पदार्थ, दुधापासून होणारे पदार्थ — उदाहरणार्थ मिठाई, आइस्क्रिम, पक्वान्ने —, चहा-कॉफी व तत्सम पेयांचे अनेक प्रकार करण्यात खर्च पडतो, हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. १९६६-८० या काळात अविकसित देशांमध्ये धान्याचा आहारात उपयोग करण्यामध्ये दरवर्षी २.१ टक्क्यांनी वाढ झाली; तर तयार पदार्थ व जनावरांचे मांस तयार करण्यासाठी धान्यांचा उपयोग करण्यामध्ये दरवर्षी ३.८ टक्क्यांनी वाढ झाली. विविध प्रकारचे तयार पदार्थ, प्रक्रिया केलेले पदार्थ मुख्यतः नागर समाजाच्या गरजा भागवितात. धान्यांच्या उत्पादनांपैकी मोठा भाग या गरजा भागविण्यासाठी वापरला जात असेल

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तर सर्वसामान्यांना प्राथमिक गरजांसाठी धान्य मिळणे कठीण होईल. धान्यांच्या किंमतीही सतत वाढत राहतील. नेमकी हीच गोष्ट सध्या घडते आहे आणि दारिद्र्यरेषेखालील लोकांना धान्यांचा आहारात समावेश करणे अधिकाधिक कठीण होत आहे. धान्याची शेती सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याची आज फार गरज आहे.

या गोष्टी साध्य करायच्या तर निव्वळ शेती आणि पाण्याचे व्यवस्थापन याची तंत्रे व पद्धती बदलून चालणार नाही, तर एका नव्या अर्थनीतीचा स्वीकार करावा लागेल. आधुनिक अर्थशास्त्राचे ॲडॅम स्मिथसारखे जनक ज्या अर्थनीतीचा पुरस्कार करीत होते, ती बाजूला पडून एक विकृत अर्थव्यवस्था आज रूढ झाली आहे. ॲडॅम स्मिथने जरी (सरकारी) निर्बंधविरहित, खुली अर्थव्यवस्था पुरस्कारिलेली होती, तरी तिचा पाया हा अत्यंत सुसंस्कृत, सामाजिक जबाबदारी ओळखणारा, विवेकी असा ग्राहक आणि उत्पादक वर्ग आहे, असे त्याने आग्रहाने सांगितलेले होते. असा समाज असेल तर कोणत्या वस्तूचे उत्पादन करायचे आणि त्यांचे वितरण कसे करायचे यावर, म्हणजेच बाजारपेठेवर, समाजाच्या विवेकी आवडीनिवडीचे नियंत्रण राहील. माणसाच्या जीवनावर बाजारपेठेचे नियंत्रण असा उलटा प्रकार होणार नाही. ॲडॅम स्मिथने कल्पिलेला विवेकी समाज अस्तित्वात नसल्याने आज बाजारपेठच माणसाची बुद्धिमत्ता, तंत्रकौशल्य यांना वेठीला धरून माणसाच्या जीवनावर प्रभुत्व गाजवीत आहे, ही परिस्थिती कशी बदलली जाईल?

नवी अर्थनीती : १

मागणी आणि वस्तूंचा पुरवठा या अर्थव्यवहाराच्या दोन बाजू. माणसाच्या, समाजाच्या प्राथमिक अवस्थेत वस्तूंची देवघेव करून हा व्यवहार होई. पण त्याचा आवाका मर्यादित होता. कारण सर्व वस्तूंची किंमत ज्याद्वारे ठरविण्यात येईल असे पैशासारखे प्रमाण माध्यम उपलब्ध नव्हते. नंतर ज्यांच्या किंमती स्थिर राहू शकतात अशा उंची, मूल्यवान वस्तू – उदाहरणार्थ, सोने, रुपे, रत्ने – या प्रमाण मानून त्यापासून पैशाची निर्मिती झाली. प्रथमतः व्यापार, अर्थव्यवहार हे मुख्यतः निसर्गात ज्या दुर्मिळ, मूल्यवान वस्तू सापडत त्यांच्या देवघेवीवरच आधारित होते. या वस्तूंवर प्रक्रिया, कारागिरी होऊन उत्पादित वस्तूंची देवघेव, व्यापार पुढे वाढला तरी तोही मुख्यतः मूल्यवान वस्तूंचाच होत असे, धनिकांपुरताच मर्यादित असे. सर्वसामान्य माणसासाठी बाजार स्थानिक स्वरूपाचा, वस्तूंच्या देवघेवीचा आणि पैशाचा मर्यादित वापर असलेला असा होता. असे स्थानिक स्वरूपाचे बाजार आजही आपल्या ग्रामीण भागात सर्वत्र आढळतात. यांतूनच सर्वसामान्यांच्या प्राथमिक गरजा भागविल्या जातात.

१७व्या आणि १८व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीने ही परिस्थिती बदलू लागली. वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी यंत्रशक्तीचा उपयोग होऊ लागला. अनेक माणसांचे काम एक यंत्र करू शकते. तद्वतच त्याची भूकही असते. त्याला ऊर्जा आणि कच्चा माल यांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा करावा लागतो, तेव्हाच ते काम करते. यंत्र तयार करणे, त्याला ऊर्जा आणि कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा करणे यासाठी भरपूर खर्च करावा लागतो, भांडवलाची जरूरी भासते. पतपेढ्यांकडून कर्ज काढून भांडवल उभे करावे लागते.

सुदैवाने १५व्या आणि १६व्या शतकापासून पश्चिम युरोपातील स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड, नेदरलँडस्, फ्रान्स अशा दर्यावर्दी राष्ट्रांनी व्यापार, नव्या प्रदेशांचा शोध व त्यावरील ताबा यांमुळे भांडवल जमविले होते आणि जिंकलेल्या प्रदेशांतून स्वस्तात कच्चा माल व मजूरवर्ग मिळेल अशी व्यवस्था केली होती. याच वेळी इंग्लंडमध्ये शेतीचे स्वरूप व्यापारी बनल्यामुळे शेती करणारी अनेक कुळे बेकार झाली आणि तोही स्वस्त मजूरवर्ग कारखानदारांना मिळाला. नंतरची पश्चिम युरोपातली भरभराट स्वस्त कच्चा माल, गुलाम आणि बालमजुरांसकट स्वस्त मजूरवर्ग आणि कारखान्यांतून बाहेर पडणारा धूर, सांडपाणी, रसायने परिसरात कोठेही टाकण्याची मुभा, यांवर आधारित होती. यामुळे उत्पादनाचा खर्च कमी राहिला, नफ्याचे प्रमाण वाढले आणि उत्पादित वस्तूंच्या किंमती माफक राहिल्या. त्यांच्याशी तुलना करता श्रमशक्तीवर आधारित उद्योगांचे उत्पादन कमी आणि त्याची किंमत जास्त अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे कुटिरोद्योग बंद पडू लागले. इंग्लंडमधून स्वस्त सुती कापड येऊ लागल्यामुळे भारतातील विणकरांचा धंदा बसला.

स्वस्त भांडवल, स्वस्त कच्चा माल, स्वस्त मजूरवर्ग आणि स्वस्त ऊर्जेचा पुरवठा असेल तरच खर्च कमी राहून यांत्रिकीकरण परवडते, त्यापासून उत्पादित मालाच्या किंमती माफक राहतात. युरोपातील दर्यावर्दी राष्ट्रांनी परदेशांत (आशिया-आफ्रिकेत) राज्ये स्थापन करून वरील सर्व गोष्टी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आपल्याला अनुकूल करून घेतल्या. त्यामुळे त्यांची भरभराट झाली. देशात संपत्तीचा ओघ चालू झाल्यामुळे नवनवीन तंत्रे शोधून काढण्यात पैसा गुंतविणे त्यांना शक्य झाले आणि तांत्रिक प्रगती साधून ते आपली उत्पादकता सक्षम राखू शकले. याच वेळी सार्वत्रिक शिक्षणाचा त्यांनी जो पाया घातला, त्यामुळे तंत्रकुशल, शिक्षित कामगारवर्ग त्यांना सतत उपलब्ध झाला. अमेरिकेसारख्या निसर्गसमृद्ध देशाला कच्च्या मालाचा तुटवडा भासला नाही. गुलामगिरी आणि आजूबाजूच्या राष्ट्रांतून येणारा स्वस्त मजूरवर्ग यामुळे तिथेही यांत्रिकीकरणाचा जम बसला. पुढे शिक्षणात अभूतपूर्व प्रगती साधून त्यांनी तंत्रज्ञानात अत्युच्च स्थान मिळविले. जपानने अमेरिकेचे अनुकरण करीत शैक्षणिक प्रगती, तंत्रज्ञान यात यश मिळविलेच पण सर्वसामान्य जनतेला अपार श्रमाचे असे काही बाळकडू पाजले, की आज तेथील कामगार वर्ग औद्योगिक प्रगतीशी पूर्ण समरसून गेला आहे.

ज्या इतर राष्ट्रांनी वरील राष्ट्रांचे अनुकरण करून यांत्रिकीकरण करू पाहिले, त्यांना स्वस्त मजूरवर्ग उपलब्ध झाला तरी स्वस्त कच्चा माल, स्वस्त ऊर्जा, स्वस्त भांडवल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे यांत्रिकीकरणाची इमारत भक्कम पायावर कधीच उभी राहिली नाही. शिक्षण सार्वत्रिक नसल्यामुळे तंत्रज्ञानात प्रगती त्यांना करता आली नाही. त्यामुळे कारखान्यातील उत्पादित वस्तूंचा पुरवठा माफक किंमतीत करण्यासाठी त्यांना प्रचंड प्रमाणावर सरकारी मदत घ्यावी लागली आणि कच्चा माल अत्यंत अल्प किंमतीत निसर्गातून मिळवावा लागला — सरकारकडून सबसिडी घेऊन! उसने तंत्रज्ञान आणि सरकारी सहाय्य यांवर भारतासकट इतर अनेक देशांची औद्योगिक प्रगती उभी असल्याचे चित्र आज दिसते. तिचा पाया भक्कम नाही हेही लक्षात येते.

आज जगाची विभागणी विकसित आणि अविकसित राष्ट्रांत झालेली दिसते, तिला पर्यावरणीयदृष्ट्या वेगळे महत्त्व आहे. सर्व विकसित राष्ट्रे समशीतोष्ण कटिबंधात (टेम्परेट रिजन) मोडतात, तर अविकसित राष्ट्रे उष्ण कटिबंध आणि त्याला लागून असलेल्या प्रदेशात येतात. चीन, युनायटेड स्टेटस अशा विस्तृत देशांचे क्षेत्रफळ शीत कटिबंधापासून उष्ण कटिबंधाला लागून असलेल्या भागापर्यंत पसरलेले आहे. मात्र पर्यावरणदृष्ट्या महत्त्वाची गोष्ट अशी की आजचे अविकसित देश हे निसर्गसमृद्ध असूनही अविकसित ठरतात आणि अमेरिका सोडल्यास इतर विकसित देश निसर्गसंपत्ती नसूनसुद्धा विकसित ठरतात. असे का व्हावे? विकासाचे निकष बरोबर आहेत का? विकास आणि निसर्ग संपत्ती यांचा अन्योन्य संबंध काय? ज्या अर्थशास्त्राने विकासाचे निकष ठरविले ते निसर्गसंपत्तीचा विचार कशा प्रकारे करते? त्यामध्ये बदल घडला तर आजचे चित्र बदलेल का? त्याचा सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर कोणता परिणाम होईल? असे अनेक प्रश्न मनात उभे राहतात. भारतात असे प्रश्न विचारण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. पाश्चात्य देशांत काही विचारमंथन या दिशेने सुरू आहे. पण ते विकसित राष्ट्रांतील प्रश्नांपुरते मर्यादित आहे. इतर राष्ट्रांतील प्रश्नांचा त्यात फार विचार नाही.

राष्ट्रीय उत्पादनात दरवर्षी वाढ होत राहिली तरी याचा अर्थ सर्वसामान्य माणसाची आर्थिक स्थिती सुधारली असा होत नाही, हे अर्थतज्ज्ञांच्या आता लक्षात येऊ लागले आहे. केंब्रिज विद्यापीठाचे डॉ. पार्थ दासगुप्ता म्हणतात, वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नाचे फायदे अविकसित राष्ट्रांत सर्वांपर्यंत पोहोचत नाहीत. कारण शिक्षण, आरोग्य, कसब तसेच दळणवळणाची साधने, बँका, इन्शुअरन्स अशा सोयी अविकसित असतात. त्यामुळे वर्षानुवर्षे अर्धपोटी राहून जगणारे लोक अशा राष्ट्रांत बरेच असतात. अर्धपोटी लोकांची कार्यक्षमताही कमी असते, त्यामुळे त्यांना वेतन कमी मिळते आणि त्यामुळे ते अर्धपोटीच राहतात. या दुष्टचक्रातून अनेकांची सुटकाच होत नाही.

पुरेसे वेतन मिळाले नाही तरी अर्धपोटी अवस्थेत अनेक लोक वर्षानुवर्षे जगू शकतात कारण त्यांच्या बऱ्याचशा प्राथमिक गरजा निसर्गातून भागविल्या जात असतात. एन्.एस्. जोधा यांनी राजस्थान आणि हिमालयातल्या काही भागांतील खेड्यांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, त्यांच्या रहिवाशांच्या एकूण उत्पन्नापैकी १५ ते २५ टक्के उत्पन्न त्यांना निसर्गातून मिळते. राष्ट्रीय विकास कार्यक्रमांमुळे मात्र या निसर्ग-संपत्तीचा ताबा सरकारकडे आणि सरकारकडून खाजगी उद्योग-समूहांकडे पुष्कळदा हस्तांतरीत होतो. यामुळे अनेक लोकांचा जीवनाधार नष्ट होतो. त्यामुळे डॉ. दासगुप्ता शेवटी अशा निष्कर्षाप्रत येतात की, आर्थिक विकासाचे कार्यक्रम आखताना गरिबांची उन्नती, पर्यावरण रक्षण व संवर्धन यांवर अवलंबून आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

गरीब, अविकसित राष्ट्रांतील बहुसंख्य लोक निसर्गावर अवलंबून असतात हीच गोष्ट ते कायमचे गरीब राहण्यास कारणीभूत ठरते, असेही डॉ. दासगुप्ता सांगतात. साध्यासुध्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

गोष्टी करण्यासही भरपूर श्रमशक्ती लागते. सरपण मिळविणे, पाणी आणणे यांतच दिवसाचा बराच भाग खर्च होतो. पुष्कळदा ही कामे मुलांवर सोपविण्यात येतात. सेन्टर फॉर सायन्स ॲन्ड एन्व्हायरन्मेंट या दिल्लीच्या संस्थेला आढळलं की हिमालयात १० ते १५ वर्षांची मुलं-मुली वडिलधाऱ्या माणसांपेक्षा दीडपट काम उठवितात.

रोजचं काम करण्यासाठी जास्त 'हातांची' गरज नेहमीच भासते कारण निसर्ग-संपत्ती वेचण्यासाठी दरवर्षी जास्त श्रम वेचावे लागतात. अशा लोकांमध्ये सामाजिक चालीरीती अशा असतात की मुले वाढविण्याचा खर्च पूर्णपणे त्यांच्या आई-वडिलांवर पडत नाही तर संयुक्त कुटुंबपद्धती किंवा संपूर्ण जमात यांमध्ये तो विभागला जातो. त्यामुळे मुले वाढविण्याच्या खर्चाचा विचार होत नाही. मुलं होतच राहतात, लोकसंख्या वाढत राहते, निसर्ग-संपत्तीचा ऱ्हास चालूच राहतो आणि श्रमशक्तीची गरज वाढतच राहते. हे दुष्टचक्र असे चालू राहते.

राष्ट्रीय उत्पन्नात या गोष्टींची दखल घेतली जात नाही. आर्थिक विकासामुळे अन्नधान्यांचे एकूण उत्पादन वाढलेले दिसते, बालमृत्यूंचे प्रमाण कमी होऊन आयुर्मर्यादा वाढल्याचे दाखविता येते. साक्षरतेचे प्रमाण वाढल्याचेही दिसते. पण सर्व उत्पादनाचा पाया अशा निसर्ग-संपत्तीचे आरोग्य कोणत्याच अधिकृत आकडेवारीतून प्रतिबिंबित होत नाही. उदाहरणार्थ, दरडोई उत्पन्नातली वाढ निसर्ग-संपत्तीचा ऱ्हास करून साधली जात आहे, हे लक्षात येत नाही. शेतीच्या उत्पादनातली वाढ जमिनीची सुपीकता आणि नद्या-ओढे आणि भूगर्भातील पाण्याचे साठे यांचा नाश करून साध्य होत आहे, ही गोष्ट स्पष्ट होत नाही. निसर्ग-संपत्तीच्या ऱ्हासाची किंमत लक्षात घेतली जात नाही, खर्चाच्या बाजूला दाखविली जात नाही; त्यामुळे खर्च कमी, उत्पन्न जास्त असे खोटे चित्र दिसते. निसर्ग-संपत्ती काटकसरीने वापरण्याचा प्रश्नच येत नाही, ती काटकसरीने वापरली जाईल अशी तंत्रे शोधली जात नाहीत, प्रचारात येत नाहीत आणि निसर्गाचा ऱ्हास राष्ट्रीय विकासाचा पायाच डळमळीत करतो.

आजचे निसर्गसमृद्ध देश अविकसित, गरीब, दरिद्री समजले का जातात याचे उत्तर हे असे आहे. निसर्ग-संपत्तीची किंमत राष्ट्रीय उत्पन्नात धरली जात नाही तर त्यापासून मिळणाऱ्या उत्पादनाची फक्त धरली जाते. त्या उत्पादनांमुळे निसर्गसंपत्तीचा जो ऱ्हास होतो, ती किंमत धरली जात नाही. ही किंमत धरली तर राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्न घटेल हे खरे, पण निसर्ग-संपत्ती काटकसरीने वापरण्यावर आणि तिचा होणारा ऱ्हास भरून काढण्यावर विशेष लक्ष दिले जाईल, त्यासाठी नवीन तंत्रे प्रचारात येतील. शिवाय, अस्तित्वात असलेल्या निसर्ग-संपत्तीच्या साठ्याची योग्य किंमत विचारात घेतली तर राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात वाढ झालेली दिसेल. आपण दरिद्री आहोत आणि आणखी बरीच वर्षे तसेच राहणार आहोत अशी जी मानसिकता आज या राष्ट्रांत दिसते, ती नाहीशी होण्यास मदत होईल. निसर्ग-संपत्ती हाच आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा प्रमुख भाग आहे, हे जनतेला प्रकर्षाने जाणवेल व तिच्या संरक्षणात आणि संवर्धनात जनता उत्साहाने भाग घेईल.

आज चित्र असे दिसते आहे की निसर्ग-संपत्तीला फार महत्त्व देण्याचे कारण नाही कारण तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे मानवनिर्मित संपत्ती हा निसर्ग-संपत्तीला पूर्ण असा पर्याय निर्माण होऊ शकतो, असा समज सर्वत्र आहे. त्यामुळे रस्ते, लोहमार्ग, विमानतळ, धरणे, कारखाने, खाणी, शहरांची वाढ अशी मानवनिर्मित संपत्ती निर्माण करताना निसर्गाच्या होणाऱ्या नाशाचा फक्त लाक्षणिक विचार केला जातो. नैसर्गिक वनांचा नाश हजारो झाडे लावून भरून काढता येईल, हा सार्वत्रिक समज हे याचे उत्तम उदाहरण. मात्र नैसर्गिक संपत्तीच्या माध्यमातून निसर्ग काही पायाभूत सुविधा पुरवीत असतो त्या पुरविणे तंत्रज्ञानाला शक्य नाही; आणि उद्या जरी ते शक्य झाले तरी त्यासाठी एवढा खर्च येईल की जगातल्या एक टक्काही लोकसंख्येला त्यांचा फायदा मिळणार नाही. हवामान, पिण्यायोग्य पाणी, पिकायोग्य जमीन, मलमूत्र, घाण पचविण्याची क्षमता या त्या काही पायाभूत सुविधा आहेत.

अर्थतज्ज्ञांच्या नजरेतून या गोष्टी पूर्णपणे सुटल्या आहेत असे नाही. त्यावर उपायही सुचविले जातात. उदाहरणार्थ, निर्णयप्रक्रियेत लोकांचा जास्त सहभाग, सत्तेचे विकेंद्रीकरण, विकास-कार्यक्रमांचे आयोजन आणि व्यवस्थापन लोकांवर सोपविणे, निसर्ग-संपत्तीचा प्रत्यक्ष वापर करणाऱ्यांच्या हातात तिचे व्यवस्थापन सोपविणे, महिलांना सुशिक्षित, सक्षम करून त्यांच्या हातात काही निर्णय सोपविणे वगैरे.

दुसरीकडे, प्रदूषण थांबविण्यासाठी निरनिराळे कायदे अस्तित्वात आले आहेत. त्यामुळे कारखान्यातील कचरा, सांडपाणी यांची प्रक्रिया करून विल्हेवाट लावावी लागत आहे. शेतीतून, मळ्यातून, शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगांतून

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जे पाणी पाझरते ते मात्र तसेच राहते किंवा इतरत्र पसरते आणि परिसर प्रदूषित करते. नवीन विकास कार्यक्रमांची सुरुवात करण्यापूर्वी, त्याचे तात्कालिक आणि दूरगामी पर्यावरणीय परिणाम काय होतील याचा अभ्यासही काही विशिष्ट भांडवली मर्यादेच्यावर कायद्याने आवश्यक बनला आहे. हवेच्या प्रदूषणाची मापके ठरली आहेत. यांत्रिक पद्धतीने होणाऱ्या मासेमारीवरही काही बंधने आहेत. पण या सर्व बंधनांची अंमलबजावणी शिथिल आहे. उत्पादकाला ती पाळायला नको आहेत कारण त्यामुळे उत्पादन-खर्च वाढतो. सरकारला-शासनाला त्यात रस नाही कारण त्यामागे जनमताचा रेटा नाही, मोठ्या प्रमाणावर मते गमविण्याचे भय नाही!

यामुळे प्रदूषण — हवेचे, पाण्याचे, जमिनीचे, भूगर्भातील पाण्याच्या साठ्यांचे — सतत वाढत आहे. ते पचविण्याची नैसर्गिक परिसंस्थांची शक्ती क्षीण होत आहे. ते पचवून पुन्हा सक्षम होण्यास या परिसंस्थांना जो कालावधी लागतो त्यामध्ये वाढ होत आहे. उदाहरणार्थ, अतिपावसाच्या ज्या प्रदेशातले जंगल पूर्ण तुटले आहे आणि दगड उघडा पडला आहे तिथला माणसाचा हस्तक्षेप पूर्ण थांबला तरी पूर्वीच्या जंगलाचे पुनरुज्जीवन होण्यास कमीत कमी हजार वर्षे सहज लागतील. ओढे, नद्या आणि पृष्ठभागावरील इतर प्रवाह ज्या वेगाने आज प्रदूषित होत आहेत ते पाहिले आणि हे प्रदूषण थांबविण्याबाबतची कृतिशून्यता बघितली तर येत्या शंभर वर्षांतही हे प्रदूषण दूर होणार नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. प्रदूषणाच्या खाईत दीर्घ कालपर्यंत खितपत पडण्याची तयारी समाजाने करायला हवी, असे आजच्या परिस्थितीवरून म्हणावेसे वाटते.

एवढेच नव्हे तर आजची आर्थिक घडी अशा तऱ्हेने बसविली जात आहे की माणूस जगविण्याचा खर्च दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. याचाच अर्थ असा की अनेकांना जगणे अशक्य होणार आहे. त्यांच्या नशिबी आहे आत्यंतिक भूक, आत्महत्या किंवा आजची आर्थिक घडी ज्या हिंसेला जन्म देत आहे त्यात सामील होऊन हत्या करणे किंवा हत्येचा स्वत: बळी ठरणे! या गोष्टी प्रत्यही अनुभवाला येत आहेत.

आजच्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल झाला तरच या गोष्टी टाळता येतील. आजची अर्थव्यवस्था एकदा रुजली की मनुष्यातले माणूसपण संपविण्याच्या प्रथम ती मागे लागते. माणसाच्या मनाचा कब्जा घेतला की तिचा मार्ग निरकुश होतो आणि माणसे तिचे वर्चस्व आपल्यावर अधिकाधिक बसवून घेण्याच्याच मागे लागतात; विवेकशून्य बनतात. अर्थव्यवस्थेची बेलगाम सत्ता म्हणजेच आपली उन्नती असे धरून चालतात!

यातला फोलपणा सिद्ध करायचा असेल तर आजच्या अर्थव्यवस्थेचा पाया नीट तपासला पाहिजे; तिचे अस्तित्वच किती अशास्त्रीय आहे हे कळले तर माणूस तिच्या आहारी सहजासहजी जाणार नाही, तिला बेलगाम होऊ देणार नाही.

आजच्या अर्थव्यवस्थेचा जन्म यंत्रशक्तीच्या मदतीने झालेला आहे. निसर्ग-संपत्तीचे परिवर्तन यंत्रे वेगाने आणि मोठ्या प्रमाणावर करतात, त्यासाठी भरपूर ऊर्जा वापरतात. हे परिवर्तन होताना अविनाशी ऊर्जा पुन्हा वापरता न येणाऱ्या रूपात वातावरणात मिसळते. शिवाय हे परिवर्तन शंभर टक्के परिपूर्ण कधीच होत नाही. उपयुक्त पदार्थ तयार होताना कचरा व टाकाऊ पदार्थांची निर्मिती होते. जोपर्यंत नैसर्गिक परिसंस्था या गोष्टी पचवू शकत असतात तोपर्यंत माणसाच्या जीवनावर फारसा परिणाम होत नाही. पण सतत होणाऱ्या परिवर्तन क्रियेमुळे टाकाऊ पदार्थांचे प्रमाण सतत वाढत राहिले तर या परिसंस्था कचरा विघटित करू शकत नाहीत आणि तो साचत राहतो.

परिवर्तन क्रियेमध्ये जसे टप्पे वाढत जातात तसा खर्चही वाढत जातो. मुळात यंत्रे तयार करण्यासाठी भांडवल लागते. तंत्रज्ञान विकसित व्हावे लागते. पश्चिम युरोपातील दर्यावर्दी राष्ट्रांनी व्यापाराच्या जोरावर संपत्ती जमा केली, भांडवल-निर्मिती केली. धर्मसंस्थांचे जोखड झुगारून नवीन तंत्रज्ञानाचा पाया घातला. यंत्रशक्ती आत्मसात केली आणि मजूरवर्ग, कच्चा माल स्वस्तात मिळविला. यामुळे मोठा नफा आणि भांडवल-निर्मिती या देशांत सतत होत गेली. राष्ट्र या टप्प्यावर पोहोचल्याशिवाय शास्त्र आणि तंत्रज्ञान यांची प्रगती होत नाही. या प्रगतीतून खर्च कमी करण्याचे नवे तंत्रज्ञान उभे राहते. पण ही प्रगती साध्य करण्यासही भांडवली खर्च भरपूर लागतो. तांत्रिक प्रगती खर्चिक असते आणि तिच्यासाठी स्वतंत्र भांडवलाची तरतूद करण्यास राष्ट्र समर्थ नसेल तर इतर गोष्टींवरील खर्च कमी करून तंत्रज्ञान पुढे रेटावे लागते. यंत्रशक्तीचा जसा जास्त उपयोग सुरू होतो, तशी खर्च कमी करण्याची निकड आणि नवे तंत्रज्ञान विकसित, आत्मसात करण्याची निकड भासू लागते.

ही निकड भासते कारण परिवर्तन प्रक्रियेचे स्वरूपच असे आहे की, तिच्यावर होणारा खर्च उत्पादित वस्तूच्या मूल्यापेक्षा नेहमीच जास्त राहतो. साध्या भाषेत असे म्हणता

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

येईल की, यंत्रशक्ती वापरून तयार केलेल्या मालांचे मूल्य हे त्यावर केलेल्या खर्चापेक्षा नेहमीच कमी राहते. खर्च भरून येत नाही म्हणून तो भरून काढण्यासाठी निरनिराळ्या प्रकारे धडपड करावी लागते. उत्पादकाला अनेक प्रकारचे खर्च म्हणजेच भांडवली खर्च करावे लागतात हे सर्वश्रुत आहे. जागा मिळविणे, यंत्रे विकत घेऊन तिथे उभी करणे, ऊर्जा आणि कच्चा माल मिळविणे, कुशल तंत्रज्ञ व इतर मजूरवर्ग नेमणे, व्यवस्थापन, वाहतूक, भांडवलव्यवस्था, व्याज आणि वितरणाचा खर्च, टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट लावण्याचा खर्च, उत्पादित वस्तू ग्राहकापर्यंत पोचविण्यासाठी जाहिरातीचा खर्च वगैरे, वगैरे. हे खर्च कमी करण्याचे उपायही सर्वश्रुत आहेत. त्यामध्ये सरकारी अनुदानापासून बाजारपेठेतील स्पर्धा कमी किंवा नाहीशी करण्यासाठी उत्पादक-संघ (कर्टिल) बनविणे आणि प्रतिस्पर्ध्याला विकत घेऊन सामिलीकरण साधण्यापर्यंतच्या सर्व उपायांचा समावेश होतो. या गोष्टी बाजारपेठेत सतत चालू असल्याचेही निदर्शनास येते. यात लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट हीच की उत्पादित वस्तूचा खर्च हा तिच्या मूल्यापेक्षा नेहमीच जास्त असतो. निसर्गसंपत्तीच्या कोणत्याही परिवर्तन प्रक्रियेत (शेती धरून) या मूलभूत गोष्टीपासून सुटका नाही!

यामुळे बाजारात ज्याचे मूल्य नेहमी चढते ठेवता येईल अशा वस्तू उत्पादित करणेच उत्पादकाला परवडते. सर्वसामान्य गरजेच्या वस्तू अशा उत्पादनप्रक्रियेत समाविष्ट होत नाहीत. उत्पादनप्रक्रियेत जे सामील होतात, उदाहरणार्थ, कच्चा माल, फुटकळ गोष्टी पुरविणारे, अकुशल व तंत्रकुशल मंजूर, वाहतूक, वितरण करणारे, यांच्यावरचा खर्च कमी करण्याची निकड असल्याने त्याच्या खिशात फार लाभ उत्पादनप्रक्रियेपासून पडत नाही. त्यामुळे उत्पादित वस्तू परवडणाऱ्या, त्या खरेदी करू शकणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत वाढ होत नाही, शिवाय उत्पादनपद्धतीमध्ये मनुष्यबळापेक्षा यंत्र वापरणे उत्पादकाला नेहमीच सोयीचे व स्वस्त पडते. त्यामुळे यंत्रांचा उपयोग जसा वाढतो तसा सर्वसामान्य मजूर तर बाद होतोच पण कसबी, तंत्रज्ञ असेही लोक कमी संख्येने लागतात. म्हणजेच आजच्या उत्पादनप्रक्रियेत दोन मूलभूत विसंगती अनुस्यूत आहेत : खर्च सतत वाढत राहणे आणि उत्पादनप्रक्रियेपासून लाभ मिळणाऱ्यांची संख्या सतत घटत राहणे.

यांपासून सुटका करून घेण्यासाठी उत्पादक वर्ग बाजारपेठेचे स्वरूप असे ठेवतो की जी ग्राहकाचे शरीर आणि मन यांवर ताबा मिळवून, त्याला अंकित करून घेऊन उत्पादित वस्तू विकत घेण्यास त्याला उद्युक्त करील, भाग पाडील! शिवाय, ज्या वस्तू विकत घेण्यास ग्राहकाला उद्युक्त केले जाते त्या प्राथमिक गरजेच्या नसून, या गरजा भागल्यानंतर ग्राहक ज्या गोष्टींचा विचार करू शकेल अशा असतात. या अतिरिक्त वस्तू निर्माण करण्यावर, त्यांची जाहिरात करून त्या ग्राहकापर्यंत पोचविण्यावर आणि निरनिराळी आमिषे दाखवून या वस्तू त्याला खरेदी करायला लावण्यावरच उत्पादकांना भरपूर अतिरिक्त खर्च करावा लागतो आणि तो कमी करण्यासाठी वर उल्लेखिलेले उपाय योजावे लागतात आणि मूल्य चढते राहण्यासाठी नवनवीन अतिरिक्त वस्तू बाजारात आणाव्या लागतात. असेही दुष्टचक्र चालू राहते. जागतिकीकरण, उदारीकरण यांमुळे या चक्राची, या जाळ्याची लांबी, रुंदी, व्याप्ती वाढत राहते, उत्पादनप्रक्रियेतील लाभापासून वंचित होणाऱ्या लोकांची संख्याही वाढत राहते आणि सामाजिक, आर्थिक विषमता तीव्र होते.

या दुष्टचक्रातून बाहेर पडायचे तर अर्थव्यवस्था अशी हवी की ती बाजारपेठेला बेलगाम होऊ देणार नाही, माणसावर वर्चस्व गाजवू देणार नाही. उलट विवेकी समाजच तिच्यावर आपले नियंत्रण ठेवील, योग्य जागी तिला लगाम लावील. अशी अर्थव्यवस्था आणि नीती कशी प्रत्यक्षात येईल?

नवी अर्थनीती : २

नवी अर्थव्यवस्था अशी हवी की ज्यामध्ये बाजारपेठेवर विवेकी समाजाचे नियंत्रण राहील. कोणत्या वस्तूंचे उत्पादन करायचे आणि त्याचे वितरण कसे करायचे हे समाजाचा विवेक ठरवील, बाजारपेठ नव्हे. अशा समाजात सभोवतालच्या नैसर्गिक-भौगोलिक परिस्थितीचे परिपूर्ण ज्ञान आणि संकलन असेल; अस्तित्वात असलेल्या नैसर्गिक संपत्तीचे साठे, त्यांची प्रत, त्यांचे उपयोग आणि तिचा चिरंजीवी बापर कसा करायचा हे ओळखण्याची कुवत आणि समज असेल; प्रदूषण टाळून या नैसर्गिक संपत्तीचे परिवर्तन करण्याची तंत्रे आणि यंत्रशक्ती समाजाने विकसित केलेल्या असतील आणि त्यांना अनुसरून आपल्या गरजांचे मूल्यमापन केलेले असेल.

नवी अर्थव्यवस्था अशी हवी की क्रयशक्तीचे (परचेसिंग पॉवर) वितरण समाजात व्यवस्थित राखले जाईल आणि त्यामध्ये फार विषमता असणार नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

खेडी आणि त्यांचा परिसर यांचे नियोजन व्यवस्थित असेल, त्यामधून सर्वसामान्यांच्या प्राथमिक गरजा अल्प खर्चात, वा विनामूल्य भागत असतील; आणि गावाच्या प्राथमिक गरजा प्राधान्याने भागवील अशी शेती, सर्वसामान्यांना काम मिळेल असे उत्पादन, त्यावरील प्रक्रिया करणारे आणि त्यांची देखभाल करणारे, त्यापासून होणारे प्रदूषण रोखणारे उद्योग (सर्व्हिस इंडस्ट्रीज) गावात आणि गावाच्या परिसरात असतील, तर सर्वसामान्यांचा खर्च कमी राहून शिल्लक उरेल आणि त्यांच्या हातात क्रयशक्ती राहील. खरं तर, आद्य अर्थवेत्ता ॲडॅम स्मिथपासून जॉन मेनर्ड केन्स या अलीकडच्या सुप्रसिद्ध अर्थवेत्त्यापर्यंत अनेकांनी अशा अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केलेला आहे. ते म्हणतात, वस्तूंचे उत्पादन स्थानिक कच्च्या मालावर आधारित, स्थानिक भांडवलाचा उपयोग करून आणि स्थानिक बाजारपेठेसाठी मुख्यतः झाले पाहिजे. लांबवरून कच्चा माल आणायचा, कर्ज घेऊन भांडवल उभे करायचे आणि परदेशी बाजारपेठेसाठी माल मुख्यतः निर्माण करायचा, अशी अर्थव्यवस्था असेल तर तिचा पाया नेहमीच डळमळीत राहील. आज मात्र हा शहाणपणाचा सल्ला अर्थतज्ज्ञ विसरलेले दिसतात.

राळेगण सिद्धी, आडगाव अशा ठिकाणी जे प्रयोग झाले, त्यांमध्ये यांपैकी काही गोष्टी साध्य झाल्या; पण गावातील जनतेच्या प्राथमिक गरजा भागवून बाजारपेठेपासून तिला मुक्त करण्याचे सुस्पष्ट धोरण तेथेही नव्हते, असे म्हणावे लागते. गावापुरते अन्नधान्य, भाजीपाला, दूध या गोष्टी गावातच निर्माण होतील, त्यासाठी बाजारपेठेवर अवलंबून राहता येणार नाही असे धोरण जाणूनबुजून हवे. त्या दृष्टीने उत्तर महाराष्ट्रातील फड पद्धती जास्त योग्य वाटते. त्यामध्ये पाणीच नव्हे तर प्राथमिक गरजांना आवश्यक अशी पिके आणि नगदी पिके आळीपाळीने शेतकरी घेतात. त्यामुळे या दोन्ही गोष्टींचे प्रमाणशीर उत्पादन होऊन गावाच्या गरजा भागतात; आणि नगदी पिकांमुळे शेतकऱ्याला पैसा या स्वरूपात उत्पन्न मिळते. या व्यवस्थेला योग्य वितरण व्यवस्थेची, माल बाजारपेठेकडे पाठविण्याच्या योग्य व्यवस्थेची जोड द्यायला हवी. हातात आलेल्या पैशाचा शेतकरी मग भांडवली गुंतवणुकींसाठी उपयोग करू शकतील.

मग प्रश्न असा की आपल्याकडे अशी उदाहरणे, अशा परंपरा असताना त्या सार्वत्रिक का होत नाहीत? माझ्या मते या गोष्टी होत नाहीत कारण शिक्षणामुळे बदललेली आपली मानसिकता. गावाच्या प्राथमिक गरजा गावातूनच भागविणे याचा अर्थ असा की बाजारपेठेचा गावातील प्रवेश मर्यादित करणे. मूलभूत गरजा बाजारपेठ एक तर पुरवू शकत नाही किंवा चढ्या किंमतीतच पुरवू शकते, या गोष्टीची सार्वत्रिक जाण असणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या शिक्षणपद्धतीत बाजारपेठेला अवास्तव महत्त्व आहे. तिच्या गरजा भागविण्यासाठीच शिक्षण दिले जाते आणि घेतले जाते. अर्थातच, ज्या गोष्टीत भरपूर फायदा आहे, ज्यामध्ये बाजारपेठेच्या अस्तित्वाचे सर्व खर्च भरून निघतात, अशाच गोष्टींच्या उत्पादनात बाजारपेठ व्यस्त असते. अशीच उत्पादने बाजारपेठेत चालतात. त्यामुळे ज्यामध्ये नफा कमी अशी उत्पादने बाजारपेठेत टिकत नाहीत. ती बाजारपेठेकडून वेगळी करून त्यांची स्वतंत्र उत्पादनव्यवस्था गावाने जाणीवपूर्वक स्वीकारायला पाहिजे. तशीच त्यांची वितरणव्यवस्थाही स्वीकारली गेली पाहिजे. आजच्या शिक्षणात या गोष्टी क्वचितच सामाविल्या जातात. आपल्या गावात सहकार्य टिकते जिथे गाव एकसंध असेल तिथे; जाती, जमाती, स्पृश्यास्पृश्य असे भेद कमीत कमी असतील तिथे. पण गाव स्वयंपूर्ण करण्याची मानसिकता शिक्षणात पहिल्यापासूनच समाविष्ट केली, तशी धोरणे पंचायत पातळीवर आखली गेली तरच आजच्या दारिद्र्यरेषेखालील जनतेला अन्नधान्य व इतर गोष्टी माफक दरात पुरविण्याचा प्रश्न सुटेल, तिचे दारिद्र्य दूर होण्याची क्रिया सुरू होईल. निव्वळ सरकारी अनुदानाने किंवा प्रचंड खर्च करून धान्याचे साठे राखण्याने हे प्रश्न सुटण्यासारखे नाहीत. प्राथमिक गरजा भागविण्याची पायरी गाळून, आधुनिक शेतीकडे, तांत्रिक शेतीकडे, भरपूर उत्पन्न देणाऱ्या शेतीकडे वळणे आणि परिसर प्रदूषित करणे आणि बाजारपेठेला जखडून घेऊन भरपूर संपत्ती मिळविण्याची स्वप्ने पाहणे, हे योग्य नव्हे. बाजारपेठेवर गावाचे नियंत्रण हवे, गावावर बाजारपेठेचे नियंत्रण असता कामा नये. योग्य शिक्षण, योग्य मानसिकता असेल तरच या गोष्टी शक्य होतील.

खेड्यांच्या परिसरातील नैसर्गिक विविधतेकडे लक्ष देण्याऐवजी आजचे तज्ज्ञ, नेतेमंडळी, प्रशासक तिथे संगणक पोहोचविण्याला प्राधान्य देतात. यामध्ये त्यांची सतत परदेशांकडे पाहण्याची, झोळी पसरण्याची वृत्तीच दिसते. खेड्यांची सुधारणा झाली पाहिजे, खेड्यांत उद्योग-नोकऱ्या निघाल्या पाहिजेत, त्यामुळे शहरांकडे धाव घेणाऱ्यांचा ओघ थांबेल, असे आपण नेहमी म्हणतो. पण प्रत्यक्षात अशा गोष्टी घडत नाहीत,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

कारण परिसरातील नैसर्गिक विविधतेचे महत्त्व, तिच्यातील सुप्त शक्ती आपण जाणलेली नाही. ती नष्ट करून त्या जागी मानवनिर्मित संपत्ती स्थापन करण्याचेच उद्योग आपण करीत असतो. शहरातील जीवनपद्धतीच आपण खेड्यांवर लादण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे शहरातील चैनीच्या वस्तू आणि इतर विकृती खेड्यांत पसरून सर्वसामान्यांचा श्रमशक्तीवरचा विश्वास उडतो. श्रम करणाऱ्यांची, मजुरांची टंचाई खेडेगावातूनही आज जाणवते आहे; आणि या छुप्या बेकारांचा भार आजूबाजूच्या निसर्गावरच पडत आहे. परिणामी निसर्गाचा नाश वाढतो आहे.

नव्या अर्थनीतीने खेडी आणि त्यांच्या परिसरातील निसर्ग, निसर्ग-संपत्ती, जैविक विविधता यांच्या पुनरुज्जीवनावर भर दिला पाहिजे. निव्वळ शेतीवरं नव्हे! नद्यांच्या उगमाजवळच्या जंगलाचे पुनरुज्जीवन, संरक्षण व योग्य व्यवस्थापन डोंगरातील झरे व प्रवाह आणि त्यांच्या परिसरातील निसर्ग यांना अग्रक्रमाने अर्थसहाय्य हवे. तेथील रानाची, जंगल तोडून केली जाणारी शेती थांबवून या शेतकऱ्यांना जंगल वाचविण्यात सामील करून घेऊन, त्यांना अर्थसहाय्य दिले पाहिजे. जंगलात बेबंद चरणारी गुरे गोठ्यात बांधण्यास आर्थिक प्रोत्साहन दिले पाहिजे. जंगल वाचल्याने पाण्याचे झरे बारमाही राहून गावाची, पिण्याच्या पाण्याची गरज भागेल. खेड्यांच्या परिसरातील जमिनींचे नियोजन असे हवे की त्यामध्ये धान्ये, भाज्या, फळफळावळ, चारा, सरपण, इमारती लाकूड अशा आवश्यक वस्तूंचे उत्पादन अग्रक्रमाने होईल आणि सरकारी मदत मुख्यतः या गोष्टींना मिळेल. खेड्यातील सांडपाणी, कचरा यांची विल्हेवाट प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने झाली पाहिजे. त्यामधूनही नैसर्गिक पुनरुज्जीवनास मदत झाली पाहिजे. खेड्यातील झरा, ओढा यांची पात्रे पर्यावरणदृष्ट्या सुदृढ राखणे व त्यातील पाणी शुद्ध ठेवणे यांस अग्रक्रम हवा. खेड्याच्या परिसरातील नैसर्गिक विविधता, तिचे ज्ञान. तिचे संरक्षण, संवर्धन व चिरंजीवी वापर या गोष्टींना शिक्षणात अग्रक्रम हवा. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम, सर्वसामान्यांकडे योग्य प्रमाणात क्रयशक्ती राखण्यामध्ये दिसून येईल. सर्वसामान्यांना क्रयशक्ती (परचेसिंग पॉवर) उपलब्ध होईल जेव्हा आपल्या प्राथमिक गरजा विनामूल्य वा कमी खर्चात निसर्गातूनच भागविल्या जातात, बाजारपेठेकडून नव्हे, हे म्हणणे त्यांना पटेल तेव्हा!

उद्योजकांनीही सर्वसामान्यांची क्रयशक्ती वाढविण्याचे महत्त्व ओळखले पाहिजे. ही क्रयशक्तीच उद्योगांना चिरंतन स्वरूपाचे वरदान ठरेल. क्रयशक्तीचे वाटप समाजात आज योग्य नसल्याने उद्योजकांना उंची, चैनीच्या उपभोगांच्या व म्हणून किंमती जास्त असलेल्या वस्तूंचे निर्माण करणे फायद्यात पडते. क्रयशक्तीचे आजचे वितरण बदलेल तेव्हा अशा वस्तूंच्या उत्पादनांचे प्रमाण कमी होईल. समाजातील लालसा, उपभोगवृत्ती कमी होईल. समाजातील लालसा, उपभोगवृत्ती वाढविण्याचे उद्योजकांना कारण राहणार नाही. बेबंद बाजारपेठेला आळा बसेल. चंगळवाद फोफावणार नाही. उद्योजकांनी नैसर्गिक विविधतेच्या पुनरुज्जीवनाला म्हणूनच जास्तीत जास्त उत्तेजन दिले पाहिजे. ज्यामुळे सर्वसामान्यांची क्रयशक्ती वाढेल (त्यांच्या हातात खर्च वजा जाता शिल्लक उरेल) असा योजना ग्रामीण भागांत सुरू केल्या पाहिजेत.

सर्वसामान्यांची क्रयशक्ती हाच अर्थव्यवस्थेचा पाया होय. त्यासाठी निसर्ग, नैसर्गिक विविधता सुदृढ हवी. भारत निसर्गप्रधान आहे; त्यात या गोष्टी साध्य करणे मुळीच अशक्य नाही. शिक्षणातून हा सार्वत्रिक विश्वास बळावला पाहिजे, या गोष्टी साध्य करण्याची तंत्रे सतत विकसित झाली पाहिजेत. नवी अर्थनीती तेव्हाच उभी राहील. परकीयांचे सतत अनुकरण करून नव्हे!

नैसर्गिक विविधता, स्वच्छ हवा, शुद्ध पाणी व आरोग्यदायक वातावरण; सरपण, चारा, इमारती व इतर लाकूड यांची व्यवस्थित उपलब्धता; विविध कच्च्या मालांचे उत्पादन व विविधांगी शेती; नैसर्गिक विविधतेवर आधारित प्रक्रियाउद्योग; या सर्वांची देखभाल होईल असे व्यवसाय व सर्व्हिस इंडस्ट्रीज; आणि या सर्वांस आवश्यक असे शिक्षण; अशी व्यवस्था सर्वत्र निर्माण झाली तर कारखानदारीचे व शहरातील उद्योगांचे स्वरूपही पालटेल. भक्कम ग्रामीण व्यवस्थेला पूरक म्हणून शहरातील उद्योग राहतील. ग्रामीण व्यवस्था शहरांना पूरक राहणार नाही. आज नेमकी हीच स्थिती आहे. त्यामुळे ग्रामीण व्यवस्था शहरांच्या चैनी पुरविण्यासाठी आज मुख्यतः राबविली जाते. त्यामुळे शहरांची सतत वाढ होत राहते. शहरातले पर्यावरण, आर्थिक, सामाजिक, राजकीय वातावरण बिघडत जाते आणि गुन्हेगारी हा समाजाचा अविभाज्य भाग बनतो.

नव्या अर्थनीतीचा स्वीकारच समाजाला या रोगट अवस्थेतून मुक्त करू शकेल!

**

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ग्रामीण विकासनीती*

मिलिंद बोकील

ग्रामीण विकासनीतीची चर्चा करायची म्हटली की कुणाच्याही मनात प्रथम हाच प्रश्न येईल की ही चर्चा करून उपयोग आहे का? कारण आपल्या समाजाचे झपाट्याने शहरीकरण होत आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात आजच ४० टक्क्यांहून जास्त लोकसंख्या शहरात राहते. पुढच्या वीस-पंचवीस वर्षांत हे प्रमाण आणखीनच वाढेल. आजमितीस जवळ जवळ सर्व खेड्यांमध्ये रस्ते, वाहने, वीज आणि टेलिव्हिजन पोहोचलेले आहेत. अनेक ठिकाणी नळाचे पाणी व स्वयंपाकाचा गॅसही पोहोचलेला आहे. पुढच्या पाच-दहा वर्षांत त्यामध्ये मोबाइल फोन, एटीएम यंत्रे आणि कॉम्प्युटर्सची भर पडणार आहे. सिमेंट, स्टील आणि प्लॅस्टिक पोहोचून तर अनेक वर्षे झाली. केवळ तालुक्याची गावेच नाही तर वीस-पंचवीस हजार वस्तीचे कोणतेही गाव शहर मानावे अशी आज परिस्थिती आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण लोकांच्या आशा-आकांक्षा ह्या शहरी लोकांप्रमाणेच होत आहेत. ग्रामीण व शहरी समाजरचनेतील आणि मनोवृत्तीतील फरक दिवसेंदिवस मिटत जाणार आहे.

ह्या सर्व घडामोडी होत असल्या तरी ज्या मुख्य गोष्टीवरून ग्रामीण व शहरी असा भेद होतो — म्हणजे शेतीवरचे अवलंबन — ती अद्याप शाबूत आहे. सध्याच्या व्याख्येप्रमाणे पाच हजारांपेक्षा जास्त वस्ती, नगरपालिकेसारखे प्रशासन आणि ७५ टक्क्यांहून जास्त लोकसंख्या बिगर-कृषी व्यवसायांवर अवलंबून असेल तर त्या भागाला शहरी भाग म्हणतात. यातील पहिल्या दोन अटींची पूर्ती होणे कठीण नाही. पण शेतीवरचे अवलंबून मात्र इतके कमी झालेले नाही. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधील शेतीचा सहभाग कमी कमी होत असला तरी अद्यापही फार मोठ्या संख्येने लोक शेतीवर अवलंबन आहेत. कृषिक्षेत्र हेच रोजगार पुरवणारे सर्वात मोठे क्षेत्र आहे. त्यामुळे शहरातल्या सुखसोयी जरी पोहोचल्या तरी शेती हे ग्रामीण भागाचे जे अंगभूत वैशिष्ट्य ते पुढची निदान पंचवीस वर्षे तरी टिकून राहीलच. ह्या कारणाने ग्रामीण विकासनीतीची चर्चा स्वतंत्रपणे करणे योग्य आहे.

शेती हीच गाव आणि शहर यामधली विभाजक रेषा आहे. हे लक्षात घेतले म्हणजे विकासनीतीची चर्चा करण्यास एक दिशा मिळते. भारतातील किंवा विशेषतः महाराष्ट्रातील शेतीच्या समस्या दोन : लहान जमिनी आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य. ब्रिटिश राजवटीच्या काळात ग्रामीण उद्योगधंद्यांची वाताहत झाल्याने शेतीवरचा माणसांचा बोजा वाढला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जमीन मालकीत सुधारणा करून आणि कारखानदारी उद्योगांची वाढ करून तो बोजा कमी करण्याचे प्रयत्न झाले पण ते पुरेसे यशस्वी झाले नाहीत कारण कारखानदारीची वाढ मंद राहिली आणि लोकसंख्या बेसुमार वाढली. प्रत्येक पिढीत जमिनीची विभागणी झाल्याने जमिनीचे कुटुंबागणिक असणारे प्रमाण झपाट्याने घसरत गेले. आजमितीस महाराष्ट्रातील ६५ टक्के शेतकरी खाती ही पाच एकरांच्या खालची आहेत आणि त्यांची जमीन धारणा दोन एकर आहे. पुढच्या पिढीत ती आणखी कमी होईल.

दुसरी समस्या म्हणजे ही शेती मोसमी पावसावर अवलंबून आहे. हा पाऊस लहरी आहे तसाच अपुराही. त्यामुळे महाराष्ट्रासारख्या राज्याचा दोनतृतीयांश भाग हा नेहमीच दुष्काळाच्या छायेत असतो. पाणी अडवण्याचे आणि साठवण्याचे कितीही प्रयत्न केले तरी पर्यावरणामध्ये जो अंगभूत शुष्कपणा आहे त्याचा परिणाम जीवसृष्टीवर होतोच. पर्यावरणातला हा कोरडेपणा दिवसेंदिवस वाढतो आहे.

ह्याशिवाय शेतमालाला मिळणारा अपुरा भाव, राजकीय अर्थव्यवस्थेकडून शेतीचे होणारे शोषण, पारंपरिक शेतीची मर्यादित उत्पादकता आणि शेतीसाठी लागणाऱ्या भांडवलाचा अभाव या कारणांनीही काही अपवाद सोडले तर बहुतेक

---

* महाराष्ट्र फाऊंडेशनच्या विद्यमाने समाज कार्य गौरव पुरस्कार प्रदान करण्याप्रसंगी प्रसिद्ध केलेल्या स्मरणिकेवरून साभार पुनर्मुद्रित

– संपादक

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

शेती आतबट्ट्याची झालेली आहे. शेतीच्या अशा अवस्थेमुळे ग्रामीण भागात दारिद्र्य तर निर्माण झालेच आहे, पण विकासाचे अनेकविध प्रश्नही तयार झाले आहेत. शिवाय जीवनातही एक प्रकारची अस्वस्थता आहे. या अस्वस्थतेचे स्वरूप निरनिराळ्या भागात निरनिराळ्या प्रकारचे आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या दुष्काळी भागांत पाण्याच्या दुर्भिक्ष्यतेमुळे आणि स्थानिक रोजगाराच्या अभावाने अनेक लोकांना स्थलांतर करावे लागते. बीड-उस्मानाबाद जिल्ह्यातले शेतकरी-शेतमजूर वर्षानुवर्षे ऊसतोडणी कामगार म्हणून जगतात. बागायती भागात पाणी आहे पण त्याचा वापर अडाणीपणाने होत असल्याने जमिनी क्षारयुक्त होऊन नापीक तर होत आहेतच पण रासायनिक शेतीमुळे उत्पादनाचा खर्च हाताबाहेर गेलेला आहे. काही ठराविक लोकांच्या ताब्यात सत्ता व संपत्ती एकवटल्यामुळे दंडेली आणि मुजोरपणा वाढलेला आहे. विदर्भासारख्या भरंवशाच्या पावसाच्या प्रदेशात कापसासारख्या पिकाला रास्त दर न मिळाल्याने शेतकरी चिंताक्रांत असतो. कोकणात औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या दबावामुळे शेतजमिनी विकून टाकण्याकडे कल वाढतो आहे. तिथे पर्यावरणाच्या प्रदूषणाचे प्रश्न आहेत ते वेगळेच.

ग्रामीण भागाच्या विकासविषयक समस्यांचा सुटा सुटा विचार करून त्यावर वेगवेगळे उपाय सुचवण्याचे व काही प्रमाणात ते अंमलात आणण्याचे पुष्कळ प्रयत्न झालेले आहेत. उदाहरणार्थ, जमिनीची फार विभागणी होऊ नये म्हणून तुकडेबंदी कायदा आहे आणि एकत्रीकरणाला उत्तेजन दिले जाते. पावसाचे पाणी वाया जाऊ नये म्हणून ठिकठिकाणी बंधारे घालून ते अडवायचे आणि पाणलोटक्षेत्राच्या आधारे त्याचे नियोजन करण्याचे प्रयोग केले जातात. कालव्याच्या पाण्याची उधळपट्टी होते म्हणून ते पाणी मोजून द्यायची व शेतकऱ्यांच्या संस्थांमार्फत त्याचे वाटप करायची कल्पना प्रसारित होते आहे. मुळातच पाणी जमिनीच्या आधारे न देता माणसांच्या गरजांप्रमाणे द्यावे असा विचार मांडला गेला आहे. सावकारांमार्फतचे शोषण थांबावे म्हणून सहकारी चळवळीचा उदय होतो. पण त्या सहकाराने पुरुषवर्ग जेव्हा कर्जबाजारी व नादार बनतो तेव्हा मग स्त्रियांच्या बचतगटांची चळवळ सुरू होते. देशी जनावरांची दूध देण्याची क्षमता मर्यादित आहे म्हणून संकरित जनावरांचा प्रसार करण्यात येतो. जंगले उजाड होतात म्हणून कुऱ्हाडबंदी व चराईबंदीचे प्रयोग केले जातात. गावाचे नियोजन हे मुंबई किंवा दिल्लीतून न होता गावकऱ्यांच्या मार्फतच व्हावे म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनेची मान्यता मिळवली जाते व त्यात स्त्रियांसाठी जागा राखीव ठेवल्या जातात. प्राथमिक शाळेतले शिक्षण आनंददायी करण्याचा प्रयत्न केला जातो. गावोगाव स्वच्छता व्हावी म्हणून स्पर्धा भरवल्या जातात. शौचालयांसाठी अनुदान दिले जाते, रासायनिक खतांच्या वापराने जमिनी नापीक बनतात म्हणून नैसर्गिक शेतीची कल्पना पुढे येते. खेडेगावातली फुले-फळे दूरदेशांत निर्यात व्हावी म्हणून थेट विमानसेवा सुरू करण्याचा विचार होतो.

ह्या सगळ्या कल्पना आणि उपक्रमांमागे ग्रामीण भागाच्या विकासाची दृष्टी आहे हे उघड आहे. या प्रत्येक उपक्रमामधून एकेक पाऊल पुढे टाकले जाते आणि ग्रामीण भागातील निरनिराळ्या समस्यांवर उत्तरे शोधली जातात. त्या त्या प्रमाणात ग्रामीण भागातील अस्वस्थता दूर करण्याचा प्रयत्न होतो.

मात्र हे सर्व प्रयत्न सुट्या सुट्या स्वरूपातले आहेत. कधी कधी ते परस्परविरोधीसुद्धा होतात. ह्या सर्व प्रगतिशील उपक्रमांचा, उत्तरांचा व पर्यायांचा समग्रपणे विचार करणे आणि विकासाच्या प्रक्रियेसाठी एक मूलभूत सूत्र शोधणे हे ग्रामीण विकासनीतीचे उद्दिष्ट असायला हवे.

ग्रामीण भागाचे मुख्य लक्षण शेती असल्यामुळे नजीकच्या काळात शेती हा केंद्रबिंदू धरून विकासनीतीची मांडणी करणे आवश्यक आहे. शेतीकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोण, 'शेती ही जगण्याची एक शैली किंवा जीवनपद्धती' असा आहे; तर आधुनिक दृष्टिकोण 'नफा मिळवण्याचा उद्योग' असा आहे. हे दोन्ही दृष्टिकोण सत्य आहेत आणि म्हणून वैधही आहेत. भारत किंवा महाराष्ट्र ही शंभर-दोनशे वर्षांपूर्वीची नवीन वसाहत असती तर कदाचित इथेही तथाकथित आधुनिक दृष्टिकोण रुजला असता. पण इथे ताम्र-पाषाणयुगापासून म्हणजे आठ-दहा हजार वर्षांपासून शेती केली जात असल्याने ती इथल्या लोकांची एक जीवनशैलीच झालेली आहे. इथला सर्व इतिहास, संस्कृती, परंपरा ह्या शेतीशी निगडित आहेत. त्यामुळे पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही दृष्टिकोणांची सांगड घालून शेतीकडे बघणे आवश्यक आहे. कोणत्याही एकाच दृष्टिकोणातून बघणे हे भाबडेपणाचे तर होईलच पण अशास्त्रीयही होईल.

शेतीपुढच्या प्रमुख समस्यांचा विचार करताना लहान जमिनी आणि पाण्याचा तुटवडा यांचा उल्लेख अगोदर केला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आहे. ह्या दोन मुलभूत समस्या सुटल्या म्हणजे शेतीचा प्रश्न सुटेल का? कमीतकमी किती जमीन असली तर शेती परवडेल? हा एक यक्षप्रश्न आहे. त्याचे उत्तर जमिनीची प्रत, हवामान, पाण्याची उपलब्धता, पिकाचा प्रकार, उत्पादनाचा खर्च आणि शेतमालाचा भाव या गोष्टींवर जसे अवलंबून आहे तसेच शेतकऱ्यांच्या गरजा काय यावरही अवलंबून आहे. दोनवेळची भाकरी, वर्षाकाठी दोन लुगडी, एक घोंगडी आणि वहाणांचा एक जोड एवढीच अपेक्षा असली तर दोन एकर कोरडवाहू शेतीही पुरेशी होईल, पण त्या शेतकऱ्याला जर आपल्या मुलीला खाजगी इंजिनिअरिंग कॉलेजला पाठवायचे असेल तर?

हीच गोष्ट पाण्याच्या बाबतीतही आहे. किती पाणी मिळाले म्हणजे शेती परवडेल? महाराष्ट्रातील पाण्याचे समान वाटप केल्यास ग्रामीण भागात माणसी सुमारे १००० घन मीटर पाणी उपलब्ध होऊ शकेल आणि त्या पाण्याने प्रत्येकी अर्धा एकर जमीन आठमाही सिंचनाखाली येऊ सकेल असे गणित कै. विलासराव साळुंखे यांनी मांडले होते. समान पाणी वाटप केल्यास महाराष्ट्राच्या जलसिंचनाची व्याप्ती वाढेल हे खरे आहे. त्यामुळे दुष्काळाची तीव्रता आणि सामाजिक विषमताही कमी होईल. पण तरीही सगळ्यांची शेती व्यवहार्य होईल का हा प्रश्न शिल्लक राहतोच. कारण हा प्रश्न पुन्हा माणसांच्या गरजांशी संबंधित राहतो. कुटुंबामागे किमान अडीच एकराला आठमाही पाणी मिळाले तर त्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागतील आणि सर्वांच्या किमान गरजा प्रथम भागण्याच्या दृष्टीने तसे नियोजन राज्यसंस्थेने केले पाहिजे. पण तुमच्या गरजा कायम अमुक इतक्याच ठेवा असे सरकार लोकांना सांगू शकेल काय? तशी नैतिक ताकद कोणामध्ये आहे?

हेच शेतमालाच्या भावाच्या बाबतीत आहे. शेतमालाला उत्पादनखर्चाधारित भाव मिळाला तर शेतीच्या सर्व समस्या सुटतील असा विचार मांडला जातो. सरकार ज्या धान्यांची सक्तीने खरेदी करते तिथे सरकारने रास्त भाव द्यावा आणि इतर उत्पादनांच्या बाबतीत सर्व निर्बंध हटवावे अशी मागणी यात असते. सरकारने शेतीच्या बाजारपेठेत कोणताही हस्तक्षेप करू नये आणि केलाच तर योग्य भाव द्यावा ही मागणी बरोबर आहे. पण यामुळे सगळ्यांना शेती आपोआप परवडेल असे गणित मांडता येणार नाही. आणि मुक्त बाजारपेठेचा पुरस्कार करायचा तर मग वीज फुकट मिळाली पाहिजे, कालव्याचे पाणी बारा महिने हवे, खतावर सबसिडी हवी, इन्कमटॅक्स नको अशा मागण्या करता येणार नाहीत. शिवाय चीनमधून येणाऱ्या कांदा-लसणावर आणि अमेरिकेच्या सफरचंदांवर आयात निर्बंध घालता येणार नाहीत.

म्हणून शेतीकडे बघताना कोणताही एकांगी विचार न करता समग्रपणे ती एक 'व्यवहार्य उत्पादक व्यवस्था' कशी होईल या दृष्टीने बघायला पाहिजे. ह्या तिन्ही शब्दांमध्ये मोठा अर्थ आहे. शेती ही निसर्गातील निव्वळ घडामोड नव्हे. जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, यंत्रे, जनावरे आणि माणसे यांनी मिळून बनलेली ती एक 'व्यवस्था' (सिस्टम) आहे, तिला भौगोलिक आणि प्राकृतिक सीमा आहेत आणि सभोतालच्या पर्यावरणाशी तिचा सतत संबंध येत असतो. पण ती नुसती स्थिर किंवा जड व्यवस्था नाही; तर तिच्यातून सदैव नवनिर्मिती होत असल्याने ती एक 'उत्पादक' (प्रॉडक्टिव्ह) व्यवस्था आहे. ही व्यवस्था माणसाने निर्माण केलेली आणि म्हणून मानवी समाजाचे नीतिनियम लागू असणारी आहे. तिला आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दंडक आहेत. त्यामुळे ती 'व्यवहार्य' आहे की नाही हा प्रश्न उपस्थित होतो. इथे 'व्यवहार्य' शब्दामध्ये निरंतरता (सस्टेनेबिलिटी) आणि नफ्याचे तत्त्व (प्रॉफिटेबिलिटी) दोन्हीही सामील आहेत.

शेतीची उत्पादकता कशी वाढेल यावर पुष्कळ विचार झाला आहे. पण हा विचार मुंबई-दिल्लीत बसणारे नियोजनकर्ते, विद्यापीठातले अर्थ आणि कृषिशास्त्रज्ञ, राजकीय पुढारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे आणि इथेच मोठी चूक झाली आहे. हा विचार प्रत्येक शेतकऱ्याने स्वतंत्रपणे करायला पाहिजे. आपली जमीन किती, आपण कोणत्या हवामानात राहतो, आपल्याला किती पाणी मिळू शकेल, आपल्या घरात मनुष्यबळ किती, भांडवल किती, आपण कोणती पिके घेऊ शकतो, त्यासाठी बाजारपेठ कुठे, तिथे भाव किती मिळेल, आपण शेतीला कशाची जोड देऊ शकतो असा समग्र विचार प्रत्येक शेतकऱ्याने केला पाहिजे. शेतकरी या बाबत विचार करत नाही असे नाही; पण हा विचार सुटा सुटा आणि तात्पुरता असतो. आपली शेती ही एक उत्पादक 'व्यवस्था' आहे. तिच्यामध्ये जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, जनावरे, यंत्रे आणि माणसे यांचा सुयोग्य मेळ घालायचा आहे आणि तसे करून ती व्यवहार्य करायची आहे, असा समग्र विचार फारच थोडे शेतकरी करतात. बहुतेकजण शेती हा आपला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

देवजात धंदा समजून, आकाशाकडे बघत, निमूटपणे नांगर ओढत राहतात.

शेतकऱ्याला शेतीकडे बघण्याची ही नेमकी दृष्टी देणे हे आजच्या किंवा उद्याच्या ग्रामीण विकासनीतीचे प्रमुख उद्दिष्ट असायला हवे. आपल्या शेतकऱ्यांकडे अनुभव प्रचंड आहे पण तो एकारलेला आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांची दृष्टी शेती हे तगून निघण्याचे साधन अशी राहिलेली आहे. हे अर्थात परिस्थितीमुळे घडलेले आहे. पंजाब-हरियानासारखी परिस्थिती इथे असती तर इथल्या शेतकऱ्याची मानसिकताही निराळी झाली असती. पण महाराष्ट्राचा मोठा भाग कायम दुष्काळी छायेत असतो, इथला पाऊस लहरी आणि अपुरा आहे, पाण्याच्या वाटपाची पद्धत असमान आणि अन्याय्य आहे या कारणांमुळेच शेतीकडे बघण्याची दृष्टी बदलण्याची गरज आहे.

शेती व्यवहार्य व उत्पादक होण्यासाठी ज्या गोष्टी समाजाने, राज्यसंस्थेने वा बाजारपेठेने करायला पाहिजेत – म्हणजे पाण्याची उधळपट्टी थांबवणे, त्याचे न्याय्य वाटप करणे, पाणलोटक्षेत्राचा विकास करणे, सहकारी पद्धतीने विक्री करणे इत्यादी – त्या तर व्हायलाच हव्यात पण त्या करून झाल्यावर मुख्य निर्णय मात्र शेतकऱ्याने स्वतः घ्यायचा आहे. शेतकऱ्यांनी तसा तो निर्णय घेण्यात आणि त्यानुसार कृती करण्यात ग्रामीण विकासाचे सूत्र दडलेले आहे.

याच नाण्याची दुसरी बाजू अशी की, सर्व उपाय करूनही आणि पुरेसा काळ वाट बघूनही जर शेती व्यवहार्य ठरत नसेल तर मग तिचा मोह सोडून उपजीविकेचे इतर मार्ग स्वीकारणे योग्य ठरेल. ज्या ठिकाणचे पर्यावरण शुष्क आणि वाळवंटासारखे झालेले आहे, भगीरथ प्रयत्न करूनही पाण्याची सोय होऊ शकत नाही, जमिनीचे अगदी लहान तुकडे झाले आहेत किंवा शेती करायला कर्ते स्त्री-पुरुष नाहीत तिथे शेतीचा अट्टाहास करणे चुकीचे आहे. दुष्काळी, कोरडवाहू शेतकरी पोटापुरते तरी धान्य मिळावे म्हणून निकराने वर्षानुवर्षे शेती करत राहतात. पण त्यामुळे त्यांच्याभोवतीचा गरिबीचा विळखा अधिकाधिक घट्ट होत जातो. ज्यांना शेती व्यवहार्य वाटत नाही त्यांनी त्यातून बाहेर पडण्यात काहीच गैर नाही.

मात्र या बरोबरच सध्या उत्पादक असलेल्या आणि काही प्रयत्न केले तर व्यवहार्य होऊ शकणाऱ्या कृषिव्यवस्था चुकीच्या धोरणापायी आपण उद्ध्वस्त तर करत नाही ना याची खबरदारी राज्यसंस्थेने घ्यायला पाहिजे. कोकणासारख्या अनुकूल हवामानाच्या प्रदेशात आणि जंगलक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी समूहाबाबत ही शक्यता जास्त उद्भवते. ज्या विकासप्रकरणांचा स्थानिक जनतेला फायदा नाही अशा प्रकल्पांमुळे कृषिव्यवस्था नष्ट करण्याचे धोरण अन्यायकारी तर आहेच पण ग्रामीण विकासालाही मारक ठरणारे आहे. ज्या प्रदेशात कृषिव्यवस्था व्यवहार्य नाही अशा ठिकाणीच या प्रकल्पांचा विचार व्हावा.

आपली शेती उत्पादक आणि व्यवहार्य करण्याचा निश्चय शेतकऱ्याने केला की मग त्या शेतीच्या तंत्राचा तपशील ठरवणे सोपे जाते. याबाबत आता पुष्कळच प्रयोग झाले आहेत आणि अनेक हुशार व कर्तबगार शेतकऱ्यांनी ते यशस्वी करून दाखवले आहेत. अशा व्यवस्थेमध्ये फक्त भुसार धान्ये किंवा उसासारखी व्यापारी पिके असा एकांगी दृष्टिकोण न ठेवता तांदूळ, गहू, ज्वारी, नाचणी, हरभरा, उडीद, भुईमूग, सूर्यफूल, सोयाबिन, घेवडा, गवार, सुरण, कांदा, लसूण, आंबा, डाळिंब, दूध, लोणी, अंडी, मटण, चिकन, पोर्क, मासे, सुबाभूळ, बांबू, मश्रूम, झेंडू, जरबेरा अशा विविध पदार्थांची निर्मिती होते. यांतील प्रत्येक पदार्थ हा एका विशिष्ट पीकपद्धतीचे किंवा उत्पादनतंत्राचे प्रतिनिधित्व करतो. एकाच ठिकाणी हे सर्व करता येणार नाही. पण जेवढ्या शक्य होतील तेवढ्या घटकांचा योग्य प्रकारे मेळ घातल्यास उत्पादनव्यवस्था अर्थपूर्ण होते हे नवीन प्रयोगांमधून दिसून आले आहे.

ह्या दृष्टिकोणाची व्यावहारिक बाजू काय आहे? कोकणात भरपूर पाऊस पडतो. तिथे वर्षभर हवेत आर्द्रता असते, मुळात तो दाट जंगलांचा प्रदेश. तिथल्या जैविक विविधतेचे रक्षण करून फळे, भाजीपाला, इमारती लाकूड आणि मासे यांचे फायदेशीर उत्पादन-तंत्र तिथे निर्माण करता येईल. तिथे बाजारपेठेची अडचण अजिबात नाही. मात्र औद्योगिकीकरणाच्या विचित्र कल्पनांपोटी तिथले पर्यावरण उद्ध्वस्त होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. शिवाय तिथल्या आदिवासी समूहांचे जमिनीचे हक्क अबाधित राहतील याचीही. विदर्भातील पाऊसमान बरे आणि भरंवशाचे आहे. तिथल्या जमिनीची प्रत चांगली आहे. जमिनीचा आकारही तुलनेने मोठा आहे. नैसर्गिक शेती करण्यासाठी तो आदर्श प्रदेश आहे. तसे प्रयोग तिथल्या शेतकऱ्यांनी सुरू केलेलेही आहेत. मातीची धूप थांबवून गाव-तळ्यांमार्फत पाण्याची साठवण केल्यास तिथली शेती उत्पादक होईल. मराठवाडा दुष्काळी प्रदेश आहे पण मध्य

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

महाराष्ट्रापेक्षा तिथे जमिनीचा आकार व पाऊसमान उजवे आहे. मराठवाड्याची मुख्य समस्या म्हणजे तिथल्या शेतीत भांडवली गुंतवणूक कमी आहे. पाणलोटक्षेत्रविकासाच्या माध्यमातून ती केली तर गवताचे उत्पादन आणि उत्कृष्ट वाणाच्या देशी जनावरांची निपज या माध्यमातून तिथल्या शेतीची सुधारणा करणे शक्य आहे. मध्य महाराष्ट्र हा पर्जन्यछायेतील मुरमाड मातीचा दुष्काळी प्रदेश आहे पण त्याच्याशेजारी पश्चिम घाटात भरपूर पाऊस पडतो. ब्रिटिश काळात पश्चिम घाटात मोठी धरणे दुष्काळ हटवण्यासाठी बांधण्यात आली. पण त्या नंतर या कल्पनेला मूठमाती देण्यात येऊन तिथे ऊस लावण्यात आला. त्यातून निर्माण झालेल्या साखरसम्राटांनी पाण्याच्या माध्यमातून सत्ता व संपत्ती काबीज केली. दुष्काळी तालुक्यांत उसाचे पीक घेणे यासारखा गुन्हा नाही आणि त्या उसापासून दारू तयार करणे हे तर निव्वळ पाप आहे. सध्या बहुतेक साखर कारखान्यांचा फायदा हा दारू बनवण्यावर आहे. दुष्काळी प्रदेशातल्या लोकांचे पाणी हिसकावून घ्यायचे आणि त्याऐवजी त्यांना दारू पाजायची असले हे घृणास्पद राजकारण आहे. हे राजकारण करणारे पुढारी समाजात उजळ माथ्याने मिरवत असतात आणि साहित्य संमेलने भरवून लोकांना सुसंस्कृतपणाचे धडे देत असतात. आता हे साखर कारखाने इथेनॉल तयार करून पेट्रोलसोबत पुरवणार आहेत. म्हणजे पावसाच्या पाण्यावर कब्जा करायचा, त्यातून ऊस लावायचा, त्याच्या रसापासून अल्कोहोल तयार करायचे आणि त्यावर मोटारी चालवायच्या. पाण्यावर मोटारी चालवण्याची ही ग्रेट मराठी जादू आहे!

महाराष्ट्रातील शेतीपुढच्या समस्यांचा अभ्यास करून पुढच्या २५ वर्षांची योजना बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जगप्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ प्रा. एम.एस.स्वामीनाथन् यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल नुकताच सादर झाला आहे. महाराष्ट्रातील शेतीची दुरवस्था सुधारण्यासाठी या समितीने काही नेमक्या आणि बऱ्याच लंब्याचौड्या सूचना केल्या आहेत. त्यातली रोजगार हमी योजनेमार्फत फळबागा करण्याची योजना शासनाने भ्रष्टाचार न करता राबवली तरी मोठा फायदा होईल. पण या समितीने पाण्याच्या फेरवाटपाबद्दल 'ब्र'ही काढलेला नाही. किंबहुना समितीच्या कार्यकक्षेत हा विषय नव्हताचा! पाण्याचे वाटप हीच महाराष्ट्राच्या, विशेषतः मध्य महाराष्ट्राच्या शेतीची मुख्य समस्या आहे. तिला जोपर्यंत हात घातला जात नाही तोपर्यंत इंटरनेटवरून शेतकऱ्यांना सल्ला देण्याच्या किंवा बायो-टेक्नॉलॉजी राबवण्याच्या योजना निरर्थक आहेत.

स्वामीनाथन समितीने महाराष्ट्राची शेती सुधारण्यासाठी प्रचंड भांडवली गुंतवणूक लागेल असे म्हटले आहे पण त्याचबरोबर सरकारी तिजोरीत खडखडाट आहे, असेही म्हटले आहे (खंड १, पृष्ठ ५). सरकारी तिजोरीत खडखडाट असणारच. ७३ टक्के महसूल नोकरांच्या पगारांवर आणि उरलेला भ्रष्टाचारात खर्च केल्यावर दुसरे काय होणार? त्यात एन्रॉनसारखे घोटाळे आहेतच. समितीने असेही म्हटले आहे की, सरकारकडे पैसा नसल्याने पुढच्या २५ वर्षांत शेतीमधली ९० टक्के गुंतवणूक ही खाजगी म्हणजे शेतकऱ्यांना स्वतःला करावी लागेल. (खंड २, पृष्ठ २४५).

याचाच अर्थ असा की आपली शेती उत्पादक आणि व्यवहार्य आहे की नाही याचा निर्णय शेतकऱ्याला वैयक्तिकरीत्या करावा लागेल.

शेती व्यवहार्य करण्याच्या योजनेत ज्यांच्याकडे शेतीच नाही अशा लक्षावधी ग्रामीण शेतमजुरांचे काय असा प्रश्न साहजिकच कुणाच्याही मनात येईल. यामध्ये अर्थातच सर्व उपाय करूनही ज्यांना शेती परवडत नाही अशा लहान शेतकऱ्यांचाही समावेश होईल. शेतीची व्यवस्था उत्पादक आणि फायदेशीर झाल्यास त्यात अनेक शेतमजूर खरे तर सामावले जातील. जे जाणार नाहीत त्यांच्यासाठी प्रचलित व्यवस्थेत दोन मार्ग आहेत. एक म्हणजे रोजगार हमीसारख्या योजनेत सातत्यपूर्ण मजुरी आणि दुसरे म्हणजे स्वयंरोजगाराच्या संधी. विकासाच्या अर्थशास्त्रात हे मार्ग बहुतेकवेळा हे किंवा ते अशा द्वंद्वात्मक पद्धतीने समोर आणले जातात आणि हे चांगले की ते अशा रीतीने त्यांच्या गुणदोषांची चर्चा केली जाते. पण तसा वाद निरर्थक आहे. हे दोन्ही मार्ग रोजगारासाठी आवश्यक आहेत. अकुशल, अर्धशिक्षित, कोणतेही भांडवल नसलेल्या पण धडधाकट व्यक्तीला सातत्यपूर्ण रोजगार मिळणेच आवश्यक आहे तर जिच्या अंगात काही हुन्नर, धडाडी आणि हुशारी आहे अशा व्यक्तीला स्वतःचा धंदा, व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

मात्र स्वतंत्र धंदा करणे ही जशी विकासाची प्रक्रिया आहे तसे मजुरी करण्याचे नाही. मजुरी हा आपद्धर्म किंवा तात्पुरती व्यवस्था आहे. जे आई-बाप मजुरी करून मुलाबाळांचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

पोट भरतात त्यांच्या मुलांनीही तसेच करावे, हे विकासाच्या संकल्पनेत बसणारे नाही. तर आई-बाप मजुरी करतील त्या दहा वर्षांच्या काळात मुलांनी किमान माध्यमिक शिक्षण घेऊन नोकरी-धंदा-व्यवसाय अशा निराळ्या उद्योगात पाऊल टाकले पाहिजे. तसे झाले तरच आई-बापांचे श्रम सार्थकी लागतील.

स्वतंत्र वा जोडधंदा व्यवसाय करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला भांडवलाची साथ न मिळणे ही महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेतील एक मोठी कमतरता राहिलेली आहे. कोरडवाहू शेतीतून भांडवलाची निर्मिती न होणे हे त्याचे पहिले कारण आणि अशा धंदेव्यवसायाची परंपरा नसणे हे दुसरे. यावर उपाय म्हणून सहकारी पतपुरवठ्याची चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली. तिला बऱ्याच प्रमाणात यश मिळाले पण नंतरच्या काळात स्वार्थी राजकारणाने तिचा कब्जा घेतला. सहकारी पतपुरवठ्याचाच नवीन आविष्कार म्हणजे स्त्रियांच्या बचतगटांची चळवळ. ही चळवळ खेडोपाड्यात चांगले मूळ धरते आहे. स्त्रियांचे धन स्त्रियांकडेच ठेवण्याची आणि त्याचा व्यवहार्य, उत्पादक कामांसाठी उपयोग करून विकासाची प्रक्रिया गतिमान करण्याची मोठी ताकद या चळवळीमध्ये आहे. ग्रामीण भागातील पतपुरवठ्याची उणीव या चळवळीमुळे भरून निघेल आणि सरकारी बँकांकडील तुंबलेला पैसाही मोकळा होऊ शकेल. ज्यांना परंपरेने सामाजिक दर्जा व आर्थिक पत नाकारली आहे अशा भटक्या व विमुक्त समाजातील हुशार, तडफदार स्त्री-पुरुषांना या चळवळीचा मोठा फायदा होऊ शकेल. मात्र बचतगटांची चळवळ ही लिंगभाव समानतेच्या चळवळीसोबत हातात हात घालून जायला हवी. घरातल्या बाईची बचत व पत वापरताना तिला जमिनीच्या मालकीत व इतर संपत्तीतही निम्मा हक्क दिला तरच ही चळवळ फलदायी होईल.

शेतीतील सुधारणा असो वा स्वयंरोजगाराचे स्वप्न, त्यासाठी मूलभूत गोष्ट म्हणजे शिक्षण. दुर्दैवाने ग्रामीण भागात शिक्षणाचा जेवढा विचका झाला आहे तेवढा कशाचा नाही. याचे खापर सरकारवर फोडणे शक्य आहे, पण खरे कारण म्हणजे ग्रामीण आई-बापांनी मुलांच्या शिक्षणाकडे केलेले दुर्लक्ष. या दुर्लक्षामुळेच ग्रामीण समाजाला शिक्षणयंत्रणेवर वचक ठेवता येत नाही आणि त्या शिक्षणाचा दर्जा घसरत जातो. हे शिक्षण अनाकर्षक व कंटाळवाणे तर आहेच पण त्यातली मुख्य त्रुटी म्हणजे हातातील कौशल्य वाढवण्यासाठी त्याचा काहीही उपयोग नाही. किंबहुना ज्या आदिवासी-दलित मुलांच्या हातात कौशल्य आहे ते हरवून कसे टाकता येईल याच दिशेने हे शिक्षण जाते. ग्रामीण भागात रोजगार हमीवर सुशिक्षित मुले काम करताना दिसतात. 'बघा, बी.ए. – एम.ए. होऊनसुद्धा आम्हाला खडी फोडायचे काम करावे लागते', असे ते हताशपणे म्हणतात. हाताने काम करण्यात खरे तर नामुष्की नाही आणि एम्.ए. च्या शिक्षणाशी त्याचा काही संबंधही नाही. पण एम.ए. होईपर्यंतच्या काळात पंक्चर काढण्याचेसुद्धा शिक्षण घेतले नाही ही खरी नामुष्की आहे. ग्रामीण भागात इंजिनिअरिंगची कॉलेजेस निघाली पण पुरेशा तांत्रिक शाळा किंवा आय.टी.आय. निघाल्या नाहीत. महाराष्ट्रातील गरिबी आणि शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता लक्षात घेता पहिल्या फेरीत तांत्रिक शाळा व तंत्रनिकेतने काढून मग कॉलेजेस काढायला हवी होती. म्हणजे त्या कॉलेजेसचा फायदा केवळ उत्तर भारतातील धनिकांच्या मुलांना न होता स्थानिक शेतकऱ्यांच्या मुलांनाही झाला असता.

तरुण मुलांच्या हातात तंत्रकौशल्य नसणे हा विकास प्रक्रियेतील मोठा अडसर आहे. जपान, चीन, तैवान, उत्तर कोरिया अशा देशांनी झपाट्याने जी प्रगती केली तिचे कारण त्यांनी आपल्या नागरिकांच्या हातात असे कौशल्य दिले हे आहे. शेतीवरचा माणसांचा बोजा कमी करायचा असेल तर तांत्रिक शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. मात्र हे तांत्रिक शिक्षण केवळ शहरांतील कारखान्यांत काम मिळण्यासाठी घ्यायचे नसून ज्या व्यवस्थेत असु तेथील काम अधिक कौशल्याने करण्यासाठी व संशोधकीय दृष्टी जागवण्यासाठीसुद्धा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. व्यक्तिमत्त्वविकासाचे शिक्षण हे मातृभाषेतूनच घ्यायला पाहिजे हे उघड आहे; त्याबाबत कोणतीही शंका नको पण त्यासोबत चांगले इंग्रजी व गणित शिकले पाहिजे. ग्रामीण भागात या विषयांची फार हेळसांड होते. मुख्य म्हणजे या विषयांवर विद्यार्थ्यांना, मेहनत घ्या, असे सांगण्याऐवजी कॉपी करण्याचे दरवाजे खुले करून दिले जातात. ग्रामीण विकासासाठी इंग्रजी व गणिताचे ज्ञान अनिवार्य आहे. गणिताच्या योगाने भौतिकशास्त्रे, अर्थव्यवहार आणि संगणकाचे ज्ञान होईल तर इंग्रजीच्या परिचयाने सरंजामी बुरसटलेपणा जाऊन मनोवृत्ती अधिक प्रगल्भ, मोकळी आणि सुसंस्कृत होईल.

ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी ग्रामीण उद्योगांची निर्मिती झाली पाहिजे असे मत अनेकदा मांडले जाते. उपजीविकेचे बिगर-कृषी साधन अशी जर त्यामागची कल्पना असेल तर ती योग्य आहे पण, वस्तुतः, उद्योगांमध्ये ग्रामीण व शहरी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

असा भेद नसतो. उद्योग हे नैसर्गिक साधनांवर प्रक्रिया करणारी यंत्रणा असते. ते शहरात असू शकतात तसेच खेड्यातही. पिठाची चक्की, लोखंडी खिडक्या बनवणारे वर्कशॉप, पावाची बेकरी जशी खेड्यात असू शकते तशी शहरातही. ग्रामीण उद्योग याचा अर्थ छोटे, घरगुती उद्योग असा असेल तर असे उद्योग शहरांतच मोठ्या प्रमाणावर असतात. ग्रामीण उद्योग याचा अर्थ कृषी-आधारित उद्योग म्हणजे कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग असा असेल, तर त्यांना एकूण अर्थव्यवस्थेमध्ये निश्चितच स्थान आहे, मग ते उद्योग शहरात असोत की खेड्यात. दुधापासून आइस्क्रिम बनवणारा किंवा संत्र्यापासून जॅम बनवणारा उद्योग कृषिव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे पण म्हणून त्याला ग्रामीण उद्योग म्हणता येईल असे नाही. सारांश, शेतीला उद्योगाची जोड हवी पण ते उद्योग कोणते, कशा प्रकारचे आणि कुठे असायला हवेत हे त्या उद्योगांच्या उत्पादकतेवर, व्यवहार्यतेवर आणि देश-काल-परिस्थितीवर अवलंबून राहील.

ग्रामीण कृषिव्यवस्था ही नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असल्याने त्या संपत्तीवर अधिकार कोणाचा हा प्रश्न या निमित्ताने साहजिकच समोर येतो. याबाबतीत सध्या दोन विचारप्रवाह आहेत. एक विचार म्हणतो की, अशी सर्व संपत्ती ही राष्ट्राच्या मालकीची समजायला हवी आणि तिचा वापर व वाटप करायचा अधिकार केंद्र सरकारला असायला हवा. तर दुसरा विचार असे मानतो की, त्या त्या ठिकाणच्या साधनसंपत्तीवर त्या त्या मानवसमूहाचा अधिकार असायला हवा आणि त्यांच्या अनुमतीशिवाय त्याचा वापर होऊ नये. पाणी, जंगले, खनिजे इत्यादी साधनसंपत्तीबाबत या दोन विचारगटांकडून हिरिरीने परस्परविरोधी भूमिका मांडल्या जातात.

एक सर्वसाधारण, तटस्थ नागरिक म्हणून आपण या वादाकडे पाहिले तर असे दिसेल की या दोन्ही भूमिका सत्य आहेत आणि त्यामध्ये परस्परविरोध असण्याची आवश्यकता नाही. नदीसारखी साधनसंपत्ती जेव्हा दोन-तीन राज्यांमधून जाते तेव्हा तिला राष्ट्रीय संपत्ती समजले पाहिजे आणि राष्ट्रीय सहमतीने तिचे वाटप केले पाहिजे. या उलट एखाद्या गावातले तळे हे त्या गावाची संपत्ती समजून त्याच्या वापराचा अधिकार त्या गावाच्या ग्रामसभेकडे असला पाहिजे. अर्थात हा प्रश्न इथेच थांबत नाही. समजा एखाद्या आदिवासी पाड्याखाली बॉक्साईडची खाण सापडली तर? ती त्या आदिवासी पाड्याची संपत्ती मानता येईल का? बॉक्साईड हे भूगर्भातील निसर्गनिर्मित खनिज असल्याने ती आपोआप त्या आदिवासी पाड्याची संपत्ती मानता येणार नाही हे उघड आहे. पण त्याच वेळेला त्या बॉक्साईडच्या खाणीतुन ॲल्युमिनियमचा धूर बाहेर पडत असताना त्या आदिवासींना मात्र भुकेकंगाल राहावे लागणे हेही मान्य होणारे नाही. पण, दुर्दैवाने, तसे होते म्हणून बॉक्साईडवर अधिकार कोणाचा हा प्रश्न ऐरणीवर येतो. या प्रश्नाचे उत्तर त्या आदिवासींना प्रकल्पग्रस्त ठरवून आणि त्यांच्या तोंडावर चार नोटा फेकून देता येणार नाही. तर राष्ट्राचे सन्मान्य नागरिक म्हणून त्यांच्या उदरनिर्वाहाची पूर्ण सोय लावून आणि त्यांना त्यांच्या मानवी क्षमतांचा पूर्ण विकास करण्याची संधी देऊन शोधावे लागेल. मात्र त्या बरोबरच केवळ ते तिथे राहतात म्हणून त्या संपत्तीचे तेच मालक आहेत असेही समजता येणार नाही. कारण अशीच खाण उद्या अंबानींच्या घराखाली सापडली तर?

विकासाच्या प्रक्रियेत हे जे प्रश्न तयार होतात त्यांची उत्तरे केवळ पैशाच्या किंवा तंत्रज्ञानाच्या भाषेत देता येत नाहीत. कारण हे नैतिक प्रश्न असतात. नैतिक प्रश्न सोडवण्याच्या पद्धतीलाच नीती असे म्हणतात. नैतिक प्रश्नांपासून आपली सुटका नाही कारण मानवी समाजाची उभारणीच नीतीतत्त्वांवर झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानसुद्धा नीतीपासून मुक्त नाही. तसे ते आहे असे समजले तर मग आपण 'क्लोनिंग' करू देणार का हा प्रश्न फणा काढून समोर येतो.

माणसाने निसर्गाशी कसं वागायचं हा एक महत्त्वाचा नैतिक प्रश्न आहे. तसेच माणसाने माणसाशी कसं वागायचं हाही एक नैतिक प्रश्न आहे. शेती ही एकमेव अशी व्यवस्था आहे की जिथे हे दोन्ही प्रश्न एकाचवेळी समोर येतात. आणि शेती हीच अशी प्रक्रिया आहे की जिच्यातून ह्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता असते. तशी उत्तरे प्रत्येकाला मिळणे ही विकासाची प्रक्रिया आहे. हा विकास शोषणमुक्त, दारिद्र्यरहित आणि अहिंसक पद्धतीने करणे ह्याला नीती असे म्हणतात. शेतीची व्यवस्था उत्पादक आणि व्यवहार्य करणे, तिच्यातील विषमता हटवून दारिद्र्य दूर करणे आणि निसर्गाशी समतोल राखून तिला संपन्न बनवणे हीच ग्रामीण विकासनीती. काही वर्षांनी ग्रामीण आणि शहरी असा भेद विरून जाईल तेव्हा तीच माणसाची विकासनीती असेल.

**

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वेदातला विष्णू

विश्वनाथ खैरे

विष्णू हे शेकडो वर्षे भारतीय लोकमानसात सर्वप्रमुख म्हणून सुस्थित झालेले दैवत आहे. त्याची मंदिरे आहेतच, तरी त्याच्या 'अवतारां'ची मंदिरे आणि त्यांचे भक्त त्याहून जास्त आहेत. इटुबा (विठोबा) सारख्या लोकदैवतात भागवतादी पुराणांमधला विष्णूच आहे अशी महाराष्ट्रातली धारणा आहे; तर, पुराणांमधला विष्णू वेदातल्या विष्णु या देवतेशी भिडवलेला आहे. विष्णू हेच नाव असलेल्या दैवताच्या या कालभेदी स्वरूपांमध्ये पुष्कळच फरक दिसून येतात. मराठी विष्णू पंढरीच्या विठ्ठलमूर्तीवरून आला असे म्हटले तरी चालेल. तसेच पुराणांतल्या आणि वेदातल्या विष्णूचे मूळ इतर कशात तरी आहे असे म्हणता येते. त्याचा शोध अर्थातच पुराणातल्या कथांवरून आणि वेदातल्या सूक्तांवरून घ्यावा लागतो.

ऋग्वेदातल्या १०२८ सूक्तांपैकी पाच सबंध आणि एक अंशतः अशी सहाच सूक्ते विष्णु या देवतेची आहेत. विष्णूच्या नावाचे वेदातले उल्लेख सुमारे शंभर आहेत. इंद्राची सूक्ते २०६ आणि उल्लेख अगणित आहेत. यावरून दोघांच्या वेदकालीन महत्त्वाची तुलनात्मक कल्पना येईल. उल्लेखांच्या प्रमाणाने विष्णूला ऋग्वेदातली चौथ्या पायरीवरची देवता मानतात.

विष्णूचे वर्णन

सूक्तांमधल्या शब्दांवरून विष्णु या देवतेचे चरितवर्णन 'वेदिक मिथॉलजी' (ए.ए. मॅक्डोनेल १८९८) या सारग्रंथात असे मिळते (३७-४२) :

– तो तीन ढांगा टाकतो. मर्त्य जीव त्यांतल्या दोन डोळ्यांनी बघू शकतो. तिसरी उडणाऱ्या पक्ष्यांच्या किंवा झडणाऱ्या मरुतांच्या, कुणाच्याही आवाक्यातली नाही. तो उरुगाय म्हणजे दूऽर जाणारा आहे, उरुक्रम म्हणजे मोठाल्या ढांगा टाकणारा आहे (१.१५५, ७.९९). तो या अवकाशाच्या पल्याड राहणारा आहे (७.१००).

तीन ढांगा टाकताना विष्णु नेम पाळतो (१.२२). तो पुरातन आहे तसा नूतनही आहे (१.१५६).

- तो इंद्रासारखाच गिरिक्षित् म्हणजे डोंगरावर राहणारा आहे, गिरिष्ठा म्हणजे डोंगराला धरून राहणारा आहे (१.१५४, १५५).

- तो वृत्राला मारण्यापुरता इंद्राला मिळाला होता. त्याने शंबराच्या ९९ गढ्या फोडल्या आणि वर्चीच्या झुंडींवर विजय मिळवला (६.६९, ७.९९, १.१५५).

- विष्णु मरुतांशी मिळून आहे. तो त्यांना गती देतो (५.८७, २.३४, ८.२०).

- त्याची विविध रूपे आहेत (७.१००). तो गर्भांचा रक्षक आहे (७.३६, १०.१८४). संकटातल्या माणसांसाठी तो आपल्या तीन ढांगा टाकतो (६.४९, ८.६९).

या चरितक्रिया एकाद्या प्रचंड शक्तीच्या चर जीवाच्या असाव्यात असे भासते. तसा जीव प्रत्यक्ष तर दिसत नसल्यामुळे, या वर्णनांशी ताळमेळ राखणारा तो अमूर्त जीव हे एखाद्या शक्तिमान गोचराचे अर्थांतर असावे असे फार पूर्वीपासून पंडितांना वाटत आले आहे. त्यांनी दैवताच्या चरितक्रियांमध्ये विश्वात आढळणाऱ्या गोचर क्रियांची अर्थांतरे मानून त्या गोचराची अनुमानेही बांधलेली आहेत. यास्काचे निरुक्त हा त्या प्रकारचा पहिला ग्रंथ. वेदातल्या सूक्तांवरून केलेले विष्णु या देवतेचे ते आकलन म्हणता येईल.

'वेदिक मिथॉलजी' या सारग्रंथातले विष्णुचे आकलन असे आहे : "निव्वळ निसर्गावर आधारित अर्थनात 'तीन ढांगा किंवा झेपा' म्हणजे, सुर्याचे उगवणे, डोक्यावर येणे आणि मावळणे असे धरले आहे पण, तिसरी झेप सर्वांत उंच असल्यामुळे, सूर्य मावळण्याशी संबंधित असल्याचा मागमूसही दाखवीत नाही. पर्यायात, त्यांना विश्वाच्या तीन विभागांमधल्या सूर्याच्या क्रमणा मानतात. ओल्डनबर्गला वाटते की सौर

---

* भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या घटनेत नव्याने अंतर्भूत झालेल्या 'भारतीय भाषा आणि संस्कृती' विभागाच्या उद्घाटनासाठी या निबंधाच्या इंग्रजी रूपाचे वाचन ४.१०.१९९९ रोजी झाले होते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

गुणवृत्तींचा कोणताही निश्चित भाग विष्णु मध्ये आढळत नाही; अफाट अंतरे लांघणारा एवढीच विष्णुविषयीची धारणा आहे" (३८-३९).

विष्णु = सूर्य या समीकरणाच्या विरोधी आणखी पुरावा देता येतो. वरच्या उद्धृतांत विष्णुच्या चरितक्रिया *वर्तमानकाळी* नमूद केल्या असल्या तरी सूक्तांमध्ये त्या *भूतकाळी* वर्णिल्या आहेत. (त्रिर्देवः पृथिवामेष एतां वि *चक्रमे* । ६.४९.१३ । यो रजांसि *विममे* पार्थिवानि । *वि चक्रमे* यत्र देवासो मदन्ति । ८.२९.७ ।) सूर्याचे फिरणे तर रोजचेच म्हणजे *रीतिवर्तमानकाळी* असते. सूर्याची जी इतर सूक्ते आहेत त्यांत रूपके प्रतीके उघड आहेत आणि त्याच्या चरितक्रियांची विधाने *वर्तमानकाळी* आहेत. उरुगाय विष्णु हा *सूर्य* उषा आणि अग्नि यांचा जनक असल्याचे विधान आहे (त्रीण्येक उरुगायो *जनयन्त सूर्यमु*षासमग्निम् । ७.९९.४). अर्थातच विष्णु हा सूर्य, उषा, अग्नि या तिघांकडून निराळा असला पाहिजे. तसेच, सूर्य त्याच्या सबंध क्रमणेत एकाच दृश्य आकाराचा असतो. विष्णु मात्र आपल्या विलक्षण शक्तीमुळे आकाराने वाढत गेला असे सांगितले आहे (परो मायया तन्वा वृधान । ७.९९.१). एकंदरीने, 'विष्णु = सूर्य' हे समीकरण टिकत नाही.

व्युत्पत्तिविचार

एकादे दैवत कशाचे अर्थांतर आहे हे ठरवण्याची वैदिकांची रीत दैवतनामाच्या व्युत्पत्तीवर आधारलेली होती. यास्काच्या निरुक्तापासून चालत आलेल्या या पद्धतीत दैवतनामाच्या उच्चारित ध्वनिरूपात धातू म्हणजे क्रियावाचक बीजशब्द शोधणे ही पहिली पायरी असते. त्या धातूच्या अर्थावरून, वर्णित क्रियाकलापांची संगती दैवतनामाशी जोडणे ही पुढरी पायरी. विष्णु संबंधित काही व्युत्पत्ती अशा :

चौदाव्या शतकात झालेल्या सायनभाष्यात विष्णु या नावाची व्युत्पत्ती 'व्यापकत्वात् विष्णुः ।, व्यापणारा म्हणून विष्णु' अशी दिली आहे, तर सूर्य च्या 'सु धातु प्रेरणार्थक असल्यामुळे, प्रेरितो तो सूर्य' (षु प्रेरणे। सुवतीति सूर्यः ।) अशा व्युत्पत्ती दिल्या आहेत म्हणजे अर्थदृष्टीने विष्णु आणि सूर्य तसे समान नाहीत.

मॅक्डोनेल सुचवतात की, 'विष्णु शब्द *विश्* (= *क्रियाशील असणे*) *या धातूवरून काढल्यामुळे,* विष्णु हा जलद चालत्या तेजगोलाचे सजीवित रूप म्हणून सूर्य, अशी संकल्पना झाली. (पृ. ३९ तिरपा टाइप पुरवलेला). त्रिविक्रम या विष्णुच्या नावात 'वि-क्रम् = ढांगा टाकणे' हा धातु पाहिला आहे. 'उरुगाय, उरुक्रम' या समासांमध्ये 'उरु = रुंद' असा शब्दार्थ घेतला आहे.'

या विवेचनातील 'विष्णु शब्द विश् या *धातूवरून काढल्यामुळे*' हा वाक्यप्रयोग विचारणीय आहे. भाषेतले शब्द 'धातूंवरून काढलेले' नसतात. शब्द आधीचे असतात. संस्कृत व्युत्पत्तिपरंपरेत *धातू हेच शब्दातून काढलेले* एक अनुमानित ध्वनिबीज असते. शब्दाच्या समाजमान्य किंवा व्युत्पत्तिकाराच्या कल्पनेतल्या अर्थाला जुळेल असा अर्थ त्या धातूला दिला जातो. म्हणून तर सूर्य या नित्यवापरातील शब्दातल्या धातूसाठी 'सृ = हालचाल करणे,' आणि 'सु = प्रेरणा देणे', असे दोन पर्याय सुचवले जातात.

एकोणिसाव्या शतकातील भाषाशास्त्रीय ध्वनिकाने ही परंपरा आणखी पुढे नेऊन 'सूर्य < स्वर् = तळपणे' व त्याला समर्थक ग्रीक 'हेलिऑस', लॅटिन 'सोल' असे 'भारत-युरोपीय' समशब्दही दाखवले आहेत. या ध्वनिकाच्या थोडे खोलात गेले पाहिजे. संस्कृत 'स्वर्' धातु 'स्वर्ग' शब्दातही दाखवला आहे; ग्रीक शब्दाचा संबंध 'चमक, तेजस्विता'वाचक शब्दाशी आहे तर लॅटिन 'सोल' एकान्त, एकाकीपणा या अर्थांच्या शब्दांमध्ये दिसतो. म्हणजे, ग्रीक व लॅटिन शब्दांमागच्या संकल्पना संस्कृत शब्दामागच्या संकल्पनेशी जुळणाऱ्या नाहीत. त्यामुळे, शब्दाच्या आणि भाषेच्या 'अर्थ' या प्रमुख अंगाने ध्वनिसाम्यावर आधारलेल्या व्युत्पत्ती किंवा भारतयुरोपीय भाषांमधल्या संगती समाधानकारक नाहीत.

भाषाशास्त्रात भारत-युरोपीय भाषाकुलाच्या मानीवाला दृढमूल सिद्धांताचे स्वरूप प्राप्त झाले असल्यामुळे, व्युत्पत्ति-विचारातल्या या अपूर्ती आणि विसंगती नजरेआड केल्या जातात. एकदा ठरवलेल्या भाषाकुलाच्या परिघाबाहेर समशब्दांचा शोध घेणे काहीसे निषिद्ध मानण्यात आले आहे. परिणामी, वैदिक संस्कृत भाषा भारतात तत्कालीन लोकभाषांच्या परिसरात विकसित झाली हे मान्य झाले असले तरी त्या लोकभाषांच्या वंशज भारतीय भाषांमध्ये संस्कृत शब्दांच्या व्युत्पत्तीसाठी शोध घेणे हे भाषाशास्त्रींनी टाळलेले आहे. भारत-युरोपीय कुलाच्या भारतार्य उपकुलातील शब्दव्युत्पत्तींचा विचार सदैव 'संस्कृत मूळशब्दाकडून प्रचलित भारतीय भाषांकडे' या एकाच दिशेने झालेला आहे. या प्रवासाचे वाहन १९व्या शतकातील

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

भाषाशास्त्रानुसार 'अपभ्रंश', तर नव्या भाषाविज्ञानानुसार 'कालभेदी बदल' हे सांगण्यात येते. भारतार्य भाषांच्या शेजारी हजारो वर्षे चालत आलेल्या दक्षिणी भाषांच्या शब्दसंग्रहाला संस्कृत शब्दांच्या ध्वनिक किंवा आर्थिक विचारात कसलेही स्थान दिले जात नाही. संस्कृत भाषेवर प्रमाणग्रंथ लिहिणारे बरो यांनी त्यांच्याकडे लक्ष वेधले खरे; पण ते, ज्या संस्कृत शब्दांची व्युत्पत्ती भाषाकुलाच्या चौकटीत नीटशी सापडत नव्हती तेवढ्याच शब्दांच्या पुरते, ही त्याची मर्यादा होती.

तेच बरो आणि एमेनो यांनी दक्षिणी भाषा-बोलींचा व्युत्पत्तिकोश सिद्ध केला आहे, त्या कोशावरून तमिळ 'चूर् (उच्चार 'सूर्') = गोल फिरणे' या शब्दाशी संबंधित कितीतरी शब्द तमिळ आणि इतर दक्षिणी भाषांमध्ये वापरात आहेत. तमिळ शब्द 'सूरियन् = सूर्य', हा संस्कृतातून उसना असे मानल्यामुळे, या कोशात आलेला नाही. अर्थाच्या दृष्टीने मात्र, 'प्रेरणा देणारा, गति देणारा' या विद्वान तत्त्वज्ञांच्या वर्णनांपेक्षा 'गोल फिरणारा' हे सूर्याचे अनक्षर समाजातले वर्णन यथार्थ म्हटले पाहिजे.

त्याचप्रमाणे, विष्णु या शब्दाच्या मूळ अर्थनिष्पत्तीसाठी दक्षिणी व्युत्पत्तीकोशातल्या पुढील नोंदी विचारात घेता येतील :

त. विण् 'आकाश, स्वर्ग' विण्णवर् 'स्वर्गाचा रहिवाशी'
त. विम्मु, वीङ्कु 'आकाराने वाढणे' म. वीण्णुक 'फुगणे'
त. वीचु (वीसु) 'लांबणे, ताणणे' म. वीच्चि (वीस्सि) 'पंखा'
त. तिरि 'वळणे, गोल फिरणे, भटकणे, हलणे, परतणे' तिरिवु 'बदल'
त. वीक्कम् 'आकार वाढणे'
त. उरु 'आकार (रूप) घेणे' उरुळ् 'चाकाप्रमाणे फिरणे'
त. उरै 'पूड (चुरा, भुगा) होणे' उल 'लहान होणे'

यांतल्यां 'विष्णु, वीण्णुक, तिरिवीक्कम्, उरु —' या शब्दांच्या ध्वनींमध्ये थोडेसेच बदल करून संस्कृत उद्भ्रंश (लोकभाषेतील शब्दांचे संस्कृत ध्वनिरूप) सिद्ध झाले होते असे धरले तर, *'विष्णु त्रिविक्रम उरुगाय'* या पदांचा अर्थ *'स्वर्गाचा रहिवाशी, आकाशात फिरणारा, पंख्याप्रमाणे आकाराने वाढणारा, चुरा झालेला, बदलणारा, लहान होणारा, इकडेतिकडे भटकणारा आणि परत फिरणारा'* अर्थात 'धूमकेतु' असा निष्पन्न होईल (सूर्य नव्हे).

दक्षिणी भाषा चिकटी म्हणजे एकापुढे एक शब्द ठेवून नवे शब्द बनवणाऱ्या आहेत. त्यांतल्या नामशब्दांमधून संस्कृतातले *विश्*, *वि* यांसारखे वेगळ्याच अर्थाचे धातु संकल्पिले गेले. सूक्तांमध्ये उद्भ्रंश शब्द लोकभाषांतल्या मूळ अर्थाने वापरलेले, व्युत्पत्ती संस्कृत पद्धतीने केलेली, अशा मिसळीमुळे सूक्तांचा यथायोग्य अर्थ लागणे दुष्कर झाले.

धूमकेतू विष्णु

केवळ वेगळी व्युत्पत्ती करून विष्णू आणि धूमकेतू यांची संगती बसवता येणार नाही. सूक्तांमध्ये विष्णूचे जे पराक्रम सांगितले आहेत त्यांचीही या आधाराने चांगली संगती लावता आली पाहिजे आणि तशी ती लागते. सूर्य, चंद्र, तारे आणि ग्रह आकाशात नेहमीच दिसत असल्याने ओळखीचे असतात. *धूमकेतू* मात्र असा असतो की, तो अचानक नवलाई म्हणून प्रकटतो. मोठी अंतरे कापतो, ती कापताना सूर्याभोवती फिरतो, पंख्यासारखा विस्तारतो किंवा आकाराने लहानही होतो. त्याच्या फिरण्याच्या तीन अवस्था दिसतात : सूर्याच्या दिशेने वेगाने येणे, सूर्यापासून दूर जाणे, सूर्याच्या मागे किंवा दूरदूर अवकाशात लुप्त होणे. (कालांतराने परत येणे ही तशी पहिलीच अवस्था). साहजिकपणेच धूमकेतू हा स्तुतीला आणि भक्तिभावाला पात्र ठरला. सूक्तांमधली मिथ्यकथात्म अर्थांतरे त्याच्या या एक किंवा अनेक अंगांची वर्णने करतात.

विष्णोर्नु कं वीर्याणि प्र वोचं यः पार्थिवानि विममे रजांसि
यो अस्कभायदुत्तरं सधस्थं विचक्रमाणस्त्रेधोरुगायः
।१.५४.१।

विष्णुचे काय विक्रम सांगावेत, ज्याने धूळच धूळ उधळवली
जो वरवरच्या प्रदेशांत चढला, चाकोरी फिरला, तीन बदलत्या रूपांत.

(सायनभाष्यात 'कं शीघ्रं (कं म्हणजे जलद)' असा अर्थ दिला आहे. येथे 'काय' हा अधिक सरळ अर्थ घेतला आहे).

परो मात्रया तन्वा वृधान न ते महित्वमन्वश्नुवन्ति
।७.९९.१।

प्रचंड मापात तनूने वाढत्या, माणसे तुझे महित्व उमजू शकत नाहीत.

(सूर्याहून हे सर्वात महत्त्वाचे वेगळेपण आहे, त्यामुळेच विष्णुने धूमकेतूचे सूचन होते).

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

न ते विष्णो जायमानो जातो देव महिम्नः परमन्तमाप ।७.९९.२। हे विष्णू, न जगणारे न जगून गेलेले तुझ्या महिम्याचा अन्त जाणते झाले.

दाधर्थ पृथिवीमभितो मयूखैः ।७.९९.३।

तू पृथ्वीला किरणांनी वेढून टाकलेस.

(मयूख चा किरण हा सामान्य अर्थ येथे घेतला आहे. सायन मयूख म्हणजे पर्वत म्हणतात. त. 'मयिर्' म्हणजे 'केस' मयूख च्या अर्थ व ध्वनीला जवळचा आहे).

प्र तद् विष्णुः स्तवते वीर्येण मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठा ।१.१५४.२।

विष्णूची स्तुती होते, जो सिंहासारखा भीतिदायक (भीमकाय), अवघड देशांतून फिरणारा, गिरिवासी आहे.

(सिंह या अर्थांतरात, धूमकेतूच्या 'पंख्याचे किंवा शेपटाचे' सिंहाच्या आयाळीशी सारखण आहे. बृहत्संहिता ग्रंथात 'हरिलांगूल' हे एका धूमकेतूचे नाव दिले आहे).

यस्योरुषु त्रिषु विक्रमणेष्वधिक्षियन्ति भुवनानि विश्वा ।१.१५४.२।

ज्याच्या तीन बदलत्या (प्रचंड) ढांगांत सारे (तिन्ही) लोक समावतात.

द्वे इदस्य क्रमणे स्वर्दृशोऽभिख्याय मर्त्या भुरण्यति
तृतीयमस्य नकिरा दधर्षति वयश्चन पतयन्तः पतत्रिणः ।१.१५५.५।

या स्वर्गीय देखाव्याच्या (स्वर्गदेखत्याच्या) दोन पावलांना मर्त्य मानव वाखाणतो. त्याचे तिसरे पाऊल, कुणालाही कळत नाही, न कोसळत्या अशनींना, न उसळत्या पक्ष्यांना.

(सायनमते 'वयश्चन येतारो मरुतोऽपि। – वयश्चन म्हणजे पक्षी आणि मरुतही.' वेदातले मरुत् हे उल्का, अशनी, तुटते तारे (meteor = वायवी') असल्याचे दाखवता येते. ते विष्णूचे मित्र आहेत असे म्हटले आहे. विष्णू = धूमकेतु याच्याशी मरुतांच्या या स्वरूपाची संगती चांगली जुळते. कारण उल्का-अशनी आकाशातुन अचानक तेजस्वी लोळासारखे दिसण्यात आणि मागे मोठे शेपूट असण्यात धूमकेतूंच्या सारखेच आहेत. वे म्हणजे पक्षी म्हटले आहे, त्यात पंखांचे आणि आकाशात उडण्याचे अशी सारखणे आहेत. वस्तुतः, त. वेऽ 'जळणे' यावरूनही उल्का-अशनी या अर्थांचे समर्थन होते. भाष्यात सुचवलेल्या अर्थांना ही अन्य भाषाकुलातली पुष्टी मिळते हे लक्षणीय आहे).

चतुर्भिः साकं नवतिं च नामभिश्चक्रं न वृत्तं व्यतींरवीविपत्
बृहच्छरीरो विमिमान ऋक्वभिर्युवाकुमारः प्रत्येत्याहवम् ।१.१५५.६।

चार गुणिले नव्वद नामांच्या चाकासारखा फिरता गोल आहे;

आडव्या अंगाचा, त्याच्याकडे उडणारा, कोवळा तरुण, आमच्या आवाहनाने परत येतो.

(सायनभाष्यात 'चतुर्भिः साकं नवतिं' याचा अर्थ 'चार अधिक नव्वद' असा केला आहे. तो 'चार *गुणिले* नव्वद' असा केल्याने पहिल्या ओळीचा अर्थ नीट सूर्यपर लागतो. काही धूमकेतू नियत काळानंतर परत येत असतात याला धरून दुसऱ्या ओळीतले विधान आहे).

यः पूर्व्याय वेधसे नवीयसे सुमज्जानये विष्णवे ददाशति
यो जातमस्य महतो महि ब्रवत्सेदु श्रवोभिर्युज्यं चिदभ्यसत् ।१.१५६.२।

जो त्या सनातन, पराक्रमी, नितनवीन विष्णूला अर्घ्य देत राहतो,

जो याच्या जन्माची महती सांगतो, तो खातेपिते जीवन जगतो.

प्र तत्ते अद्य शिपिविष्ट नामार्यः शंसानि वयुनानि विद्वान्
तं त्वा गृणामि तवसमतव्यान् क्षयन्तमस्य रजसः पराके ।७.१००.५।

तुझे ते शिपिविष्ट हे नाव, मी कुळवंत, कळावे ते कळवून घेणारा, आज वानितो, तुझ्याशी मी बोलतो, दुबळा, – धुळीच्या पल्याड वसती करणाऱ्या (विष्णु).

(त.'चिप्पि (शिप्पि)' मराठी '(ग्रामीण) शिपि, (शहरी) शिंप (ला)' या शब्दांवरून 'शिपिविष्ट' ची उपपत्ती चांगली लागते. धूमकेतूच्या आकसून शीर्षमात्र राहिलेल्या अवस्थेला तो शब्द लागू पडतो. 'शेप'शी त्याचा संबंध जोडणे बरोबर होणार नाही, कारण, विष्णूला लिंगरूप मानले तर त्याच्या तीन ढांगांचे स्पष्टीकरण लाभत नाही आणि 'शेप' हा शब्द लॅटिन 'cippus = खांब'शी जुळवण्यात लक्षणा फारच ताणावी लागते. यापेक्षा मराठी 'शेप, शेपूट'शी तो जास्त चांगला जुळतो. मराठी शेपूट ची उपपत्ती तमिळशेऽस् पुटे = लांब फटका देणारे' यावरून लागते.)

किमित्ते विष्णो परिचक्ष्यं भूता यद् ववक्षे शिपिविष्टो अस्मि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मा वर्पो अस्मदप गूह एतद्यदन्यरूपः समिथे बभूथ। ७.१००.६।

काय तुला सुचवायचे आहे, विष्णू, की 'मी शिंपल्यात अडकलोय' म्हणतोयस?

तुझे खरे रूप आमच्यापासून लपवू नकोस; सामना झाला तेव्हा तुझे रूप वेगलेच होते.

(सामना झाला सूर्याशी. सूर्याच्या जवळ धूमकेतूच्या आकारात प्रचंड वाढ होत असते.)

वषट् ते वष्णवास आ कृणोमि तन्मे जुषस्व शिपिविष्ट हव्यम्

वर्धन्तु त्वा शुष्टुतयो गिरो मे यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ।७.१००.७।

विष्णू रे, मी तुला निवद देतोय. शिपीवंदा, हे माझे हव्य मानून घे.

माझी स्तुतिपर गाणी तुझी वाढ करोत. तुम्ही सारे तुमच्या आशीर्वादांनी आमचे सदैव रक्षण करा.

(शिपिविष्ट विष्णूची म्हणजे आकसलेल्या धूमकेतूची काया पुन्हा मोठी व्हावी म्हणून केलेली ही भाकणूक आहे. सूर्यचंद्रांना ग्रहण लागल्यावर त्यांना पूर्वरूप मिळावे म्हणून केली जाते तशीच.)

इतर संबंध

विष्णू ही देवता एकाकी नाही. वेदात तिचा संबंध इंद्र आणि मरुत् या दोघांशी सांगितला आहे. विष्णू आणि इंद्र दोघेही विविध रूपांनी फिरले (उरु चक्रमाथे ।६.६९५) असे सांगितले आहे. त्यांनी आकाश साजिरे केले, आम्हा जीवांच्या कल्याणासाठी धूळ विखुरली (अकृणुतमन्तरिक्षं वरीयोऽप्रथतं जीवसे नो रजांसि ।६.६९.५). ते वाढवू आहेत (वावृधाना। ६.६९.६). ते स्वत; प्रवासी असल्यामुळे भक्तांना सुरक्षित रस्त्यांवरून त्यांना अरिष्टांच्या पार न्यावे (अरिष्टैर्नः पथिभिः पारयन्तः ।६.६९.१) अशी त्यांची प्रार्थना केली आहे.

त्यांच्यातले हे समाईक गुण, इंद्र हे चंद्राचे अर्थांतर मानल्याने, सार्थ ठरतात. चंद्राचीही वाढ-घट होत असते आणि तोही पर्वतांच्या शिखरांवर दिसतो. (या सानुनि पर्वतांच्या शिखरांवर दिसतो. (या सानुनि पर्वतानामदाभ्या महस्तस्थतुरर्वतेव साधुना ।१.१५५.१). मेघांच्या वरच्या प्रदेशात स्वामी असलेला इंद्र वज्रप्रहार करून पाणी मोकळे करतो; या कामात उल्का-अशनी (पृथ्वीवर आदळताना वज्रासारख्याच कठीण असतात त्या) मरुत् म्हणून इंद्राच्या सहायक असतात. हा मेळ पुढील मंत्रांमध्ये दिसतो :

इन्द्राविष्णू दृंहिताः शंबरस्य नव पुरो नवतिं च श्नथिष्टम्

शतं वर्चिनः सहस्रं च साकं हथो अप्रत्यसुरस्य वीरान्। ७.९९.५।

इंद्र आणि विष्णू या जिवलगांनी शंबराचे नऊ आणि नव्वद गड जिंकून घेतले. प्रतिकारी कोणीही नसलेल्या त्यांनी असुरांचे शेकडो हजारो बळवंत वीर मारले.

(असुरांचे वीर म्हणजे मेघ, गडांच्या आणि असुरांच्या संख्या कविसंकेतातल्या आहेत.)

अथाब्रवीद् वृत्रमिन्द्रो हनिष्यन्त्सखे विष्णो वितरं वि क्रमस्व ।४.१८.११।

नंतर, वृत्राला मारू पाहणारा इंद्र विष्णूला म्हणाला, 'मित्रा विष्णू, मोठा पराक्रम दाखव.'

या सूक्तावरील सायनभाष्यात सर्वानुक्रमणीतील वामदेवाच्या कथेचा संदर्भ दिला आहे. या १३ मंत्रांत वामदेव, इंद्र आणि इंद्राची आई अदिति यांचा संवाद आहे असे त्यात मानले आहे. इंद्र हा गर्भात हजार महिने राहिला होता यासारखे अतिमानवी संदर्भ त्यात आहेत, ते सोडले तरी, पवित्र मानलेल्या वेदमंत्रांतून नवनवीन कथानकांची वीण कशी होते ते या प्रकरणातून दिसते. महाकाव्यांत आणि पुराणांत या प्रकारच्या आख्यानांची रेलचेल आहे. वेदांचे पाठक आणि श्रोते यांनी वेदमंत्रांच्या उच्चारणांतुन जो अर्थ काढला किंवा त्यावर आरोपिला त्यावर या रचना आधारलेल्या आहेत.

भाष्यानुसार, इंद्राचा *जन्म गुहेत झाला,* त्याच्या आईला तो हीन वाटल्यामुळे तिने त्याला साऱ्या शक्ती प्रदान केल्या. *जन्मल्याबरोबर तो स्वतेजाने, पृथ्वी आणि स्वर्ग यांना भरून टाकीत उंच उडाला.* (आवद्यमिव मन्यमाना गुहाकरिन्द्रं माता वीर्येणा न्यृष्टम्। अथोदतस्थात्स्वयमत्कं वसान आ रोदसी अपृणाज्जायमानः ।४.१८.५). वामदेव इंद्राच्या स्तुतीत म्हणतो. 'इंद्रा, मदोन्मत्त व्यंस असुराने *तुझ्या हनुवटीवर प्रहार केला* (ममच्चन ते मघवन्व्यंसो निविविध्वाँ अप हनू जघान ।४.१८.९).

तिरप्या अक्षरांतले वरचे तीन प्रसंग आपल्याला फार ओळखीचे आहेत. अगदीच वेगळ्या संदर्भात, रामायणातील हनुमानाच्या चरित्रात ते आले आहेत. पात्रांची काहीशी उलटापालट झाली आहे : *गुहेत जन्मला, आकाशात उडाला,*

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

हनुवटीला हाणला — तो हनुमान, इंद्र नव्हे. हनुवटीवर मारले इंद्राने, असुराने नाही. पुढे तो हनुमान राम या अवताररूपाने असलेल्या विष्णु ला मैत्रीचा हात पुढे करतो - यात वेदातली इंद्र-विष्णु यांची मैत्री थोड्याशा फेरफाराने प्रकट होते. इन्द्र म्हणजे 'श्रेष्ठ किंवा प्रमुख देव' असा अर्थ घेतला तर तो शब्द धूमकेतु-हनुमानाला लागू पडेल. मुख्यतः १०.८६ या सूक्तातले पालुपद 'विश्वस्मादिन्द्र उत्तरः' (सर्वांहून श्रेष्ठ, वरचढ आहे) हे स्वतः वृषाकपि (नरवानरा)ला नेमके लागू पडते आणि सबंध सूक्त वृषाकपि-विष्णु-धूमकेतु यांना व्यवस्थित लागू पडते.

रामायणात धूमकेतु-विष्णू आणि वृषाकपि-हनुमान यांचे एकत्व दाखवणारे अनेक संदर्भ आहेत. हनुमानाला समुद्रावरून उडाण मारायचा आग्रह करताना त्याचा वडीलाधारा जाम्बुवान म्हणतो, 'चपळ वेगवंता, झेप घे, विष्णूने तीन घेतल्या तशी' (कि. ६६.३७). स्वतः हनुमान उद्गारतो, 'सागर लांघणारे माझे रूप, तेव्हा तीन ढांगा टाकणाऱ्या विष्णूसारखे दिसेल.' (भविष्यति हि मे रूपं प्लवमानस्य सागरम्। विष्णोः प्रक्रममानस्य तदा त्रीन् विक्रमानिव ।कि.६७.२५). 'केसाळपणा' हे धरणीवरची वानर-माकडे आणि आकाशातील धूमकेतु-उल्का-अशनी यांच्यातले प्रमुख सारखेपण; पण एकंदर कथाप्रसंगांतही त्यांच्या अर्थांतरकारक सारखेपणांची आणखी उदाहरणे रामायणात मिळतात.

विष्णूचा अवतार म्हटलेल्या वामनाच्या चरित्रात त्रिविक्रम विष्णूची कथाच गुंफलेली आहे. वेदातल्या विष्णु-मिथ्याच्या वास्तव मूळरूपाला ती सर्वात जवळची पुराणकथा म्हणता येईल. विष्णूच्या किंवा त्याच्या अवतारांच्या इतर पुराणकथांमध्ये विष्णू चे दैवतरूपच नुसत्या त्रिविक्रमाहून अगदीच वेगळ्या प्रकारचे मानलेले असल्यामुळे, त्यांच्या कथानकांचा वेदातील विष्णुचरिताशी मेळ असतोच असे नाही. किंबहुना, त्यांपैकी कित्येकांतला विष्णू नावापलीकडे वेदाशी संबंधित नसतो.

उपसंहार

विष्णु च्या या आकलनाकडे अनेक दृष्टींनी पाहता येईल. भाषिक दृष्टीने, वेदमंत्रांचा अभ्यास भारत-युरोपीय नव्हे, तर भारतीय भाषाशास्त्राच्या प्रकाशात झाला पाहिजे. भारतीय भाषाशास्त्र म्हणजे सर्व भारतीय भाषांच्या समाहाराचे, कुलव्यवस्थेच्या मर्यादा पार करून सिद्ध केलेले शास्त्र.

पुराणकथांचे आकलन परंपरागत व्युत्पत्तीच्या आधारावर पुरे किंवा बरोबर होत नाही. त्यासाठी कथागत आशय अनेकविद अभ्यासाने तपासले पाहिजेत. मिथ्यकथा, लोककथा, पुराणकथा या पायऱ्यांनी भारतीय मिथ्यावळ पुष्ट होत आलेली दिसते. तिन्ही कथाप्रकारांमध्ये अर्थांतरांवर भर असतो. ती अर्थांतरे नेमकी कशाची आहेत हे अनेकविद अभ्यासातूनच कळू शकेल.

विष्णु सारख्या इतरही दैवतांचे असे आकलन करून घेतल्यानेच वेदमंत्रांची रचना करणाऱ्या समाजाची भाषिक स्थिती काहीशी अवगत होईल. त्या समाजाची वंशनिश्चिती करण्यासाठी, गृहीत भाषिक स्थितीचा दांडगा आधार घेतला गेला आहे. त्या आधाराचा कच्चेपणा, या निबंधात आणि इतरही कितीकांत प्रस्तुत लेखकाने दाखवला आहे.

वैदिक देवतांच्या यथार्थ आकलनावरूनच वेदोत्तर काळातल्या पुराणकथासंभारात साकारलेली नानाविध परिवर्तने नीट ध्यानी येतील. भारतविद्येला गेल्या दोन शतकांत प्राप्त झालेली वांशिक दुइताची किनार पुसून टाकण्यात या प्रकारच्या पुनरभ्यासाची मदत होईल. त्यातून निघणारे निष्कर्ष नव्या शतकसहस्त्रकांसाठी नव्या भारतविद्येची निष्पत्ती करून देतील.

**

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वाद-संवाद

१. 'देवकथा आणि भारतविद्या' विषयी

- विश्वनाथ खैरे

डॉ. रा.चिं. ढेरे यांचा ग्रंथ 'शिवछत्रपतींचा कुलस्वामी श्रीशंभुमहादेव आणि शिखरक्षेत्रात त्याची प्रतिष्ठापना करणारे भोसले घराणे यांच्या दक्षिण-संबंधाची शोधकथा' आहे. या देवकथेचा डॉ. ढेरे इतक्या तपशीलात व खोलात जाऊन ऊहापोह का करतात त्याचे स्पष्टीकरण ग्रंथाच्या उपशीर्षकात मिळते.

देवकथेत इतिहास सरळसरळ 'वाचता' येत नाही हे खरेच आहे. पण श्री. खैरे लिहितात त्याप्रमाणे, 'मान्य देवकथेला नव्या कल्पितांची जोड पुढच्या पिढ्या देतात' तेव्हा, ज्या पुढच्या पिढ्या नव्या कल्पितांची जोड देतात त्यांत त्यांचा इतिहास दडलेला असतो की नाही? असतो अशी डॉ. ढेरे यांची जाण आहे, आणि मला त्यांची जाण बरोबर आहे असे वाटते.

श्री. खैरे यांनी 'अग्रणी चिकित्सक' असा माझा गौरवपर उल्लेख केला आहे. त्याला मी पात्र नाही, हे त्यांचे टिपणच स्पष्ट करते. डॉ. ढेरे यांना देवकथेमध्ये जो इतिहास दडलेला आढळतो तो तसा दडलेला मला आढळत नाही – त्यांचा ग्रंथ वाचल्यावर.

शिखर शिंगणापूरचा श्रीशंभुमहादेव हा शिवछत्रपतींचा (व पर्यायाने भोसले घराण्याचा) कुलस्वामी आहे याविषयी वाद नाही (निदान माझा तरी). डॉ. ढेरे यांच्याच विवेचनामधून असे स्पष्ट होते की हे श्रीशंभुमहादेवाचे स्थान समाजात आधीपासूनच प्रतिष्ठित होते. भोसले घराण्याचा राजकीय उत्कर्ष झाला नव्हता अशा काळापासूनच शिखर शिंगणापूरचा श्रीशंभुमहादेव या घराण्याचा कुलस्वामी राहिला असेल, पण या दैवताला प्राप्त झालेली राजप्रतिष्ठा नंतरच्या काळातली दिसते.

'या कथेतला बळीप हा मालोजी भोसल्यांच्या दहापाच पिढ्या आधीचा ऐतिहासिक पूर्वज असल्याचे' या वाक्यांशाने सुरू होणाऱ्या परिच्छेदातले श्री. खैरे यांचे प्रतिपादन मला मान्यच आहे.

शिखर शिंगणापूरच्या स्थानाशी 'मान्य' देवकथेचा संयोग जेव्हा केव्हा घडविला वा घडला असेल तेव्हा ती ऐतिहासिकतेचे परिमाण असलेली लोककथा बनली, असे म्हणता येईल. हा संयोग कधी घडून आला ते डॉ. ढेरे यांच्या ग्रंथावरून सांगता येत नाही. *लीळाचरित्रा*तील कथा ढेरे यांनी आधाराला घेतली आहे आणि तिच्यात दडलेल्या इतिहासाचा शोध ते इ.स. १०००-११०० या नंतरच्या काळातल्या या कथेच्या विभिन्न कथनांच्या/रूपांच्या आधारे घेतात. परीक्षण लेखात मी याबाबतीत त्यांचे अनुकरण केले आहे. डॉ. ढेरे यांचा ग्रंथ भारतविद्येच्या कक्षेत मोडत नाही असे मला वाटते.

माझ्या समीक्षालेखात मी ही मर्यादा ओलांडली आहे. या देवकथेवर, दडलेला इतिहास उघड करण्याच्या खटाटोपात (व मोहात?) माझे अर्थन 'लादले' आहे.

मूळ देवकथा काय रचली गेली असेल, कोठे रचली गेली असेल, याविषयी काही सांगता येण्यासारखे असेल तर ते श्री. खैरेच अधिकारवाणीने सांगू शकतील. शिखर शिंगणापूरच्या पर्वतशिखरी श्रीशंभुमहादेवाचे स्थान कधी निर्माण झाले, ते स्थान जनमानसात कधी प्रतिष्ठा पावले, व ते प्रतिष्ठा पावत असताना लोककथेला कोणते रूप (कथन) प्राप्त झाले, आणि त्या कथनात कोणता इतिहास दडलेला आढळतो, असे प्रश्न उपस्थित करता येतील असे माझे मत. 'लोककथा आहे ती देवाच्या स्वीकृतीची नाही तर या विशिष्ट डोंगरावर देवाचे स्थान कसे आले यासंबंधातली', हे श्री. खैरे यांचे म्हणणे योग्यच आहे. या डोंगरावर देवाचे स्थान निर्माण होण्याची प्रक्रिया ही ऐतिहासिक प्रक्रिया राहिली असणार. आणि, अटळपणे, तिच्यामध्ये व्यक्ती, गट व जनसमूह यांचे हितसंबंध-आकांक्षा गुंतलेल्या असणार.

डॉ. ढेरे यांच्या अभ्यासातून एक गोष्ट समोर येते. एका जनसमूहाच्या स्थलांतराशी या डोंगरावर देवाचे स्थान निर्माण होण्याचा संबंध लोककथेच्या नंतरच्या कथनांमध्ये जोडलेला आहे. अशी स्थलांतरे होत आलेली आहेत, आणि आजच्या भारताच्या जडणघडणीमध्ये त्यांचा मोठा वाटा राहिलेला दिसतो. सिंधू संस्कृतीचा ऱ्हास व विनाश कोणत्या कारणांमुळे झाला हा विषय अद्याप विवाद्य व अनिर्णीत आहे. पण त्या काळी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जनसमूहांची स्थलांतरे झाली असे दिसते. जनसमूह स्थलांतरित होतात आणि ते नव्या प्रदेशात वरचढ, सत्ताधारी बनतात तेव्हा त्या प्रदेशातील आधीच्या जनसमूहांच्या दैवंते, पवित्र स्थळे यांचा ते ताबा घेतात असेही दिसते.

माझे अर्थन एका अंगाने 'लादलेले' आहेच. श्री. खैरे यांनी ते बाद ठरवले तर तो त्यांचा अधिकार आहे. शिखर शिंगणापूर देवस्थान इतिहासक्रमात काही टप्प्यांमधून गेले. त्यातला एक टप्पा या देवस्थानाला भोसले घराण्याशी घनिष्ठपणे जोडतो. हा घनिष्ठ संबंध हा डॉ. ढेरे यांच्या अभ्यासाचा (आणि निष्कर्षांचाही), एका अंगाने, मुख्य आधार आहे. हा संबंध अमान्य न करताही, या स्थानाच्या, तसेच श्रीशंभुमहादेव या दैवताच्या आधारे भोसले घराण्याची कूळकथा सिद्ध करता येत नाही, हा माझा अभिप्राय. तरीही, या लोककथेच्या विभिन्न कथनांचा/रूपांचा उपयोग करून येथील समाजाचा इतिहास जाणण्याचा प्रयत्न अर्थपूर्ण ठरू शकेल.

श्री. खैरे यांनी या देवकथेच्या लोककथात्मक कथनां/रूपांविषयी जे तपशील स्पष्ट केले आहेत ते उद्‌बोधक आहेत. 'लोककथेतल्या ब्राह्मण पात्राच्या अंतर्भावाशी चातुर्वर्ण्याच्या काळाचा संबंध जोडणेच चुकीचे आहे' हे श्री. खैरे यांचे म्हणणे योग्यच आहे. १८ व्या शतकाच्या अगोदरच्या कथनां/रूपांमध्ये ते का येत नाही, हा प्रश्न मात्र विचारता येईल. माझ्या लेखात या संदर्भातला जो प्रश्न मी उपस्थित केला होता त्याची मांडणी सुधारून घ्यायला हवी आहे. चातुर्वर्ण्याधिष्ठित ब्राह्मणी वर्चस्व महाराष्ट्राच्या या भागात पेशवाईच्या स्थापनेनंतर विशेष वाढले/प्रस्थापित झाले याचे हे विशिष्ट कथन/रूप निदर्शक आहे असे म्हणावे का?

माझ्या लेखात "तीनचार जागी देवकथेवरून भारतविद्येचे निष्कर्ष काढण्याचे प्रयत्न केले आहेत. देवकथेला महत्त्व तर द्यायचे, पण प्रचलित भारतविद्येच्या छत्राखालून तर बाहेर यायचे नाही अशा अडचणीमुळे या प्रयत्नांत विसंगतीही निर्माण झाल्या आहेत", असे श्री. खैरे यांनी म्हटले आहे.

यापैकी एक मुद्दा स्वतःला 'आर्य' म्हणविणाऱ्या लोकांच्या स्थलांतराचा आहे. 'आर्य' (म्हणविणारे) लोक येथीलच, एतद्देशीयच होत, हा सिद्धांत मला परिचित आहे. ब्रिटिश राजवटीखालील भारतीय उपखंडाच्या भौगोलिक सरहद्दी मनात धरून विचार करण्यात गफलत होते याचेही भान मला आहे, तरीही, सिंधू संस्कृतीच्या उत्कर्ष व ऱ्हास/नाश काळात वायव्येकडून, आजच्या अफगाणिस्थान, मध्य आशिया, इराणच्या भागांतून जनसमूहांचे स्थलांतर झाले आणि या जनसमूहांमध्ये स्वतःस 'आर्य' म्हणविणाऱ्या जनसमूहाचा समावेश असावा असे मत मी आज बाळगतो ही गोष्ट खरीच. सुमारे चारएक हजार वर्षांपूर्वीचे वा साऱ्या विस्तीर्ण प्रदेशातील जनसमूह, त्यांच्या भाषा, त्यांच्यातील भाषिक व अन्य संबंध व देवाणघेवाण आणि सामाजिक जडणघडणीची ऐतिहासिक प्रक्रिया – हे सारेच अभ्यासाचे भारतविद्येचे क्षेत्र आज 'खुले' होत आहे, वा झाले आहे. माझ्या लेखातली 'विधाने घोटाळ्याची आहेत', 'सारे प्रतिपादन विसंगत आहे' या आशयाच्या श्री. खैरे यांच्या टीकेतला तथ्यांश मी स्वीकारतो. या विषयात त्यांचा व्यासंग व अधिकार मोठा आहे. माझ्या परीक्षणलेखात डॉ. ढेरे यांच्या प्रतिपादनाला व त्यांनी काढलेल्या निष्कर्षांना जास्त करून प्रतिसाद आहे. आर्य लोक स्वतःबरोबर संस्कृत भाषा घेऊन आले हे मी गृहीत धरीत नाही. श्री. खैरे यांचा 'संमत विचार' स्वीकारल्यावरही, भारतीय समाज व संस्कृती यांच्या जडण-घडणीचे, इतिहासाचे अनेक प्रश्न उरतातच.

उदाहरणार्थ, 'जनपदां'चा मुद्दा घेऊ या. हीवंजा व बळीपाच्या कथेचा मानवशास्त्रीय अर्थ लावण्याच्या प्रयत्नामधून मी 'जनपद म्हणजे विशिष्ट जनांचा किंवा लोकांचा देश' हा अर्थ लावलेला नाही. देवकथा पूर्णपणे बाजूला ठेवून परीक्षणलेखाच्या निमित्ताने काही मुद्दे मी उपस्थित करीत होतो. प्रा. रायचौधरी व प्रा. भुसारी यांचे लेखन वाचल्यावर मला जे आकळले त्या आधारे मी लिहिले. त्यांचे म्हणणे मी विपर्यस्त करून मांडले आहे असे मला वाटत नाही. 'जनपद म्हणजे ग्रामविशेष' हा सायणभाष्यात दिलेला अर्थ पर्याप्त नाही असे म्हणण्याचे मी धाष्टर्य (माझ्या अडाणीपणापोटी.) करतो? 'टोळी' हा शब्द (Tribe या शब्दाचा प्रतिशब्द म्हणून सर्रास वापरला जातो) फार घोटाळ्याचा आहे. चारएक – वा त्याहूनही अधिक – हजार वर्षांपूर्वीच्या भारतीय उपखंडातली जनसमूह, त्यांचे प्रदेश, त्यांच्या भाषा आणि त्यांच्यातील आदानप्रदान यांची, कल्पनेने का होईना, काही मांडणी करण्याची गरज मला जाणवते. अशा व्यापक व सखोल मांडणीशिवाय भोसले घराण्याची कूळकथाही सांगता येणार नाही, तसेच देवकथांच्या कालौघात झालेल्या भिन्न भिन्न कथनां/रूपांच्या आधारे 'दडलेला' इतिहासही उघड करता येणार नाही. या कामामध्ये श्री. खैरे यांनी पथप्रदर्शक ग्रंथनिर्मिती

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

करायला हवी. तो त्यांचा अधिकार आहे. मग भारतविद्येचे आजचे प्रमुख गृहीत बदलेल, संभवतः.

वसंत पळशीकर

२. युगपुरुष अशोक·

*नवभारत*च्या एप्रिल २००४ च्या अंकात सम्राट अशोक या विषयावर असलेल्या एका कादंबरीतले 'उपसंहार' हे शेवटचे प्रकरण व त्यावरील संपादकीय टिपण प्रसिद्ध झाले आहे. या 'युगपुरुष अशोक' नामक कादंबरीचे हे परीक्षण नाही हे उघड आहे. त्यामुळे या पुस्तकाचे 'कादंबरी' म्हणून स्थान काय हा प्रश्न या चर्चेत अप्रस्तुत आहे. टिपण 'संपादक' या नावाने आले आहे. पण अंकावर संपादकाचे नावच नाही. त्यामुळे टिपणांत आलेली मते संपादक मंडळाची आहेत असे गृहीत धरणे भाग आहे.*

कादंबरीमध्ये जे चित्रण येते 'याला ऐतिहासिक आधार किती भक्कम ते तपासणे तूर्त बाजूला ठेऊन' संपादक 'गाभ्याचे मुद्दे/युक्तिवाद' इकडे वळतात. हे मुद्दे/युक्तिवाद, निदान, कादंबरीकाराच्या इतिहासाच्या ज्ञान-समज यावर आधारलेले आहेत. हे आधार तपासणे बाजूला ठेवल्यास पुन्हा त्यातल्या युक्तिवादातल्या समर्थनासाठी रोमिला थापर यांचे प्रतिपादन वापरणे चिकित्सेत कितपत बसते? कादंबरीलेखकाचे मुख्य सूत्र असे जाणवते की 'कौटलीय अर्थशास्त्र' यात दिलेली राज्यपद्धत सर्वच आर्थिक व्यवहारात पदोपदी शासकीय हस्तक्षेपावर आधारलेली होती, त्या पद्धतीचा समूळ नाश करून अर्थव्यवहारात स्वायत्तता सम्राट अशोकाने आणली. इतकेच नव्हे तर, ती इतकी रुजवली की, ब्रिटिशांच्या ताब्यात भारत जाऊन या सर्व व्यवस्थेची स्वार्थी मोडतोड ब्रिटिशांनी करेपर्यंत उत्पादन, त्याचे दर, विपणन या आधारावर भारत हा पुढील दोन हजार वर्षे जगातला एक वैपुल्य असलेला सुखी-श्रीमंत देश होता. सोबत परस्पर सौजन्य, परधर्माविषयी आदर, इत्यादींचे पालन त्याने इतके रुजवले — हाडीमासी हा कादंबरीलेखकाचा आवडता शब्द जो उपसंहारामध्ये सतत वापरला गेला आहे — की हे सर्व लोकस्वभावाचा भाग होऊन दोन हजार वर्षे टिकले.

सम्राट अशोकाच्या मोठेपणाविषयी प्रश्नचिन्ह उभे करणे असा हेतू या प्रतिक्रियेत नाही. मात्र ऐतिहासिक चित्र असे काळे-पांढरे स्पष्टपणे विभागलेले नसते. मुळात 'चाणक्य' या व्यक्तीच्या ऐतिहासिकतेविषयी स्पष्ट पुरावा नाही. 'कौटलीय अर्थशास्त्र' हा ग्रंथ एकहाती केलेली निर्मिती आहे की हे भरताच्या नाट्यशास्त्राप्रमाणे संकलन आहे? यात दिलेली अर्थ-राज्यपद्धत भारताच्या कुठल्या भागांमध्ये किती काळ प्रचलित होती? ही पद्धत 'एकाधिकारवादी, सर्वंकष व सर्वदूर हस्तक्षेपाधिष्ठित' होती हे सूत्र तरी पूर्णपणे कितपत खरे? अशोकाचा काळ इ.स. पूर्व (?) ३०३ ते २३२ असा मानला जातो. यातला सम्राटपदाचा काळ ३५/४० वर्षे असू शकेल. त्या काळातली वाहतूक-संदेशवहन वगैरे व्यवस्था पाहता इतक्या थोड्या काळात पूर्वीची व्यवस्था 'आमूलाग्र' बदलून नवी व्यवस्था लोकांच्या 'हाडीमासी' रुजवणे हे एका व्यक्तीच्या, ती व्यक्ती सम्राटपदी असली तरीही, आयुष्यांत अशक्य आहे. संपादकांनी भाषांतर करून दिलेल्या रोमिला थापर यांच्या प्रतिपादनातून, पूर्वीची एकाधिकारवादी वगैरे व्यवस्था नाकारली, ते अशोकाने जाणीव-विचारपूर्वक केले, असा धागा दिसत नाही. भारतावर एकछत्री राज्य करणे कुणालाच फार काळ साधत नाही, मात्र धर्म, प्रदेश, भाषा, राजसत्ता यात कितीही उलथापालथ झाली तरी उत्पादन-विपणन व्यवस्था ही नेहमीच स्वयंशासित राहिल्याने, जगभरच्या व्यापाराचे भारत एक महत्त्वाचे केंद्र होता इतकेच थापर यांचे म्हणणे दिसते.

'उपसंहार' प्रकरणांतली खूपशी उदाहरणे-मते ऐतिहासिकतेच्या निकषावर विवाद्य आहेत. मात्र हे वाद तपशिलाचे आहेत. त्यात उतरणे अवघड नाही पण त्यातून फारसे काही हाती लागत नाही. लेखकाचे जे मुख्य म्हणणे आहे ते नोकरशाहीप्रधान व्यवस्थेतून अर्थव्यवस्था मुक्त केल्यास भारताला वैभवाचे दिवस लवकर येतील, या मुक्त व्यवस्थेमुळे जातिधर्मांची कृत्रिम कुंपणे मोडून पडतील असे आहे. सध्या अंगिकारलेली पद्धत केंद्रीकरण करणारी, त्यातून उद्गम पावलेली प्रचंड नोकरशाही पोसणारी, सर्वांनाच बेजबाबदार होण्यास वाव देणारी, सबघोडे बाराटक्के मनोवृत्ती जोपासणारी आहे. संपादकांनी याला, पारंपारिक भाषेतल्या 'अर्थ व काम' या

* श्री. विश्वास दांडेकर यांनी उपस्थित केलेल्या पेचाने बसणारा शह आम्ही मोकळ्या मनाने मान्य करतो. *नवभारत* एप्रिल २००४ नंतरच्या अंकांच्या मजकुरांची जुळणी संपादक मंडळाचे वेगवेगळे सभासद करीत आहेत. 'युगपुरुष अशोक'च्या संदर्भातील प्रास्ताविक टिपण श्री. वसंत पळशीकर यांचे आहे व ती त्यांची मते आहेत - संपादक मंडळ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पुरुषार्थाच्या भाषेत मांडताना, प्रचलित आलोकापेक्षा हा निराळा, महात्मा गांधींना जास्त जवळ जाणारा असे म्हटले आहे. १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत ब्रिटिशांनी काय केले यावरील चर्चा इतिहास म्हणून महत्त्वाची असली तरी, 'पुढे काय' याचे उत्तर त्या चर्चेमधून मिळेल असे नाही. पुढचा म्हणजे १९४७ पासून आजपर्यंतचा, काळ्या साहेबांचा काळ.

एके काळी भारतात अमेरिकेचे राजदूत असलेले डॉ. डॅनिएल मोयनिहान यांनी असे म्हटले आहे की मध्ययुगानंतरच्या जगात तीन प्रकारच्या राजक्रांत्या झाल्या. फ्रेंच व अमेरिकन क्रांत्यांमधून व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य त्या दोन देशांमध्ये रुजले, काही प्रमाणांत इतरत्रही. रशियन क्रांतीने एका सर्वंकष हुकुमशाहीला जन्म दिला. तिसरी क्रांती म्हणजे साम्राज्यांचे विघटन होऊन अनेक देश नव्याने स्वतंत्र झाले ही. अशा देशांमध्ये ब्रिटनच्या जोखडातून मुक्त होणाऱ्या देशांची संख्या मोठी होती, कारण ते साम्राज्यही सर्वात मोठे होते. यातल्या बहुसंख्य देशांनी फेबियन समाजवाद अंगिकारलेला दिसतो. कारण ब्रिटनच्या वरिष्ठ वर्तुळात याला मोठी मान्यता होती. तेव्हा खरे तर या टप्प्याला साम्राज्यकाळाचे शेपूट अशा परिप्रेक्ष्यातच पाहायला हवे. मोयनिहप यांचे हे मत चिंतनीय आहे. सर्वच क्षेत्रांत सरकारी हस्तक्षेप म्हणून काळ्या साहेबाचे राज्य हे प्रथम त्या फेबियन विचारसरणीतून साकारले. पुढे, 'तटस्थ' धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी रशियाला अनुकूल अशी आंतरराष्ट्रीय स्तरावर, तर उठसूट राष्ट्रीयीकरण अंर्तगत व्यवस्थेत अशी परिणती झाली.

या विचारसरणीमध्ये सर्वाधिक प्राधान्य उपलब्ध राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीला आले, हे उत्पन्न वाढवण्याला नव्हे. पुढच्या सर्व घडामोडी आपणांपुढे आहेतच.

या चक्रव्यूहातून बाहेर पडणे तसे सोपे नाही. पण अशक्यही नाही. मात्र 'अर्थ व काम' हे पुरुषार्थ किंवा स्थानिक समाजाचे स्वयंशासन याला, प्राचीन-मध्ययुगीन काळांत नसलेल्या, काही अपरिहार्य मर्यादा आहेत.

राज्यसंघटनेच्या विषयात असा सिद्धांत आहे की दळणवळण (वाहतूक) व संदेशवहन जितके जलद होईल त्या प्रमाणात सत्तेचे केंद्रीकरण होते. हे केवळ राज्यव्यवस्थेपुरते खरे नाही, इतरही क्षेत्रांत ते लागू पडते. याला उत्तर म्हणजे सत्तेच्या विकेंद्रीकरणाकडे वरून सतत रेटा ठेवणे. प्रस्थापित हितसंबंधांचा या रेटा ठेवण्याला सतत विरोधच होणार.

राष्ट्राच्या भौगोलिक सीमा (यात आता व्याप्ती खूप वाढलेल्या सागरी सीमाही आल्या) अबाधित ठेवणे हे सरळ केंद्रीकरणाकडे नेणारे आहे. यात लागणारा पैसा, अपेक्षित संरचना अशा अनेक गोष्टी विकेंद्रित करता येण्यासारख्या नाहीत. वाहतुकीचे मार्ग, संदेशवहन याही क्षेत्रांत फार मोठे विकेंद्रीकरण संभवत नाही.

फार मोठ्या प्रमाणावर आपण ऊर्जा आयात करतो. या खनिज तेलाला पर्याय सापडेल तेव्हा प्रश्न पुन्हा तपासता येईल पण आज तरी याचे फार मोठे विकेंद्रीकरण शक्य दिसत नाही.

अशी निरनिराळी क्षेत्रे तपशीलात तपासता येतील, ते इथे अभिप्रेत नाही. असे अनेक उद्योग-व्यवसाय आहेत जिथून शासनाने 'काढता पाय' धोरण अंगिकारले तर त्या त्या उद्योग व्यवसायांत बऱ्याच प्रमाणांत अपेक्षित दिशेला जाण्यास वाव आहे.

मात्र सर्वात महत्त्वाचे प्रश्नचिन्ह मानसिकतेचे आहे. मध्ययुगीन 'मायबाप' मानसिकता अजून टिकून आहे. संस्थात्मक बांधणी नव्याने तर होत नाहीच पण बरीचशी असलेली बांधणी ढासळत आहे. शिवाय 'फुकट' हा परवलीचा शब्द झाला आहे.

आज तर देश एक राहतो का भारताच्या विघटनाला सुरुवात झाली आहे असे प्रश्नचिन्ह आपणापुढे उभे आहे.

सम्राट अशोकापासून ब्रिटिशांनी भारत जिंकणे या काळा-मध्ये असलेले अनेक घटक आज उपलब्ध नाहीत. मात्र तरीही स्थानिक स्वायत्तता पुन्हा साकारायला खूप मोठा वावही आहे.

'पाणी' हा प्रश्न आता ज्वालाग्राही बनला आहे. मोठी धरणे, कालवे हे मार्ग पूर्णपणे सोडून द्यावे या मताचा मी नाही. मात्र फक्त एव्हढेच पुरेसे नाही. आजच्या लोकसंख्येच्या दीडपटीपर्यंत आकडा जाऊन मग तो कमी होण्यास सुरवात होईल असा या क्षेत्रातल्या तज्ज्ञांचा अंदाज आहे. या लोकसंख्येला अन्नपाणी पुरवणे यासाठी मोठी-मध्यम धरणे यासोबत व्यक्तिगत स्तरापासून स्थानिक स्तरापर्यंत पाणी साठवणे (पुरवठा) तर ठिंबक-तुषार सिंचनापासून कमी पाण्याच्या पिकांपर्यंत जाणे (मागणी) अशा आघाड्या उघडाव्या लागतील. स्थानिक स्वायत्ततेशिवाय हे संभवत नाही.

ऊर्जेच्या क्षेत्रात सार्वजनिक वाहतूक साधने सुधारणे (मागणी) या सोबत ऊर्जेचे इतर स्रोत (सौर, खनिज तेलाला पर्यायी वनस्पती तेल (पुरवठा) हे स्थानिक स्वायत्ततेशिवाय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शक्य नाही. अगदी साधा मुद्दा उदाहरण म्हणून नोंदवतो. दुचाकी वाहने, चारचाकी वाहने यांचा बव्हंशी उपयोग स्थानिक असतो. (व्यापारी वाहने सोडून) मात्र यावरील वाहनकर राज्यशासनाकडे जातो, गोळाही राज्यशासनच करते. हा कर, निदान त्याचा ८०/९० टक्के हिस्सा हा त्या त्या स्थानिक प्रशासनाकडे सोपवून नागरिकांना त्यातून उत्तम रस्ते मिळवण्याचा हक्क देता येईल. इथे हा कर न राहता चांगल्या रस्त्यासाठीचा आकार (ग्राहक-पुरवठादार) असा संबंध आणता येईल. स्रोत वाढणे, तो स्वायत्त असणे हे साध्य होताना जबाबदारीही स्थानिक राहील.

सर्वच क्षेत्रांत असा वेध असणाऱ्या बाबी शोधाव्या लागतील. मात्र हे जनतेच्या रेट्याखेरीज होणार नाही.

'नवभारत'ने एका महत्त्वाच्या विषयाला हात घातला आहे.

स्वागत....

विश्वास दांडेकर

३. 'असि' शब्द आणि संचलित भारतविद्या

नवभारत नोव्हें.-डिसें. २००१ अंकात 'प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती' या *ग्रंथाच्या* 'प्रचलित भारतविद्या आणि संस्कृत पुराणकथा' या परीक्षणलेखात पृ. ६९ वर 'असि' या वेदातल्या शब्दाच्या मुळाविषयी चर्चा केली आहे.

लॅटिन मधल्या ensis (तरवार) शब्दाचे असि शी 'ध्वनिदृष्ट्या व अर्थदृष्ट्या' साम्य दाखवून त्याच्या आधारे इण्डो-युरोपिअन भाषेतला *nsis असा शब्द सिद्ध करणे संयुक्तिक असल्याचे *ग्रंथात* म्हटले आहे. त्यावर परीक्षणात मांडले आहे की,

"लॅटिन ensis (तरवार) या शब्दाचा त्याच भाषेतल्या ferrum (लोह) शब्दाशी ध्वनी किंवा अर्थाचा संबंध नाही. तो insigne 'पद किंवा हुद्दा दाखवण्यासाठी धारण केलेली वस्तु' या शब्दाचा मुक्तभेद आहे. (इंग्रजी ensign = निशाण, insignia = लॅटिन insigne).

"लॅटिन ferrum शी जवळचा शब्द ferro 'to strike, ठोकणे' हा आहे. ध्वनी आणि अर्थ या दोन्ही अंगांनी या दोन शब्दांचा संबंध जुळतो. तसा संबंध वेदातल्या असि शब्दाचा *भारतीय भाषां*तल्या शब्दाशी जुळतो.

तमिळ, मल्याळम् अच्चु (अस्सु) = साचा (ओतकामाचा)
कोलमी अच् (अस्) = बीड (लोखंड) ओतण्याचा साचा
कन्नड, तेलुगु अच्चु (अस्सु) = साचा, छाप

"हिमालय आणि विंध्य यांच्या मधला 'आर्यावर्त' नावाचा जो प्रदेश खास संस्कृत भाषेचा मानला जातो त्यात लोखंडाचे खनिज मिळत नाही, ते या दक्षिणी भाषा-बोलींच्या मुलखात मात्र मिळते. अर्थात लोहवाचक शब्द मूळचा त्याच दक्षिणी भाषांच्या प्राचीन बोलींमधला असला पाहिजे आणि त्यांच्यातूनच संस्कृतात, वेदात आला असला पाहिजे."

वेदांचा रचनाकाळ आणि पुरातत्त्वातील लोहयुगाचा भारतातला उदयकाळ यांचा संबंध या शब्दातून जोडला जात असल्याने या शब्दाची अधिक चर्चा झाली पाहिजे. गेल्या वर्षात ती झालेली नाही. *ग्रंथकार* डॉ. मेहेंदळे यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी ५.४.०३ ला तत्परतेने पत्र लिहून त्यांची प्रतिक्रिया कळवली याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो. त्यांनी केलेला खुलासा असा :

"तुमचे पत्र मिळाल्यावर तो ('असि' विषयीचा) खुलासा मी पुन्हा वाचला. लॅटिन भाषेचा माझा अभ्यास नगण्य आहे. तथापि लॅटिन ensis चे insigne शी संबंध असेल असे वाटत नाही असे म्हणण्याचे धाडस करतो. लॅटिन ferrum 'iron'चा संबंध लॅटिन शब्दकोशात firmus (adj) 'firm' याच्याशी सांगितला आहे, ferio, 'to strike, smite' याच्याशी नाही. दक्षिणी भाषा अलीकडच्या म्हणून त्यांचा पुरावा मान्य नाही असे म्हणणारा मी नाही. द्राविडी भाषांचाही माझा अभ्यास नाही. तरी तुम्ही सुचविलेला खुलासा ग्राह्य वाटत नाही असे म्हणावेसे वाटते. अच्चु वगैरे शब्दांचे असि शब्दाशी अर्थसाम्य काही नाही. च आणि स यांच्या उच्चारांचे पौर्वापर्य काय आहे याची मला कल्पना नाही. तुमच्या लेखनावरून च हा प्राचीन स हा अर्वाचीन दिसतो. तसे असल्यास असि अच्चु यांच्यात ध्वनिसाम्यही असणार नाही. नुसते ध्वनिसाम्य उपयोगी नाही हे तुम्ही जाणताच. सं. 'पूजा' ह्या शब्दाची प्रा. थीम (Thieme) यांनी पृच् पासून सुचवलेली व्युत्पत्ति मी ग्राह्य मानली नाही. तो शब्द संस्कृतात द्राविडी भाषेतून आला असल्याचे माझे मत मी व्यक्त केले आहे."

वेदातल्या शब्दांसाठी दक्षिणी भाषांचा आधार घेण्यात काही वावगे नाही हे मान्य असल्यामुळे या खुलाशातल्या मतांतरांचा परिहार करणे सोपे झाले आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

'असि' सारख्या शब्दांच्या मुळाचा विचार प्रचलित भारतविद्येच्या साचेबंद चौकटीच्या बाहेर, प्राचीन समाजांच्या शब्द घडवण्याच्या रीतीच्या संदर्भाने केला पाहिजे' हे परीक्षणात म्हटलेच आहे. The Bantam New College Latin-English Dictionary त ensis चा अर्थ 'तरवार' असा दिल्यावर पुढेच 'ensis' चा 'मुख्यतः गावांच्या नावांवरून विशेषण बनवण्याचा प्रत्यय, उदा. Antheniensis 'Athenian', from Athens' असा अर्थ दिला आहे. ग्रीक-रोमन काळात तरवार आणि गावखूण या दोन अर्थांनी ensis हा एकच शब्द लॅटिनमध्ये होता हे यावरून उघड आहे. ब्रिटानिका ज्ञानकोशानुसार (आ. १४, २.३३) शस्त्रे आणि कवचे यांच्यासंबंधात 'प्रत्येक ग्रीक प्रदेशाची, उदा. ॲटिका, कॉरिंथ किंवा स्पार्टा ची, स्वतःची साजाची शैली होती." या विशिष्ट साजावरून त्या त्या नगरराज्यातले नागरिक ओळखले जात असल्यामुळे, 'खूण' या मूळ अर्थाचा शब्द नंतर तरवार या सैनिकी खुणेचा वाचक झाला असे दिसते. त्यामुळे अर्थाच्या किंवा आशयाच्या दृष्टीने ensis मध्ये लोखंडवाचक शब्दाचा अभाव आणि खूणवाचक शब्दाचे अस्तित्व असल्याचे स्पष्ट होते. ensign-insignia या शब्दांमध्ये लॅ. signum 'makr, token' (इंग्रजी sign) हा मूळ शब्द आहे. या सगळ्यावरून परीक्षणलेखातले विवेचन चुकीचे वाटू नये.

वर दिलेल्या कोशात किंवा Casell's New Latin Dictionary या कोशात ferrum चा पहिला अर्थ 'iron' हा दिला असून 'लक्षणेने पालटलेले (transformed metaphorically)' म्हणून क्रमाने 'any iron instrument, the plough; a stylus for writing, scissors for hair-cutting; curling irons; a sword' असे अर्थ दिले आहेत. कालक्रमाने संस्कृतीत कोणत्या वस्तूंची वा उपकरणांची भर पडत गेली किंवा उत्पादनाच्या पद्धतींत कशी प्रगती झाली याचा स्थूल आलेखही यात दिसतो. लॅटिन साहित्यात ferrum शब्दाच्या त्या त्या अर्थी उपयोगाची दिलेली सर्वात अधिक उदाहरणे sword या अर्थी आहेत. लॅ. firmus 'firm' हा वेगळाच शब्द दिलेला आहे आणि ferrum किंवा त्यावरून साधित शब्दांच्या अर्थात त्याचा उल्लेख आढळत नाही.

त्यामुळे ferrum चा संबंध ferio 'to strike, kill, smite' या शब्दाशी लावण्यात काहीही चूक नाही. मुशीत बनवलेले लोखंड ठोकून ठोकून त्याच्या वस्तू बनवतात या अर्थाने, तसेच, 'दणका देऊन मारणे' या अर्थाने Sword च्या उपयोगाशीही तो संबंध आहे.

ferrum - ferio सारखेच अर्थसाम्य (आणि ध्वनिसाम्यही) असि शी संबंधित म्हणून दाखवलेल्या दक्षिणी शब्दांचे आहे. परीक्षणलेखात दिलेले

तमिळ, मल्याळम् अच्चु (अस्सु) = साचा (ओतकामाचा)
कोलमी अच् (अस्) = बीड (लोखंड) ओतण्याचा साचा
कन्नड, तेलुगु अच्चु (अस्सु) = साचा, छाप

हे शब्दार्थ वाचून 'अच्चु वगैरे शब्दांचे असि शब्दाशी अर्थसाम्य काही नाही.' असा निर्णायक शेरा मारता येणार नाही.' त्यांच्या लेखनातील 'च चा उच्चार 'स' असाही होतो' या परीक्षणातील विधानावरून 'च हा प्राचीन आणि स अर्वाचीन' असे अनुमान निघू शकत नाही. तमिळांच्या बोलण्यात पाण्याच्या घोटागणिक येणारा 'सरि' हा शब्द मदुरै परिसरात 'चरि' असा उच्चारला जातो हे समकालीन उदाहरण. च स हे पर्यायी उच्चार एकाच काळात वेगवेगळ्या समुदायांत होत आणि त्यातला स हा पर्याय संस्कृतात आला असे म्हटले पाहिजे. वेदादी साहित्यातल्या संस्कृत शब्दांच्या मागे जी बोलींमधली शब्दरूपे असतील त्यांचे अनुमान याप्रमाणे दक्षिणी भाषांवरून केले पाहिजे. वेगळीच मुळे असलेल्या, वेदरचनेनंतर पंधराशे तरी वर्षांनी, लॅटिन साहित्यात आलेल्या शब्दांच्या किंचित आधारावर वेदपूर्व इंडो-युरोपियन या कल्पित भाषेतले कल्पित रूप सिद्ध करायचे हा विद्वत्संमत परिपाठ आता थांबला पाहिजे.

पूजा हा शब्द दक्षिणी भाषांमधून आला हे मान्य करण्याचे उदाहरण आता अपवादात्मक राहू नये. ज्या 'पू = फूल, पूचु (पूजु) = लेपणे, अभिषेक करणे, चोपडणे' इत्यादी शब्दांमध्ये पूजा चे मूळ आपण मानणार त्यांच्या साधित शब्दांवरून येणारे शब्दही संस्कृतात कुठे आले आहेत ते पाहून, त्यांचे परस्परसंबंध मान्य केले पाहिजेत.

विश्वनाथ खैरे

✻✻

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

परीक्षण लेख

एक अभ्यास – *अनुभवामृत**

अशोक चौसाळकर

अनुभवामृत, लेखक व प्रकाशक : डॉ. ग.वा. तगारे, मिरज, २००१, पृष्ठे ११३, मूल्य रु. ७५.००/-.

डॉ. ग.वा. तगारे हे प्राचीन भारतीय संस्कृत साहित्य, पुराणे, पाली, प्राकृत, शैवदर्शन, प्रत्यभिज्ञादर्शन या सर्व विषयांचे थोर असे अभ्यासक. भारतविद्येच्या अनेक क्षेत्रांवर त्यांनी आपली आधिकारिक नाममुद्रा अंकित केलेली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत सहा आस्तिक दर्शनांच्या बरोबरीने शैवपरंपरेतील प्रत्यभिज्ञादर्शनाचे महत्त्व आहे. या तत्त्वज्ञानाचा सूक्ष्म असा परिचय डॉ. तगारे यांनी यापूर्वी लोकांना करून दिला आहे. भारतातील शैवदर्शनांचे ते गाढे अभ्यासक असून त्यांचा भारतविद्येचा दांडगा व्यासंग महाराष्ट्रात आता अस्तंगत झालेल्या जुन्या विद्वत्परंपरेची आठवण करून देतो. आता वयाची नव्वदी पार केल्यानंतर डॉ. तगारे यांनी ज्ञानेश्वरांच्या *अमृतानुभव* किंवा 'अनुभवामृत' या तत्त्वज्ञानपर ग्रंथाचा साक्षेपी परिचय करून देण्यासाठी हे छोटेखानी पुस्तक लिहिले आहे. अशी पुस्तके प्रकाशित करावयास प्रकाशक पुढे येत नाहीत हे पाहून त्यांनी स्वतःच ते प्रकाशित केले आहे. हे पुस्तक त्यांच्या दीर्घ व्यासंगाची फलनिष्पत्ती असून त्यांनी कोणत्याही संप्रदायाची किंवा विचारपरंपरेची झापडे लावलेली नसल्यामुळे सत्यशोधनाच्या बाबतीत त्यांची दृष्टी निर्मळ आहे. मराठीत ज्ञानदेवांच्या या ग्रंथावर विपुल असे लिखाण झाले आहे, पण तगाऱ्यांच्या ग्रंथाचे महत्त्व यासाठी आहे की डॉ. तगारे ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान, शैवागमाची परंपरा आणि नाथ तत्त्वज्ञानाची परंपरा व मराठी संतांची भक्तीपरंपरा यांच्यात सांधा जोडतात. या बाबत त्यांनी केलेली निरीक्षणे मार्मिक असून त्यांतून त्यांचा दीर्घ व्यासंग व निर्मळ दृष्टी दिसून येते.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. तगारे लिहितात की "अनुभवामृताचा आपण जो आयुष्यभर व्यासंग केला, आपल्याला ते तत्त्वज्ञान ज्या प्रकारे कळाले ते जाणत्या जनतेस सादर करावे व ज्ञानदेवतज्ज्ञ ज्या चुका दाखवितील त्यांचा फेरविचार करावा या विद्यार्थी दृष्टीने हे पुस्तक लिहिले आहे." *अमृतानुभवा*चे दुसरे नाव सिद्धानुवाद असे आहे. हा विषय यापूर्वीही मांडला गेला आहे, पण जाणकार लोक आपल्या आवडत्या विषयाचा पुनः अभ्यास करून त्यात नवीन अभिरुची उपभोगतात म्हणून आपण हा ग्रंथ लिहिला, असे डॉ. तगारे सांगतात. वडीलकीला मान देवून त्यांनी शिवकल्याणापासूनच्या टीका वाचल्या. श्री. वा. दा. गोखले यांनी संपादित केलेली *अमृतानुभवा*ची पाठशुद्ध प्रत प्रमाण मानून विवेचन केलेले आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात "श्रीज्ञानेश्वरचरणे वाहिलेले हे अखेरचे तगर पुष्प आहे." यापूर्वी त्यांनी संशोधनपर ३४ पुस्तके व विविध संशोधनपत्रिकेत १०० पेक्षा जास्त लेख लिहिलेले आहेत. या पुस्तकाचे दोन भाग असून प्रस्तावनाखंडात डॉ. तगारे यांनी ज्ञानदेव, त्यांचे तत्त्वज्ञान व त्यांची निरूपणपद्धती यांचे विवेचन केले आहे. तर दुसऱ्या भागात ग्रंथचर्चा केली आहे. त्याच प्रमाणे *अनुभवामृत* हे काव्य असेल तर ते कोणत्या प्रकारचे काव्य आहे आणि त्यात शांतरसाचा कसा परिपोष होतो याचे विवेचन केले आहे.

डॉ. तगारे यांच्या मते सुरुवातीसच ज्ञानदेव सांगतात की, हा विषय आधी सांगितलेला असला तरी तो आपल्या आवडीचा विषय असल्यामुळे त्यावर आपण हा ग्रंथ लिहीत आहोत. कारण जाणकार आपणास माहीत असलेल्या विषयाचा अभ्यास करून नव्याने त्यातील 'रुची' उपभोगतात. *अमृतानुभवा*चे खरे नाव 'अनुभवामृत' हे आहे. हा ग्रंथ वेदांताचा नसून तो ईश्वराद्वयी शैव संप्रदायाचा ग्रंथ आहे. ज्ञानदेवांची

* *जर्नल ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी/ह्यूमॅनिटीज ऑफ सोशल सायन्सेस*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, खंड ३३ (२००३) वरून कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या सौजन्याने – *संपादक*

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

परंपरा काश्मीर शैव आगमाची आहे. वेदांत व शैव आगमात वापरण्यात आलेल्या संकल्पनांचे अर्थ वेगवेगळे आहेत. शिव व ब्रह्म हे दोघेही चिन्मय असले तरी शांकरमतातील ब्रह्म हे ज्ञान (प्रकाश) — स्वरूप आहे तर ईश्वराद्वयी शैवमतात ते ज्ञान (प्रकाश) व विमर्श (कर्तृत्व) यांनी युक्त आहे. शांकरमतात ब्रह्म निष्क्रिय आहे. ते अविद्या या उपाधीने युक्त झाले म्हणजे ईश्वरस्वरूपात सृष्टी, उत्पत्ती वगैरे कार्य करते. म्हणजे सृष्टिक्रिया हे अविद्येचे कार्य आहे. शैवमतामध्ये ज्ञातृत्व व कर्तृत्व परमशिवाचा स्वभाव आहे. तो आपल्या इच्छास्वातंत्र्याने सृष्टी स्थिती, संहार, विलय, तिरोधान व अनुग्रह ही पंचकर्तव्ये करतो. शांकरमताप्रमाणे माया अनिर्वचनीय उपाधी आहे, ती असत् आहे. शैवमताप्रमाणे माया ही शिवाची शक्ती सत्स्वरूप व चिन्मयी आहे. माया शिवाची शक्ती मानल्यामुळे ईश्वराद्वयत्व जास्त व्यापक व परिपूर्ण होते. शांकरमतानुसार संसार नामरूपात्मक व मिथ्या आहे; पण शैवमतानुसार विश्व हे शिवस्वरूप चिद्विलास आहे हे असत्य नाही. वैदिक परंपरेत गीतेवर टीका लिहिणारे ज्ञानेश्वर ब्रह्मचर्चा करतात पण *अमृतानुभवात* ते ब्रह्मचर्चेला स्पर्शही करीत नाहीत. पण याचा अर्थ त्यांचा *अमृतानुभव* वेदविरोधी आहे असा मात्र होणार नाही. डॉ. तगारे यांच्या मते ज्ञानदेवास शांकरभाष्य पाहावयास मिळाले होते पण त्याने रामानुजाचे गीताभाष्य पाहिले नसावे. त्याने हा ग्रंथ सिद्धाच्या भूमिकेतून लिहिला आहे. ज्ञानेश्वर सांगतात की, *अमृतानुभव* हे माझे स्वानुभूतीचे पक्वान्न आहे व ते ग्रंथरूपाने सर्वांस वाटले आहे. *अनुभवामृत* हे एक आध्यात्मिक काव्य आहे आणि त्यात प्रथम प्रमेय किंवा मत मांडून त्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी दृष्टांतांची बरसात केली आहे. डॉ. तगारे सांगतात की, ज्ञानेश्वरांची पद्धत विगामी (deductive) असून सामान्य माणसांना विषय समजावून सांगण्यासाठी त्यांनी शिक्षकाची भूमिका स्वीकारून शैव तत्त्वज्ञानातील संकल्पना समजावून सांगितल्या आहेत.

अमृतानुभव हा तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहे. त्यामुळे त्यात शांतरस प्रधान आहे. पण त्यात शृंगाराची उदाहरणे आहेत. *अमृतानुभवाचे* सौंदर्य सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, "प्रिये सावाईली होये। तै आंगीची आंगी न माये।। येऱ्हवी तेथेचि आहे। तारुण्य की।" आधीच तरुण व सुंदर असलेल्या प्रियेचे तारुण्य व सौंदर्य प्रियकराच्या संगतीत कसे तिच्या अंगात मावत नाही यांचे ज्ञानेश्वरांनी वर्णन केले आहे. डॉ. तगारे यांच्या मते ही शृंगारपर उदाहरणे वज्रयानपंथाची देणगी आहे. कारण वज्रयान-पंथी शृंगाराची भाषा वापरत असत. ज्ञानदेवांचा नाथसंप्रदाय व वज्रयान या बौद्ध संप्रदायाची अनेक वर्षे घसट होती. नाथपंथ व वज्रयान हे मैथुनाचे प्रतिक वापरतात. महायान बौद्ध संप्रदायातून वज्रयानाचा उदय झाला. महायानातून मंत्रयानाची निर्मिती झाली व मंत्रयानालाच वज्रयान म्हणतात. पण त्यानंतर यात वामाचार शिरला. आध्यात्मिक अनुभवातही मैथुनाची परिभाषा वापरण्यात आली. तंत्राच्या सहवासाने नाथसंप्रदायात वामाचार व अनाचार शिरला म्हणून नाथ सिद्धांतातील हा अनाचार रोखण्यासाठी 'विषयविध्वंसैकवी' गुरू गोरक्षनाथाने कठोर ब्रह्मचर्याची शिस्त लावली. पण ही शिस्त परिभाषेतील मैथुनाचे संदर्भ बदलू शकली नाही. *अनुभवामृतात* केलेले "जिये आवडीचेनि वेंगे। येक येकाती गिळती आंगे। कि द्वैताचेनि पांगे। उगविती जैसे।" हे वर्णन याच परंपरेतील आहे. मंगलाचरणातील शिव-शक्तीच्या उत्कट कामक्रीडेचे हे वर्णन आहे. पण कालांतराने हा अनैतिकपणा झिजून गेला.

डॉ. तगारे यांनी ज्ञानेश्वरांची नाथसंप्रदायाशी असणारी गुरूपरंपरा *अनुभवामृताच्या* साह्याने सांगितली आहे. त्यांच्या मते सहजयानीसिद्ध परंपरा आणि नाथपरंपरा फारशा वेगळ्या नाहीत. ही परंपरा सांगताना त्यांनी सरहपाद, शबर, लुइपा, घंटापा, जालंदर, मत्स्येंद्र, कानिफा, गोरक्ष, चौरंगी, गहिनी आणि निवृत्ती अशी परंपरा सांगितली आहे. ज्ञानेश्वराने आपल्या गुरूपरंपरेत निवृत्तीनाथांचा उल्लेख केला नाही कारण प्राचीन भारतीय ग्रंथकार प्रसिद्धीविन्मुख होते.

डॉ. तगारे यांच्या मते *अमृतानुभव* हा तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहे. आणि त्यात ज्ञानदेवाने अनेक तत्त्वप्रणालींचा उल्लेख केला आहे. मुख्यतः त्यांच्या विवेचनात चार प्रवाह आढळतात. ते म्हणजे १) ईश्वराद्वयी काश्मीरी शैव, २) वैदिक व औपनिषदिक, ३) नाथसंप्रदाय, आणि ४) ज्ञानोत्तर भक्ती. डॉ. तगारे यांच्या मते ज्ञानदेवाला आगमिक काश्मीर शैव परंपरा जवळची वाटली कारण नाथपंथाला शैव तत्त्वज्ञान जवळचे होते. त्यामुळे *अमृतानुभवात* शैव तत्त्वज्ञानाचा विचार मांडण्यात आला आहे. या मतात विश्वाची उत्पत्ती सांख्य तत्त्वज्ञानाप्रमाणे सांगितलेली नसून शिव व शक्ती हे जगाचे आद्य उत्पत्तीकर्ते मानलेले आहेत. शिव व शक्ती परस्पर सहकार्याने विश्वनिर्मिती करतात. त्यापैकी एकेकटा तृण पण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

निर्माण करू शकत नाही. शिव व शक्ती यांची सत्ता, प्रकाश व अनादित्व सारखेच आहेत. चराचर विश्व हे शिवशक्तीचे स्वरूप आहे; तेथे तिसऱ्या वस्तूस स्थान नाही. शिव सत्य आहे त्या अर्थी त्याची निर्मिती — जगत् — सत्य आहे. दृश्य जगत हे वस्तुरूप वास्तव आहे. त्यामुळे *अनुभवामृतात* आत्मचर्चा आहे पण ब्रह्मचर्चा नाही.

अनुभवामृतात नाथपंथाचे कोणते तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरांनी स्वीकारले याची चर्चा डॉ. तगारे यांनी केली आहे. त्यांच्या मते ज्ञानदेवांनी गोरक्षनाथाचे तत्त्वज्ञान स्वीकारले पण गोरक्षनाथाने न स्वीकारलेली भक्ती स्वीकारली. ज्ञानेश्वरांची भक्ती ही ज्ञानोत्तर भक्ती आहे. ही भक्ती ज्ञानी माणसाची परमेश्वराशी झालेली एकरूपता व्यक्त करते.

डॉ. तगारे यांनी पुस्तकाच्या दुसऱ्या भागात *अनुभवामृता*तील तत्त्वज्ञानाचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते ज्ञानदेवांनी काश्मीर शैव ग्रंथ *विज्ञानभैरवी* वाचला असावा कारण उभयतांच्या विवेचनात बरेच साम्य आहे. तगारे यांनी नंतर ज्ञानदेवांनी जी शब्दादि प्रमाणांची चिकित्सा केली आहे त्याची माहिती दिली आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मा स्वतःशीच अनन्य होऊन सदा उपभोग घेत असतो. चैतन्य सुखपणाला येत नाही त्यामुळे आत्म्याच्या ठिकाणी शब्दाची प्रवृत्ती नाही. आत्मस्वरूप जाणून घेण्यासाठी प्रत्यक्षादि प्रमाण महत्त्वाचे नाहीत. आत्मवस्तू स्वतःसिद्ध असल्यामुळे आत्मज्ञानाविषयीचे योगादि उपाय व्यर्थ आहेत. दृश्य जग हे मायिक किंवा आभासिक नसून दृश्य जग वस्तुरूपच आहे. त्याची निर्मिती कामनेतून झालेली नाही. ज्याच्या ज्ञानाकाशात ज्ञानसूर्याचा उदय झाला तो ज्ञानी पुरुष. एखाद्या पुरुषास अशी स्थिती प्राप्त झाली तरी त्याचे रोजचे व्यवहार बदलत नाहीत हे ज्ञानेश्वरांना माहीत होते. पण त्याचवेळी तो आनंदस्वरूपाचा आस्वाद घेत असतो. त्याचे वर्णन खालील प्रसिद्ध ओवीमध्ये ज्ञानदेव करतात.

"आता आमोद सुनांस आले। श्रुतिसी श्रवण आले।
आरिसे उठिले। लोचनासी।।"

डॉ. तगारे सांगतात की उदाहरणे शब्दशः न घेता तींत त्या तत्त्वज्ञ मनःस्थितीचे वर्णन केले आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या उदाहरणांत भोग्य (भोगायची वस्तू) आणि तिचा उपभोग घेणारा (भोक्ता), दृश्य व दृष्टा असा भिन्नपणा न राहता त्यांचे अद्वैत झाले आहे. त्यामुळे ज्ञानी पुरुष अनेक व्यवहार करतो पण त्याच्यावर त्या क्रियेचा कोणताही परिणाम होत नाही. ज्ञानेश्वरांनी ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते ज्ञानी पुरुषाची जी इच्छा असेल तोच धर्मविहित विधी होतो. अद्वय अवस्थेतील स्वेच्छायुक्त वर्तन हीच समाधी अवस्था असते. या दशेत मोक्षाचे ऐश्वर्य या ज्ञानी पुरुषाचे आसन होते. या अवस्थेत भक्त हाच देव झाला. विविधतेने भरलेले हे जग एकांतस्थळ आहे आणि भक्त एकरूपच झाल्यामुळे कोणीही भक्तीने देव व्हावे, कोणीही (देवाने) भक्त व्हावे अशी स्थिती होते. त्यांतून सर्वात्मभावाची निर्मिती झाली. एकाच डोंगरातुन देव, देवता, देऊळ व परिवार कोरून काढले पण मुळात डोंगर एकच आहे. ज्ञानदेवांच्या मते जेथे देव व भक्त यांचे ऐक्य झालेले असते तेथे भजन केले वा न केले तरी चालते. ही स्वरूपस्थिती अनिर्वाच्य आहे. ज्ञानदेव सांगतात की, अद्वयानंदाचा आनंद भोगणे ही सर्वश्रेष्ठ अवस्था आहे. जे *अमृतानुभवा*च्या अक्षर गाभाऱ्यात, अंतरंगात प्रवेश करतात तें अनुभवामृतस्वरूप बनतात.

ज्ञानदेव असे म्हणाले की, आपण या ग्रंथातून पूर्वीपासून लोकांना माहीत असलेले संविद्रहस्य सांगितले. पण डॉ. तगारे सांगतात की ज्ञानदेवांनी यात नवी भर घातली. नाथपरंपरेतील विकासक्रम सांगताना डॉ. तगारे लिहितात की, गोरक्षनाथाची योगसाधना पातंजल योगसूत्रापेक्षा व उत्तरकालीन बौद्धांपेक्षा वेगळी होती. ती शांकरवेदांतातील धारणेपेक्षा मूलतः भिन्न होती. गोरक्षनाथाचा तत्त्वज्ञानात्मक-सैद्धांतिक आदर्श 'सामरस्या'चा होता. याचा अर्थ सर्व भेदात्मक मतांपेक्षा अधिक उन्नत आध्यात्मिक पातळीवर जाऊन समरस होणे हा होता. डॉ. तगारे यांच्या मते भारतातील तत्त्वचर्चा गोठलेली नव्हती. कारण मानवी मन प्रगतीप्रिय असल्यामुळे कोणताही पारमार्थिक संप्रदाय पोलादी चौकटीसारखा राहात नसतो. ज्ञानेश्वरांचा साधनमार्ग तत्त्वज्ञानाची पुढची अवस्था दाखवतो. गोरक्ष व ज्ञानेश्वर यांच्यातील तीन शतकांत साधना व तत्त्वज्ञान यांत फरक पडणे अपरिहार्य आहे. भावनाशून्य, शुष्क व कठोर योगमार्गात वाढलेल्या ज्ञानेश्वराने 'हरि मुखे म्हणा' असा उपदेश असणाऱ्या भक्तिभावनेने परिप्लुत झालेल्या वारकरी संप्रदायाचा पुरस्कार करणे हे भारतीय तत्त्वपरंपरा गोठलेली नव्हती हे दाखवून देते. देव व भक्त यांतील एकरसत्व व त्यांतून निर्माण होणारा सर्वात्मभाव यांचे ज्ञानदेवकृत विवेचन हा त्यांनी केलेल्या वैचारिक योगदानाचा एक भाग आहे.

डॉ. तगारे यांच्या मते *अनुभवामृत* हा ग्रंथ त्यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

स्वांत:सुखाय लिहिला. त्याचप्रमाणे, त्या सिद्धांताचा इतरांनाही लाभ व्हावा व त्यांनाही आनंद उपभोगता यावा ही त्यांची त्यामागची भूमिका आहे. हा छोटासा ग्रंथ डॉ. तगारे यांच्या प्रदीर्घ व्यासंगाचे, पांडित्याचे व विनम्रतेचे दर्शन घडवतो.

काश्मीर शैवदर्शनाकडे व प्रत्यभिज्ञा दर्शनाकडे भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांचे दुर्लक्ष झालेले आहे. या तत्त्वज्ञानात विश्व असत् मानलेले नसून तो चिद्विलास आहे असे मत मांडलेले आहे. पण आत्मस्वरूप व जीव यांच्यात परात्मभाव निर्माण झाला व त्यांतून भेदस्थिती निर्माण झाली. पण या तत्त्वज्ञानाची त्यांच्या सामाजिक आणि राजकीय आविष्कारांच्या संदर्भात मांडणी झाली नाही. त्यांतून कोणत्या प्रकारचे नवे अभ्युपगम सिद्ध होतात याचाही विचार करणे गरजेचे आहे. शांकारमतापेक्षा आणि सांख्यमतापेक्षा वेगळा विचार ज्ञानदेवांनी *अनुभवामृतात* मांडला आहे. त्याचा सामाजिक आणि राजकीय विचारांच्या क्षेत्रात कसा विस्तार करता येईल, त्याचे उपयोजन त्या क्षेत्रांत कसे करता येईल हे पाहाणे महत्त्वाचे आहे. डॉ. तगारे यांनी अभ्यासाचा हा ठेवा अत्यंत अनाग्रही पद्धतीने लोकांसमोर ठेवला आहे. तसेच नव्या संशोधनाच्या दिशा कशा प्रकारच्या असू शकतात हेही त्यांनी त्यात नमूद केले आहे. या पुढे *अमृतानुभवाचा* अभ्यास करणाऱ्या सर्वच अभ्यासकांना या पुस्तकाला टाळून चालणार नाही इतके ते महत्त्वाचे आहे. ज्ञानदेवांना वाहिलेले हे 'तगरपुष्प' सुगंधी आहेच पण ते अखेरचे ठरू नये अशीच सर्व अभ्यासकांची भावना आहे.

मराठ्यांची प्रशासन व्यवस्था लेखक : सुरेंद्रनाथ सेन; अनुवाद : सौ. विजया कुलकर्णी,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३; रु....)

मराठ्यांची प्रशासन व्यवस्था

सौ. विजया कुलकर्णी यांनी अनुवादित केलेला सुरेंद्रनाथ सेन यांचा Administrative Systems of Marathas हा भारतीय इतिहास लेखनातला एक महत्त्वाचा ग्रंथ. 'मराठ्यांची प्रशासन व्यवस्था' या नावाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचे प्रकाशन म्हणून हा ग्रंथ आता मराठीत उपलब्ध होत आहे. याचे स्वागतच व्हायला हवे.

मूळ इंग्रजीतला ग्रंथ प्रसिद्ध झाला १९२३ साली. याचे भाषांतर प्रसिद्ध होत आहे २००३ साली. विजया कुलकर्णी यांनी भाषांतर व्यवस्थित केले आहे, ग्रंथाच्या छपाईत सफाई आहे पण तरीही काही गोष्टी या खटकणाऱ्या आहेत. भाषांतर पूर्ण झाल्यावर ग्रंथ प्रकाशित होण्यास पाच वर्षे लागली. सुरेंद्रनाथ सेन यांचा एक त्रोटक परिचय, त्यांच्या ग्रंथसंपदेची यादी यात छापणे हा साधा औचित्याचा भाग आहे. प्रस्तुत ग्रंथाशिवाय 'Military Systems of Marathas' आणि 'Foreign Biographies of Shivaji' हे सेन यांचे तितकेच महत्त्वाचे ग्रंथ. हा साधा उल्लेखही प्रस्तुत ग्रंथात नसावा याबद्दल खेद वाटतो. दुसरे म्हणजे, मूळ ग्रंथ १९२३ चा, सुधारित आवृत्ती १९२५ मधली. मधल्या ७५ वर्षांहून जास्त व्यतीत झालेल्या काळांत संबंधित विषयासंबंधी नवी माहिती काय उजेडात आली, त्याच्या आधारे विषय समजून घेण्याची व्याप्ती किती वाढली या व अशा गोष्टींची चर्चा करणारी एक विस्तृत प्रस्तावना या क्षेत्रातल्या अधिकारी व्यक्तीकडून आवर्जून लिहून घेणे, ग्रंथात समाविष्ट करणे हे मंडळाला का जमले नाही असाही प्रश्न उरतोच. ज्ञान प्रकाशात आणताना शक्य तेव्हढे अद्ययावत असावे हा विचार दुर्लक्षित ठेवणे परवडणारे आहे का?

ग्रंथ ४ भागांत आहे. १) शिवकाल २) पेशवेकाल. तिसरा भाग ग्रामसंस्थांचा आढावा घेणारा तर चौथा या सर्व संस्थांचा विकास, त्यात इस्लामचा सहभाग याची चर्चा करणारा.

'शिवकाल' या भागाला हात घालण्याआधी सेन यांनी उपलब्ध साधनांचा आढावा घेताना ग्राह्य-अग्राह्य चर्चा केली आहे. सहसा मराठी इतिहासाची तोंडओळख असलेल्या वाचकाला मराठ्यांचा पहिला इतिहासकार म्हणून कॅप्टन ग्रँट डफ हे नाव माहीत असते. मात्र पेशवाईचा अस्त होण्याआधी (१८१८) म्हणजे १८११ साली स्कॉट वेअरिंग याने मराठ्यांचा पहिला विस्तृत इंग्रजी इतिहास लिहिला – ग्रँट डफच्या आधी विसेक वर्षे – ही माहिती सेन सहज नोंदवतात. साधने, त्यांची

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
अनुक्रमणिका

चिकित्सा या सेन यांच्या प्रकरणाची तुलना नव्हे पण समांतर अभ्यास श्री. गजानन मेहेंदळे यांच्या शिवचरित्राच्या पहिल्या खंडातल्या याच प्रकारच्या लिखाणासोबत करण्याचा मोह इतिहासाच्या अभ्यासकाला व्हावा.

शिवकालातल्या प्रशासन व्यवस्थेसंबंधी एक प्रमुख अडचण म्हणजे कागदपत्रे पुरेशी उपलब्ध नसणे. संभाजीच्या मृत्यूनंतर रायगड मुघलांच्या हाती जाणे, नंतरची पळापळ, १७०७ पर्यंत चाललेले मुघल-मराठा युद्ध यांच्या परिणामी दप्तर धडपणे हाती लागणे शक्य नव्हते. साहजिकच, बखरी, राजवाडे-पारसनीस यांनी कागदपत्रे उजेडात आणण्याचा केलेला आयुष्यभराचा एकहाती उद्योग, इतर कांही यावर समाधान मानावे लागते. मुघल-विजापूर या सत्रांकडे एक विकसित प्रशासनयंत्रणा होती तशी शिवाजीला उपलब्ध नव्हती. निजामशाहीचा पराभव आणि ती नष्ट होणे, त्यातून निर्माण होणारी अंदाधुंदी ही पार्श्वभूमी तर स्पष्टच आहे. मात्र, इथल्या रहिवाशांचे स्वभाव शिस्तबद्ध प्रशासनाच्या स्थापनेला प्रतिकूल होते हे सेन यांचे मत आजही चिंतनीय आहे.

शिवाजीने निर्माण केलेले अष्टप्रधानमंडळ (हे मुळात पिढीजात हक्काचे नव्हते हे महत्त्वाचे) प्रधानांची कर्तव्ये याची माहिती नोंदवत सेन 'महसूल आणि अर्थव्यवस्थे'कडे येतात. कुठलीच प्रशासनव्यवस्था कोण्या एका माणसाची निर्मिती नसते. मात्र ज्ञात गोष्टींमध्ये योग्य तो बदल घडवून आणणे ही निर्मितीच आहे. शिवकालात युद्धे, स्वाऱ्या हे सर्व होत असले तरी प्रजेला फारसा धक्का बसत नसे हे स्कॉट वेअरिंग याचे मत महत्त्वाचे आहे. जमीनधारा म्हणजे शेतीवरील कर हे त्याकाळी राज्याच्या उत्पन्नाचे मोठे साधन — मलिक अंबरने आखून दिलेल्या पद्धतीत आवश्यक फेरफार करून जी नवी व्यवस्था शिवाजीने प्रत्यक्षात आणली ती एका श्रेष्ठ प्रशासकाला साजेशी होती, त्यामुळे सारावसूली फार प्रयास न करता होत असे. त्या काळच्या अनेक करांची नावे सेन नोंदवतात, सोबत हे कर स्थल-काल सापेक्ष आहेत, सार्वत्रिक नाहीत हेही स्पष्ट करतात. महसूल व्यवस्थेसाठी प्रदेशाचे पाडलेले विभाग, त्यावरचे अधिकारी या माहितीच्या संदर्भात पाटील, कुलकर्णी, देशमूख-देशपांडे यांची पिढीजात वतने अबाधित राहिली तरी, करवसूलीचे त्यांचे अधिकार समाप्त करण्यात शिवाजीने फार मोठे पुढचे पाऊल उचलले हे लक्षात घ्यायला हवे.

आज देशात एकच चलन वैध आहे. मात्र शिवकालात स्वकीय-परकीय सर्वच नाणी वैध होती. सोने-चांदी या धातूंची अडतीस निरनिराळी नाणी चलनांत होती. त्यांची नावे सेन यांनी नोंदली आहेत. शिवकालात मराठी राज्य नाणी पाडण्याच्या कलेत प्रथमावस्थेत आढळते. कुशल कारागीर मिळण्यासाठी स्थिर राजवट असावी लागते. स्वराज्याच्या स्थापनाकाळात ही अडचण स्वाभाविक म्हणावी लागेल.

लष्कराच्या मागेही एक प्रशासनव्यवस्था उभी लागते. त्याचा एक स्थूल आराखडा सेन यांनी दिला आहे. या विषयावर त्यांचा स्वतंत्र ग्रंथ वर उल्लेखला आहेच. आरमार हा पुन्हा एक निराळा घटक म्हणून काही तपशील दिला आहे. शिवाजीने स्थापन केलेले नौदल हा एक निराळा प्रयोग. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला फार माहिती सेन यांना मिळाली नसावी. मात्र, पुढे जाऊन, पेशवेकाळात, भारतीय व्यापारी चीनपर्यंत पूर्वेकडे व अरेबियापर्यंत पश्चिमेकडे आपली जहाजे घेऊन जात, आणि हे व्यापारी मराठी होते ही माहिती सामान्यतः नसते.

पेशवेकाळाबद्दल साधनांची विपुलता आहे. पेशव्यांनी आपले स्थान पुणे हे ठरवल्यापासून दप्तर पुण्याला राहिले. १८१८ला पेशवाई संपली त्यावेळी माऊंट स्टुअर्ट एल्‌फिस्टनसारखा शहाणा कारभारी असल्याने हा कागदपत्रांचा खजिना नीट सांभाळला गेला. शिवाय या काळात इथे वावरणाऱ्या परकीय सत्तांचा पत्रव्यवहार वगैरेतून पुष्कळ माहिती मिळवता येते. साहजिकच ग्रंथाचा मोठा भाग त्या कालखंडासंबंधी आहे. छत्रपतींच्या ठिकाणी केंद्रित सत्ता पेशव्यांच्या हाती जाणे, पेशवाई पिढीजात होणे या स्थित्यंतरामागची कारणपरंपरा सेन यांनी उलगडली आहे.

पेशवेकालीन ग्रामसंस्था, त्या संस्थांची अर्थव्यवस्था आधी देऊन मग परगणा (तालुका) व प्रांत यांच्या प्रशासनव्यवस्थेचा बराच तपशिलात मागोवा सेन घेतात. हुजूर दप्तर म्हणजे Central Secretariat — सचिवालय अशा धर्तीची संस्था. पत्रव्यवहार, सर्व हिशेब, अगदी रोजची कीर्द देखील काटेकोरपणे नोंदली जात असे. बेहेडा म्हणजे अर्थसंकल्प, पुढे ताळेबंद, सचिवालय अशी व्यवस्था असल्याने ग्राम-परगणा-प्रांत अशा उतरंडीवर नीट देखरेख शक्य होती. शेतीला उत्तेजन, पंचायतीचे कामकाज, पाटबंधारे, व्यापार, जहाजबांधणी, कर, सरकारी जंगल .... या व अशा अनेक पैलूंचा तपशील सेन यांनी दिला आहे. यात न्यायव्यवस्थाही आली. यात मुलकी-फौजदारी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ही विभागणी आहे. अपिलाचा अधिकार आहे, त्या काळी न्यायाचाच एक भाग म्हणून 'दिव्य' करता येई. त्याचा बराच तपशीलही आहे. तुरुंग, पॅरील, कैद्याचे आजारपण, राजबंदी असल्यास मिळणारी वर्तणूक, पोलीस, कोतवाल असे विषयही हाताळले आहेत.

ग्रंथाच्या अंतरंगाविषयी खूप तपशिलात लिहिणे शक्य आहे पण त्यासाठीचे हे स्थळ नव्हे. साधारणपणे मध्ययुगातल्या व आधुनिक काळाच्या सीमेवरच्या प्रशासनपद्धतीचे जे तपशील असू शकतील ते इथे आढळतात. पहिल्या महायुद्धाच्या आसपासच्या काळात उपलब्ध साहित्याचा पूर्ण उपयोग सेन यांनी केलेला जाणवतो. मराठी इतिहासाविषयी जिज्ञासा असणाऱ्यांनी ग्रंथ अभ्यासायला हवा.

एक गोष्ट आवर्जून लक्षात घेणे आवश्यक आहे. ज्या काळात सेन लिहित होते तो काळ राष्ट्रभक्तिभारित इतिहास-लेखनाचा आहे. मराठीत वि.का. राजवाडे असोत वा बंगालमध्ये यदूनाथ सरकार—सुरेंद्रनाथ सेन असोत. त्यांची मते तत्कालीन राष्ट्रीय बाण्यातून तयार झालेली आहेत. आजच्या अभ्यासकाला जास्त तपशील उपलब्ध आहे; तसेच मानसिकताही राष्ट्राभिमानाने प्रत्येक गोष्टीचे समर्थन करणारी नाही. हे तारतम्य ठेऊनच ग्रंथ वाचावा.

विश्वास दांडेकर

**

प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई ग्रंथालय

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

पु न र्मु द्र ण

हिंदुधर्माची समीक्षा

(तिसरी आवृत्ती)

आणि

सर्वधर्मसमीक्षा

(पहिली आवृत्ती)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैचारिक वाटचालीतील टप्पे स्पष्ट करणाऱ्या, ऐतिहासिक महत्त्व असलेल्या दोन पुस्तकांचे एकत्रित पुनर्मुद्रण

पृष्ठे २२५

किंमत रु. १७५/-

संपर्क : **चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)**

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आपल्या ग्रंथालयात अवश्य हवीत अशी

प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमालेची

संग्राह्य वैचारिक मराठी प्रकाशने

सुधारित किंमत : १ एप्रिल १९९७ पासून लागू

■ **वैदिक संस्कृतीचा विकास** (तिसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	३०० रु.
■ **अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर** (पूर्वार्ध) । ब्र. स्वामी केवलानंद सरस्वती	२०० रु.
■ **पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास** । डॉ. सुमंत मुरंजन	६० रु.
■ **हिंदी साहित्यविचार** । प्रा. प्यारेलाल गोहेल	५ रु.
■ **श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदनग्रंथ**	६० रु.
■ **संशोधन साधना** । डॉ. वसंत स. जोशी	४० रु.
■ **तरंगयामिक व पुंजयामिक** । मा.ग. टोळे	१० रु.
■ **आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** । ऋग्वेदी	८० रु.
■ **वागीश्वरी** । डॉ. गो.के. भट	४० रु.
■ **प्रस्थानभेद** (प्राचीन १४ विद्यांची माहिती) पुनर्मुद्रण । गं.वा. लेले	२५ रु.
■ **गिर्यारोहण परिचय** । अच्युत खोडवे	१० रु.
■ **इतिहासाचे तत्त्वज्ञान** (दुसरी आवृत्ती) । सदाशिव आठवले	८० रु.
■ **दासशूद्रांची गुलामगिरी** (भाग २) । शरद् पाटील	१०० रु.
■ **शाहीर हैबती** । डॉ. शिवाजीराव चव्हाण	४० रु.
■ **गीताचिकित्सा** । भाऊ धर्माधिकारी	१०५ रु.
■ **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** (चरित्र) । सौ. मालती देशपांडे	२५ रु.
■ **बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार** । प.ल. वैद्य	३० रु.
■ **हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन** (संवर्धित दुसरी आवृत्ती) । मे.पुं. रेगे	१६० रु.
■ **पाच पुस्तक-परिक्षणे** । वा.म. कुलकर्णी	४० रु.
■ **भेदविलोपन : एक आकलन** । अशोक केळकर	२० रु.
■ **कॉलिंगवुडची कलामीमांसा – एक भाष्य** । रा.भा. पाटणकर	८० रु.
■ **धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार** । दि.के. बेडेकर	१५ रु.
■ **आचार्य शं.द. जावडेकर : व्यक्तित्व आणि विचार**	१०० रु.
■ **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कार्य आणि विचार**	१५० रु.
■ **इहवाद आणि सर्वधर्मसमभाव** । मे.पुं. रेगे	८० रु.
■ **प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा**	२०० रु.
■ **चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान** (तृतीयावृत्ती) । सदाशिव आठवले	८० रु.
■ **विनोबांची संस्कृत साम्यसूत्रे** (रसग्रहणात्मक मराठी अनुवाद) । वसंत नारगोलकर	१२० रु.
■ **नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र : भारतीय संदर्भात विवेचन** । द.ना. धनागरे	४० रु.
■ **प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती** (निवडक मौलिक लेखांचा संग्रह) । डॉ. म.अ. मेहेंदळे	५५० रु.

१) ग्रंथालये व संस्थांना किंमतीत १० टक्के सूट. पोस्टेजचा खर्च वेगळा पडेल. २) व्ही.पी. ची पद्धत नाही. ३) पैसे मनिऑर्डरने वा ड्राफ्टने पाठवावेत.

संपर्कासाठी पत्ता : **चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)**

हे मासिक श्री.ग. दीक्षित यांनी मुद्रा, ३८३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून सरोजा भाटे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई